साप्ताहिक
साधना

२१ एप्रिल ८४
दोन रुपये






# मंचर
## एका कॉलेजने बदललेला परिसर

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : तेविसावे

अंक : सत्तेचाळीसावा

२१ एप्रिल १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

संजय पवार

## सप्रेम नमस्कार, माणूस

### शेल्टी–बेधडक विधाने

आपल्या साप्ताहिकाच्या दि. ७ एप्रिलच्या अंकात ' माहितगार ' यांनी ' शेल्टीचे हत्याकांड आणि नंतर ' या मथळ्याखाली जे लिखाण केले आहे ते कसे चातुर्याने सत्याचा अपलाप करणारे आहे हे आपल्या मान्यवर साप्ताहिकाच्या वाचकांपुढे येणे अगत्याचे आहे. म्हणून हे पत्र लिहीत आहे.

प्रथमतः ' माहितगारांची ' माहिती कशी अपुरी आहे आणि तरीसुद्धा बेधडक विधाने ते कशी करतात हे थोडक्यात पाहू.

१. निवडणुकांमध्ये श्रमिक संघटनेने पी.के पाटलांचा प्रचार केला, असे माहितगारांचे म्हणणे आहे. जनता पक्षाला निवडणुकांमध्ये पाठिंबा म्हणजे पीकेंच्या कारवायांकडे कानाडोळा नव्हे, त्यांना विरोध चालूच राहील हे उघड आणि स्पष्टपणे श्रमिक संघटनेने सांगितले आहे; परंतु माहितगारांना हे माहीत आहे असे दिसत नाही.

२. ' पतितपावन ' म्हणजे रा. स्व. संघ आणि भाजप हा प्रचार खोटा असल्याची माहितगारांची माहिती आहे. या तिन्ही संघटनांच्या प्रवृत्ती एकाच प्रकारचा जमातवाद ' संकुचित हिंदुत्ववाद ' यामधून निर्माण झालेल्या आहेत. त्यांचे बहुतांशी कार्यकर्ते समान आहेत, हे त्या संघटनासुद्धा नाकारू शकणार नाहीत. अर्थात हा मुद्दा गौण आहे. प्रधान मुद्दा त्या एकाच प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करतात, हा आहे. माहितगारांनी हे खोटे आहे हे सिद्ध करून दाखवावे.

३. ' आपला हत्याकांडाशी काहीही संबंध नाही व अनेक लोक स्वनियुक्त आहेत ' असे पतितपावनने स्पष्ट केले आहे, इ. माहितगारांनी लिहिले आहे. ही संघटना शहाद्यात गेल्या वर्षभरात सुरू झाल्याचे माहितगारांना माहीत आहे. आमचा व शहाद्याच्या लोकांचा काहीही संबंध नाही, असे गेल्या वर्षभरात जाहीर करण्याचे पतितपावनला सुचले नाही. माहितगारांना हा प्रश्न पडण्याचे कारण नाही. कारण ते भाजप-धार्जिणे आहेत आणि त्यांना पतितपावनला पाठीशी घालायचे आहे. प. पा. ने ' मतदार ' दैनिक बंद पाडून माहितगारांच्या माहितीला चांगलेच खिंडार पाडले आहे.

आता माहितगारांची धोरणात्मक बैठक कशी फसवी आहे ते पाहू. त्यांची भूमिका सूत्ररूपाने अशी मांडता येईल:

अ) शेतीधंद्याचे शोषण होत आहे व शेतकरी–शेतमजूर यांनी त्याविरुद्ध लढले पाहिजे.

ब) श्रमिक संघटना शेतमजुरांना हिंसाचाराला प्रोत्साहन देत आहे. त्यामुळे बड्या जमीनदारांचे फावत असून शांततामय सहजीवन उध्वस्त झाले आहे.

क) किमान वेतन, विकास, पीकसंरक्षण यांची हमी देऊन अंमलबजावणी करणारी यंत्रणा त्रिपक्षीय स्वरूपात स्थापून हा प्रश्न सोडवावा.

यातला मुद्दा अ) वास्तवावर आधारित असला तरी भारतीय कष्टकरी संघटनेची भूमिका फसवी आहे. शेतमजुरांनी शेतकऱ्याविरुद्ध लढू नये म्हणून ही भूमिका घेतलेली आहे. अन्यथा शेतमजुरांनी आपला आला दिवस कसा ढकलायचा याची चिंता करू

**मुखपृष्ठावर :** अण्णासाहेब आवटे कॉलेज–मंचर येथील फलप्रकल्प.
उजवीकडचे पहिले कॉलेजचे प्राचार्य श्री. अप्पासाहेब पानवळ, त्यांचेमागे प्रा. भोसले.
बाजूस तरुण भारतचे माजी संपादक श्री. देवधर.

नये, आपण तागवले जात असताना काही शेतकरी गबर होताहेत, हे सत्य असले तरी 'खोटा प्रचार' समजून त्याकडे दुर्लक्ष करावे, परंतु संपूर्ण शेतीच्या शोषणाच्या प्रश्नावरच लढत राहावे, असे उघडपणे सांगणे म्हणजे स्वतःच्या संघटनेचा अंतःस्थ हेतू प्रकाशित करण्यासारखे होईल.

मुद्दा ब) आणि त्याला अनुसरून लेखात माहितगारांनी केलेली कित्येक विधाने वाचून सामान्य वाचकाचा समज असा होईल की, शहादे–तळोदे भागातला हिंसाचार श्रमिक संघटनेच्या प्रेरणेने चालू आहे आणि त्याचे स्वरूप शेतमजुरांनी शेतकऱ्यावर चढवलेले हल्ले असे आहे. आपणच लेखात अन्यत्र केलेल्या विधानांकडे माहितगार नंतर ढुंकूनही बघत नाहीत. त्यातला महत्त्वाचा भाग पुन्हा एकदा सूत्ररूपाने–

१) आदिवासींच्या चळवळी दडपून टाकण्यासाठी पीकेंनी 'पुरुषोत्तम सेना' हे सशस्त्र सेनादल स्थापन केले होते (१९७३).

मामाचे मोहिदे, बोराळे आदी ७–८ प्रकरणात पी केंच्या सेनेचा हात होता.

३) जिल्ह्यातील बहुतेक सर्वांनी हे पुरुषोत्तमसेनेचे पुनरुज्जीवन असल्याचे मत व्यक्त केले.

म्हणजे शस्त्रे, साधनसामुग्री, संदेशयंत्रणा सगळी पी. केंच्या सेनेकडे, गेल्या दहा-बारा वर्षांतच काय पण गेल्या वर्षभरातल्या प्रकरणात हात गोवले आहेत. बड्या जमीनदारांचे, पण हिंसाचार कोण करतो? आदिवासी शेतमजूर. पाच आदिवासींचे हत्याकांड झाल्यावरसुद्धा 'पुरुषोत्तमसेनेच्या भीतीचा बागुलबुवा आहे.' असे अकलेचे तारे तोडणाऱ्या 'माहितगारांना' तारतम्य अपरिचित असावे याचे नवल वाटते.

'माहितगारांच्या' भूमिकेचा तिसरा भाग मुद्दा क) अंमलबजावणीच्या त्रिपक्षीय यंत्रणेचा आहे. समस्येचे वरवरचे, उथळ आकलन यातून स्पष्ट होते. शेतमजुरांच्या किमान वेतनाच्या अमलबजावणीसाठी आजही यंत्रणा अस्तित्वात आहे; परंतु ती कोणी व कशी गुंडाळून ठेवली आहे याचा विचारही माहितगारांनी केलेला नाही. असल्या मलमपट्टीतून काहीही साध्य होणार नाही हे अडाणी शेतमजुरालासुद्धा 'माहितगारां' पेक्षा चांगले समजते.

'माहितगारां' चा उपरिनिर्दिष्ट लेख आपल्या साप्ताहिकाच्या वस्तुनिष्ठ परंपरेला शोभेसा वाटला नाही. तथापि वेगवेगळ्या भूमिकांचे व्यासपीठ म्हणून त्याला आपण स्थान दिलेत ते योग्यच केलेत.

१२ एप्रिल, ८४ जीवन पवंते

---

## तायड्यांनी हे करून दाखवावे

'परामानसशास्त्रीय संशोधन करणारे रशियन, अमेरिकन व इतर वैज्ञानिक विद्वान असले तरी त्यांना काही कळत नाही' हे विधान खुद्द श्री. तायडे यांनीच टिळक स्मारक मंदिरात ३–६–८३ रोजी त्यांच्या भाषणानंतर मी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर म्हणून केलेले. ते मी 'सात्त्विक संतापाच्या ओघात' केलेले नव्हे! माझ्या एका प्रश्नात लेनिनग्रॅडच्या डॉ. एल. एल. वॅसिलिएव यांच्या संशोधनाचा उल्लेख होता, त्यावर, 'वॅसिलिएव? हे कोण? अशी पृच्छा श्री. तायडे यांनी केली होती. (!) मुलाखतीतील बराचसा भाग हा त्यांच्या त्या व्याख्यानाचीच पुनरुक्ती.तेव्हा त्या वेळी मी जे जाहीरपणे सांगितले त्याची मीही पुनरुक्ती करतो की 'बुवा/महाराजांचे बिंग बाहेर काढण्याची मोलाची समाजसेवा श्री. तायडे करीत आहेत. माझी भूमिका या बाबतीत तशीच असून मीही यथाशक्ती प्रयत्न करीत असतो. ('किर्लोस्कर'मधील माझा लेख पहावा. फेब्रु. १९८३)

आता खुद्द मुलाखतीतील मुद्द्यांविषयी–

१) 'परामानसशास्त्रीय घटना निसर्गघटनांमध्येच मोडतात, त्यामुळे त्यांनाही नियम असलेच पाहिजेत व त्यांचा शोध घेणे हे परामानसशास्त्राचे उद्दिष्ट होय', असे जे. बी. ऱ्हाइन आदींनी म्हटले आहे ते श्री. तायडे यांच्या वाचनात आले असेलच; परंतु त्यांची उपपत्ती 'ज्ञात निसर्ग नियमांनुसार' देता येत नाही म्हणून तर 'विद्यमान विज्ञानाच्या पलीकडे' हा माझा शब्दप्रयोग.

२) जीना, नेलिया वगैरेंनी चलाखी केली असणार हे असिद्ध गृहीत धरून (अनप्रूव्ह्ड ॲसम्प्शन)– त्यांच्यावर प्रसिद्धीच्या हव्यासाचा हेत्वारोप करण्यात आला आहे. असे अतार्किक वक्तव्य अर्थातच उपेक्षणीय.

३) कु. आनंद तायडे यांनी स्वतःच्या तळहातावर किल्ली ठेवून ती हलवून दाखवणे आणि श्रीमती नीना यांनी कोणत्याही प्रकारे स्पर्श न करता वस्तू हलवून दाखवणे यामध्ये फरक असल्याने कु. आनंदचे प्रात्यक्षिक आणि त्यावरील भाष्य हेही अविचारणीयच.

४) 'फॉक्स भगिनींची लबाडी' हे त्यांचे लाडके उदाहरण श्री. तायडे देत असतात; परंतु स्वतःच्या भूमिकेस अनुकूल अशा उदाहरणांचेच प्रसृतीकरण–सिलेक्टिव प्रेझेंटेशन का? डी. डी. होमच्या एका बैठकीतील भौतिक प्रकारांच्या सत्यतेविषयीची फ्रेंच जादूगार रॉबर्ट हुदिनची ग्वाही, हॉलंडमधील रॅशनॅलिस्ट संस्थेच्या नियतकालिकाचे संपादक डॉ. गन्स्ट यांनी सहकाऱ्यांसमवेत केलेल्या निरीक्षणांच्या आधारे दिलेला होमविषयीचा निर्वाळा, जादूगार हेरेवर्ड कॅरिंग्टनचा युसेपिआविषयीचा अभिप्राय, ही उदाहरणे का बरे सांगू नयेत?

५) परामानसशास्त्रात अभ्यासल्या जाणाऱ्या विषयांसंबंधीची श्री तायडे यांची मते अर्थातच त्यांची वैयक्तिक मते होत. तथापि, जनसामान्यांनी प्रतिष्ठा-सूचन-वश न व्हावे म्हणून जाताजाता सांगावेसे वाटते की, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जादूगार पी. सी. सरकार (ज्युनिअर) पुनर्जन्म मानतात, टेलेपथिक ह्युसिनेशनची शक्यता मानतात आणि 'The talk about siddhis is not mere bunkum' असे म्हणतात. (पहा त्यांची मुलाखत 'तरुण भारत' (पुणे) ३–४–१९७९)

६) त्या त्या प्रयुक्तांना स्वतःचे साहित्य न वापरता व त्या त्या संशोधक प्रयोगकर्त्यांनी नियंत्रणाखाली ठेवलेल्या परिस्थितीत ज्या गोष्टी करून दाखवल्या त्या श्री. तायडे यांनी (हातचलाखीने) तीच नियंत्रणे स्वीकारून त्या त्या संशोधकांना करून दाखवाव्यात व त्यांची प्रमाणपत्रे प्रसिद्ध करावीत असे सुचवतो.

७ एप्रिल १९८४ व. वि. अकोलकर
पुणे

□ जादूगार तायडे यांच्या रोखठोक मुलाखतीबद्दल त्यांचे व ती प्रसिद्ध केल्याबद्दल आपले अभिनंदन.

आजकाल या ESP, पुनर्जन्म, वैश्विक जाणीव, सत्यनारायणातल्या वेव्हज्, बुवांचे व्हायब्रेशन्स असल्या 'स्युडो सायन्सवाल्यांनी' फारच पिढले होते. त्यांच्या शास्त्रसदृश परिभाषेमुळे सामान्य माणूस त्यावर सहज विश्वास ठेवायला तयार होत होता. काही तरी गूढशक्ति मानणे सामान्य माणसांना नेहमीच आवडते. त्याचा ही मंडळी पुरता फायदा उठवतात. ज्यांना या सर्व प्रकारातील फोलपणा समजावून घ्यावयाचा असेल त्यांनी मार्टिन गार्डनर यांचे Sciences-good bad and bogus हे पुस्तक अवश्य वाचावे.

१० एप्रिल ८४ — डॉ. शरद अभ्यंकर, वाई

¤ दि. २४ मार्च १९८४ च्या माणूसच्या अंकासंबंधी हे पत्र. अंक मनापासून आवडला. विधायक पत्रकारितेचा उत्कृष्ट नमुना म्हणून 'माणूस' च्या या अंकाकडे बोट दाखवावे इतकी आशयघनता अंकात आढळली. विशेषतः पंजाबच्या प्रश्नाचा मागोवा घेण्यासाठी प्रत्यक्ष पंजाबला जाऊन आलेल्या जाणकार व्यक्तींचे आपण प्रसिद्ध केलेले लेख मोलाचे आहेत. संजय संगवई यांच्या वार्तापत्राने खरोखरच वाचकांच्या अस्वस्थ मनाला कुठं तरी दिलासा मिळतो. निदान मला मिळाला. अविनाश धर्माधिकारी यांच्या लेखातून वास्तवाचं, अंगावर भीतीचा काटा आणणारं चित्रण असूनही त्यांनी व्यक्त केलेला आशावाद महत्त्वाचा. त्याचीच आज नितांत गरज. गेल्या दोन-चार दिवसांत पंजाबी परिस्थितीनं अत्यंत भीषण स्वरूप धारण केलेलं असूनही या दोन लेखांमुळं जी मानसिक उभारी मिळाली तीमुळं धीर वाटतोय !

अन्यथा बध्याची भूमिका घेणाऱ्या सवंग पत्रकारांनी खलिस्तानच्या जन्मपत्रिकाही तयार करून वाचकांच्या समोर ठेवल्यात. त्या पार्श्वभूमीवर माणूसचं कार्य ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. दोन्ही लेखकांचे अभिनंदन !

१० एप्रिल ८४

—व. अ. कुंभोजकर, औरंगाबाद

## तायडे – अकोलकरांच्या भिन्न भूमिका

¤ श्री. तायडें ह्यांची माणूसच्या ७–४–८४ अंकातील मुलाखत वाचल्यानंतर, माणूसच्या दि. ७–१२–८२ व २५–२–८४ चे अंकातील प्रा. अकोलकर ह्यांचे लेख पुनश्च काळजीपूर्वक वाचले. प्रथम ध्यानात येते ती गोष्ट ही की, उभय लेखकांची भूमिका, अंधश्रद्धा, फसवेगिरीच्याविरुद्ध व समाजप्रबोधनकार्याला उपकारक आहे असे वाटते. लेखकद्वयांनी आपले विचार प्रामाणिकपणे व्यक्त केले आहेत.

परंतु 'जादूविद्या ही सर्व शास्त्रांची जननी आहे' व 'जादू हे एक शास्त्र आहे.' ही श्री. तायडे ह्यांची विधाने मात्र न पटणारी आहेत. 'चमत्कार' म्हणून वाटलेल्या घटनांच्या सत्यस्वरूपाची शास्त्रीय संगतीबद्दलची जिज्ञासा ही खरी सर्व शास्त्रांची जननी होय. जादू म्हणजे भौतिक शास्त्रे व मानसशास्त्रीय अभ्यासातून ज्ञात झालेल्या तथ्यांचा (facts) व नियमांचा (principals) उपयोग करून सत्याचा आभास व चमत्कृतिद्वारा मनोरंजन करणारी एक उत्कृष्ट 'कला' आहे, शुद्ध भौतिक शास्त्र नव्हे.

काही बाबतीत मात्र, श्री. अकोलकर व श्री. तायडे ह्यांच्या मनोभूमिका भिन्न असल्याचे जाणवते. प्रगत विज्ञानाच्या विद्यमान टप्प्यावर काही काही प्रकारांचा (phenomena) उलगडा (scientific explanation) देता येत नाही, असे श्रेष्ठ शास्त्रज्ञ अगदी प्रांजलपणे कबूल करतात. अशा प्रकारांच्या बाबतीतील शास्त्रीय संशोधन, ते प्रकार ज्ञान-विज्ञानाच्या कक्षेत आणण्याचे, सातत्याने चाललेले प्रयत्न, ह्याचा आपल्या लेखनाद्वारा जन-सामान्यांना परिचय करून देणे, हा प्रा. अकोलकरांच्या लेखांचा उद्देश दिसतो. ही व अशा प्रकारची प्रयोगशीलता श्री. तायडे ह्यांना 'व्यर्थ' वाटते असे त्यांच्या मुलाखतीवरून वाटते.

प्रयोगशीलता हा सर्व शास्त्रांचा स्थायीभाव आहे. ह्यास अनुसरूनच, अन्य शास्त्रज्ञांप्रमाणेच, परामानसशास्त्रज्ञांचे, अज्ञाताला ज्ञात करून घेणारे प्रयत्न, 'मानव व निसर्ग' ह्यांच्याविषयीच्या विद्यमान ज्ञानात मोलाची भर घालू शकेल हे कुणीही मान्य करील.

मला वाटतं, 'फसवणूक' आणि 'चमत्कार' उघड करून देऊ शकणाऱ्या जादूगारांनी सर्व प्रकारच्या घटनांचे शास्त्रीय ज्ञान करून घेऊ पाहणाऱ्या प्रयोगशील वैज्ञानिकांशी सर्वोपरी सहकार्य करणं हा ज्ञानसंपादनाचा प्रशस्त मार्ग ठरेल.

१३ एप्रिल ८४ — धुं. ह. बेडेकर, निवृत्त वैज्ञानिक अधिकारी, संरक्षण मंत्रालय, पुणे


" विकासकार्याचा खरा अर्थ लोकांचा विकास इतर कुणी, सरकारने किंवा खाजगी संस्थांनी घडवून आणणे असा नसून लोकांना विकासासाठी सिद्ध करणे, त्यांच्यामध्ये विकासक्षमता निर्माण करणे असा आहे. असे झाले नाही तर विकासाचे प्रयत्न आणि परोपकार यात फरक उरणार नाही. म्हणजे कार्यकर्त्याला शेवटी झगडावे लागणार आहे ते समाजाच्याच काही विकासविन्मुख प्रेरणांशी. हा संदेश या पुस्तकात स्पष्ट आहे आणि तेच त्याचे मोल आहे. "

डॉ. स. ह. देशपांडे
अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

**श्रीग्रामायन**

श्री. ग. माजगावकर
राजहंस प्रकाशन, पुणे
मूल्य : पंचवीस रुपये

# पत्रकांनी सह्याद्री वाचणार नाही गरज आहे कृतीची, रणशिंगांची !!

प्रा. पुरुषोत्तम शेठ

साताऱ्याच्या शिवसागरचं आकर्षण निर्माण झालं तेथल्या जंगलांनी. शिवसागराच्या पार दृष्ट लागावं असं 'प्राइम' जंगल आहे. उडती खार, मलबार खार, अस्वलांचे चीत्कार, वाघाच्या डरकाळ्या या जंगलात ऐकू येतात आणि उन्हाचा कवडसाही आत-मध्ये येणार नाही याची काळजी घनदाट झाडोरा घेतो. उंचावर सूर्याकडे तोंड करून जाण्याची झाडांची स्पर्धा वाढते. अशा निःशब्द जंगलात वासोटा किल्ला येतो. वासोटा हायकिंग करणाऱ्यांचे एक आकर्षण. इतिहासातही आपल्या दुर्लक्षतेने गाजलेला.

विश्वासराव वाळके या वनाधिकाऱ्यामुळे वासोटयाच्या मोहिमा सुरू होतात. उजाड होणाऱ्या महाबळेश्वरला पर्याय असावा म्हणून वासोटयाकडे लक्ष जाते. दोनदा माझ्या बहादूर विद्यार्थ्यांच्या वनसंस्कार छावण्या घेऊन सामान्यांना वासोटा कासोटा सोडण्याइतपत कठीण न वाटावा म्हणून मी शिबिरे घेतली. जंगलातल्या अडचणी सोसून मी सहकाऱ्यांनिशी राबतो. विद्यार्थी घाम गाळतात. वनविभाग लोकाभिमुख होऊन प्रचंड परिश्रम घेतो. कोठेही चूक, खिळा न वापरता झोपडया उभारतो. शिबिरानंतर येणाऱ्या पांथस्थांनाही–प्रवाशांनाही आश्रय मिळावा, जंगलचे सुख मिळावे म्हणून वन-विभागाची ही मेहनत.

पुण्या–मुंबईचे पत्रकार जाऊ लागतात. विधानसभेत शिवसागरच्या काठावरील जंगलाची चर्चा होते. शासनाचे लक्ष जाते आणि 'चिपको'च्या आंदोलनात क्रौर्य करणाऱ्यांचे डोके भणभणते. कोळशाच्या वखारीला अखंड पुरवठा करणारा, हळूहळू स्वतःला छाटून घेणारा सह्याद्री आपल्याला साथ देणार नाही, याची भीती वाटू लागते. आता सह्याद्रीकडे लोकांचे डोळे लागणार आणि मग जंगलाचे वैर सुरू होते.

२२ मार्चला जागतिक वनदिन संपताच ६० वर्षांच्या म्हाताऱ्यापासून ४ वर्षांच्या पोरापर्यंत फौज गोळा करून मी वासोटयाला जातो. वनविभागाचे सहकार्य असते.

वासोटा येईपर्यंत झोपडयांचे कौतुक चालते. दुपारी भर १२ ची वेळ असते आणि मी माझ्या वृद्ध मातांना सांगतो, आता झोपडया येतील, तुम्हाला निवारा मिळेल. जागेवर पहातो तर साऱ्या झोपडयांची राख झालेली. आडोश्याला बांधलेल्या बाथरूम आणि संडास टिपून जाळलेले. भोजनाची शेड मोडून टाकलेली. मी चक्रावतो. वन-विभाग हे करणेही शक्य नाही महाराष्ट्राचे दुसरे नंदनवन वासोटा व्हावे म्हणून धडपड-णाऱ्या वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी स्वतःच झोपडया बांधलेल्या होत्या. हा उद्योग कोणाचा ?

वासोटयाकडे जाणाऱ्या शौकिनांचे या झोपडयांनी काय वाकडे केले होते ? मजा, शरारत, तारुण्यातील हा अवखळपणा म्हणा-यचा की, क्रूर आनंद लुटण्यासाठी केलेला खेळ म्हणायचा ? अशा विकृत स्वरूपात प्रकट होणाऱ्या अवखळ तारुण्याला काय म्हणू ? याची सुसंगती लागतच नाही. झोपडयांबरोबर सायलेंट व्हॅलीसारखे हे घनदाट जंगल जळले असते तर काय झाले असते ? ही क्रूर चेष्टा करणाऱ्यांचे हात कलम केले पाहिजेत !

चक्क कोयनेच्या पात्रात बामणोलीच्या मध्यभागी कोळशाच्या थप्प्या लागलेल्या आणि वासोटयाच्या पाठमोऱ्या कांदारी खोऱ्यातून लॉंच लॉंच भरून कोळसा येतो आणि या कोळशाच्या घाऊक व्यापाऱ्यांना पत्रकार वनप्रेमी यांचे आगमन कसे परवड-णार ? कारण सह्याद्रीचा स्वाहा त्यांना करायचा आहे. कोयनेचे धरण ओहोटले काय आणि भुंडा सह्याद्री पाहून कोणी रडले काय ? त्यांच्या लेखी जंगलाचे बारावे-बारसे सारखेच! यामुळे या झोपडया त्यांच्या आड येणाऱ्या होत्या. कारण सह्याद्री वाचवा ही मोहीम त्यांच्या हितसंबंधाच्या आड येणारी होती. खाजगी जंगल तोडता तोडता आपल्या धंद्यावर मूले कुठार येऊ नये म्हणून कुणी झोपडया जाळल्या का ? पुरावा नाही. कारण या मूक जंगलाच्या परिसरात साक्षी-दार कोण ?

शासनाने दिसायला छोटीशी घटना पण तिचा मोठा आशय लक्षात घ्यावा. कोयनेच्या धरणात कोळसा-वाहतुकीच्या लॉंचला बंदी घालण्याची गरज आहे. कोयनेच्या धरणातून दर मिनिटाला तीन हजार लिटर वेगाने पाणी लिकेज होते. धरणाची उंची आठ फुटांनी वाढवली; परंतु धरणाकाठचे जंगल असेच कोळसेवाल्या, वखारवाल्यांच्या माल-कीचे केले, तर वर्षाला ऐंशी फुटी वेगाने गाळ साठेल. शासनाने एकदा जाहीर करावे सह्याद्री महाराष्ट्रात नाही. तो उत्तर भार-तीय आणि पंजाबी शिखांना कोळश्यासाठी आम्ही आंदण दिला आहे. धरणग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यात आम्ही नपुसक ठरलो आहोत. त्यांच्या आर्थिक गरजा आम्ही भागवू शकत नाही. त्यांचे प्रश्न आम्ही सोडवू शकत नाही आणि म्हणून अर्जुनाने अग्नीची भूक भागवण्यासाठी खांडववन त्याला दिले, तसेच महाराष्ट्र शासनाने कोयनाकाठचे खाजगी जंगल हे सरदारजींना, पुरभैय्यांना खायला दिले आहे. त्यांनी चार–दोन दमडयांनी धरणग्रस्तांना पोट जाळायला मदत करावी आणि आपला सह्याद्रीचा खजिना मुंबईच्या आणि पुण्याच्या महाकाय शरीराच्या महा-नगरी अजगरांना बहाल करावा !

'सह्याद्री वाचवा' हा टाहो तुम्ही फोडा. बहिऱ्या कानांच्या, आंधळया डोळयांच्या महाराष्ट्र शासनाला तुमचे अरण्यरुदन ऐका-यचे नाही. मा. यशवंतराव चव्हाणांनी आपल्या मुख्यमंत्रीपदकाळात बंगल्याला नाव दिले 'सह्याद्री'. हा सह्याद्री झाला अतिथि-गृह आणि खरा सह्याद्रीही कोळशेवाल्यांचे आतिथ्य करीत आहे. स. प्रा. जोगळेकरांनी सह्याद्रीला अमर केले; परंतु यशवंतरावांचे वारसदार आज त्यांच्या अभिमान असणाऱ्या

सह्याद्रीला स्मशानकळा देऊन राहिले आहे. दिल्ली निवासी यशवंतराव तुम्ही परत एकदा तापोळ्यापासून कोयनानगरपर्यंत फिरा, तुम्हाला दिसेल ते फक्त तुटलेले जंगल! कोळशाच्या भरभरून जाणाऱ्या लाँचेस. नामदार वसंतदादांना महाबळेश्वर खूप आवडते. वसंतदादांनी थोडेसे तापोळ्याकडे पायउतार होऊन कोयनेकडे जावे म्हणजे त्यांना दिसेल हायवेला फिरणाऱ्या ट्रकप्रमाणे कोळशाच्या लाँचेसची ये-जा! त्यांचे शासन आता तरी ठोस वननीति घेईल काय? पंतप्रधान इंदिरा गांधींच्या वीस कलमी कार्यक्रमात वनप्रेमाला केवढे स्थान! पण महाराष्ट्र सरकारच्या लेखी हे आहे काय? मध्यप्रदेश सरकारने कोळसा पाडायला बंदी केली. निदान सह्याद्रीचा प्रांत हा कोळसा-बंदी विभाग म्हणून शासन जाहीर करील काय? जळलेल्या झोपड्या आणि बांधलेले रस्ते, मला सांगत होते, तुझे वनप्रेम एक विलापिकाच ठरणार! सर्पमित्र नीलिमाने सांगितले होते, या येथे शिबिर घेतलेस. उद्या तुला दारूच्या बाटल्या वेचण्यासाठी आणि कोळशाच्या गोणी मापण्यासाठी शिबिर घ्यावे लागेल. तिचाच इशारा खरा होता. महाराष्ट्र शासनाने सांगावे की, सह्याद्रीचे वस्त्रहरण आम्ही थांबवू शकणार नाही आणि वनप्रेमी डॉक्टर, बुद्धिमंत पक्षीनिरीक्षक यांच्यात हिम्मत असेल तर त्यांनी सुंदरलाल बहुगुणा बनावे. चंडीप्रसाद भट्टांच्या थाटात सह्याद्रीची लढाई लढावी तरच सह्याद्री वाचेल! अन्यथा तुमचा टणाणा चालू द्या. कोळसा जातच राहील. सरदारजींची माळमाळ होतील. शब्दांनी, पत्रांनी सह्याद्री वाचणार नाही. त्याला गरज आहे कृतीची, रणशिंगाची!

सातारा वनविभाग मात्र याबाबतीत पूर्णपणे निर्दोष आहे. असे माझे मत आहे. साधारणत: जंगलतोड म्हटली की, वनविभाग असे चुकीचे समीकरण केले जाते. आपल्यातल्या अनेकांना जंगलतोडीचे कायदे माहीत नाहीत. खाजगी जमिनीवरील जंगलतोड महसूलखात्याच्या परवानगीनेच होते. महसूलखाते हेच खरे आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करायला पाहिजे! महाबळेश्वर येथील हॉटेलमालकांनी केलेली जंगलतोड महसूलखात्याच्या परवानगीने केली. वाईच्या घाटावरील उंच वृक्षांच्या तोडीला तलाठ्यानेच परवानगी दिली हे सिद्ध झाले आहे. कोयनेच्या खोऱ्यातील शासकीय जंगल वनखात्याने सुरक्षित ठेवले आहे; परंतु खाजगी जमिनीवरील जंगलावर वनखात्याचा अधिकार नाही. खाजगी मालकीच्या डोंगरउतारावरील वृक्षांची तोड तहसीलदार, तलाठी यांच्या व महसूलखात्याच्या उच्च अधिकाऱ्यांच्या परवानगीने होते. महाबळेश्वरच्या 'अमीर' हॉटेलच्या मालकाने जंगलतोड न करण्याच्या परवानगीवर जमीन घेतली. एका वर्षात आठ दिवसांच्या आतच वेगाने ही जमीन बिगरशेती करून हॉटेल-बांधकामास परवानगी देण्यात आली. या सर्वांमध्ये महसूलखात्याची जबाबदारी मोठी आहे. सह्याद्रीच्या जंगलतोडीचे खरे जबाबदार महसूलखाते आहे; परंतु आतापर्यंत महसूलखात्याच्या या गैरव्यवहाराकडे कुणाचेही लक्ष गेले नाही. सह्याद्री वाचवायचा असेल तर पूर्णपणे वनखात्याकडे तो सोपविला पाहिजे! महसूल आणि वनखाते यांच्या परस्पर गुद्दागुद्दीत महसूलखात्याने सह्याद्रीचे मुंडन चालविले आहे व अधिकार नसल्यामुळे, वनखाते अगतिकपणे हताश झाले आहे; कारण वनखात्याचे सर्व मंत्री विदर्भातील. त्यांना विदर्भात अभयारण्ये करता येतात; परंतु महाबळेश्वरच्या थंड हवेपलीकडे सह्याद्रीशी त्यांचे नाते काय? त्यामुळे सह्याद्री उघडाबंब झाला तरी विदर्भातील वनमंत्र्यांना ना खंत ना खेद! पण सह्याद्रीच्या कुशीत जन्मलेल्या भोर, वाई, जावळी, पाटण, शिराळा, राधानगरीच्या लोकप्रतिनिधींना ही कळ लागत नाही काय? तीन मंत्री सह्याद्रीच्या कुशीतील आहेत. त्यांचा संबंध फक्त शिकारीपुरताच आहे काय? या मंत्र्यांनी, आमदारांनी लॉबी तयार केली तरच सह्याद्री वाचेल! शासकीय अधिकाऱ्यांच्या मर्यादा आहेत. एकटे वनप्रेमी अधिकारी व वनप्रेमी वृक्षमित्र अगतिक आहेत, बाळ सह्याद्री! तुझ्या कुशीत वाढलेल्या मंत्र्यांना लाज असेल तरच तुझे वस्त्रहरण थांबेल, अन्यथा तू फक्त वाळूचे टेकाड होणार!

□

## तरुण कार्यकर्त्यांना संधी

ग्रामायन गेली दहा वर्षे ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात काम करीत आहे. १९७८ पासून ग्रामायनने पुणे जिल्ह्याच्या दुष्काळी भागात ग्रामीण विकासाचे काही प्रकल्प हाती घेतले आहेत. या प्रकल्पांमध्ये मुख्यत: बंद पडलेल्या सामुदायिक उपसा सिंचन योजनांचे पुनरुज्जीवन, तसेच मागसवर्गीयांच्या संयुक्त शेतीसंस्था आदी प्रकल्पांचा समावेश आहे. संस्थेचे सध्या सहा गावांमध्ये एकूण आठ विकासप्रकल्प चालू आहेत व त्यासाठी संस्थेचे पाच पूर्ण वेळ कार्यकर्ते काम करीत आहेत. संस्थेच्या सध्या चालू असलेल्या प्रकल्पांपैकी एखाद्या प्रकल्पाची पूर्ण जबाबदारी घेणे, तसेच संस्थेच्या या कार्यक्षेत्रामध्ये चालवावयाच्या सामाजिक-शिक्षणाच्या विविध उपक्रमांची जबाबदारी घेणे यासाठी सध्या संस्थेला आणखी दोन पूर्ण वेळ कार्यकर्त्यांची आवश्यकता भासते आहे. तरी किमान दोन वर्षे पूर्ण वेळ सामाजिक काम करण्याची ज्या तरुणांची इच्छा व तयारी असेल त्यांनी संस्थेच्या पत्त्यावर त्वरित संपर्क साधावा. कार्यकर्त्याला योग्य ते मानधन दिले जाईल. कार्यकर्त्यांनी लिहिताना आपल्या अपेक्षेचा उल्लेख करावा.

**ग्रामायन**

७२०/१८, दीपक बंगला
नवी पेठ, लालबहादूर शास्त्री मार्ग
पुणे ४११०३०

## मंचर

# एक कॉलेज जेव्हा परिसर बदलून टाकते खडकाळ माळरानावर जेव्हा नंदनवन फुलवते

प्रा. द. ता. भोसले

शैक्षणिक संस्थांपासून आपली असणारी अपेक्षा तशी सांकेतिक स्वरूपाची आहे. ग्रामीण परिसरातील पालक तर कसलीच अपेक्षा न बाळगता मुलांना शाळेत पाठवितात आणि जे अपेक्षा करतात ते या संस्थांनी मुलांवर उत्तम प्रकारे संस्कार करावेत, त्यांच्या सुप्त गुणांचा विकास करावा, त्यांना चांगले ज्ञान मिळावे, त्यांना परीक्षेत उज्ज्वल यश लाभावे यासारख्या अपेक्षा बाळगतात; पण शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याबरोबरच सर्वांगीण उन्नती आणि कृषिविषयक उपक्रमाची प्रयोगशाळा म्हणून आता शिक्षणसंस्थांना कामगिरी बजावली पाहिजे. शासनाच्या योजना आणि कृषिविषयक प्रयोग शिक्षणसंस्थांनी राबविल्याशिवाय त्या त्या परिसराचा सर्वांगीण कायापालट होणार नाही. बदलत्या परिस्थितीत आता ही कामगिरी शाळा–कॉलेजना पार पाडावी लागणार आहे– निदान त्यांनी ती पार पाडली पाहिजे. या संदर्भात महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात अपूर्व ठरणारा एक वनशेती आणि फळप्रकल्प रयत शिक्षण संस्थेच्या अप्पासाहेब आवटे कॉलेजने (मंचर) राबवून नवी भूमिका पार पाडण्यात फार मोठे यश संपादन केलेले आहे यात शंका नाही. परिसरातील शेतकऱ्यांना ती एक आदर्श मार्गदर्शन करणारी प्रयोगशाळा बनलेली आहे. या कॉलेजचे प्राचार्य प्र. आ. तथा आण्णासाहेब पानवळ यांनी मोठ्या जिद्दीने, कष्टाने, समर्पित भावनेने अन् नानाविध अडचणींना तोंड देऊन या प्रकल्पाला जे रूप प्राप्त करून दिलेले आहे आणि या माळरानावर जे विविध प्रयोग करून दाखविले आहेत, त्यापासून शेतकऱ्यांना खूप काही होण्यासारखे आहे.

हा वनशेती व फळझाडांचा प्रकल्प राबवताना प्राचार्य पानवळांनी एखाद्या हाडाच्या शेतकऱ्याप्रमाणे प्रारंभी नियोजनपूर्वक सर्व गोष्टींचा सखोल अभ्यास केला. ‘ आण रोपटी आणि लाव मातीत ’ असला प्रकार त्यांनी केला नाही. कृषिविषयक माहिती देणारी मासिके, पुस्तके आणि एकेका फळझाडाविषयीची विशेष माहिती देणारी पुस्तके यांचा सखोल अभ्यास केला. पिकांना होणारे रोग, त्यावरील उपाय, संरक्षक स्वरूपाची उपाययोजना, त्यांना लागणारे खतपाणी इ. विविध अंगांचा चांगला अभ्यास त्यांनी केला आणि मगच शासनाने दिलेल्या ५५ एकरांत त्यांनी पारंपरिक स्वरूपात लागवड न करता नवा प्रयोग करण्यास प्रारंभ केला. कोणताही प्रयोग हाती घेण्यापूर्वी त्याची सर्वांगीण माहिती करून घेणे व पूर्वतयारी करणे याशिवाय तो प्रयोग यशस्वी होत नसतो. संभाव्य स्वरूपाच्या अडचणींचाही विचार अगोदर करणे आवश्यक असते. तो प्राचार्य पानवळांनी केलेला होता.

या वनशेती आणि फळझाडे-प्रकल्पाचा आणखी एक विशेष म्हणजे येथील निसर्ग आणि परिसराचा केलेला विचार. कृषिक्षेत्रातील एखादा लोकप्रिय आणि नवलपूर्ण प्रयोग करण्याचा मोह कुणालाही होणे स्वाभाविक आहे; पण तो प्रयोग या मातीत, परिसरात, हवामानात, पडणाऱ्या पावसात मूळ धरू शकेल का ? नैसर्गिक स्वरूपाची अनुकूलता किती, प्रतिकूलता किती याचा विचार करूनच तो हाती घेणे आवश्यक असते. आंबेगाव तालुक्याचा पूर्वभाग पावसाच्या मानाने तसा दुष्काळीच म्हणावा लागेल. मंचरच्या परिसरात वर्षाकाठी सरासरी १५ ते १८ इंच पाऊस पडतो. तोही अंगावर गुलाबपाणी शिंपडावे असा. या परिसरातील जमिनी हलक्या प्रतीच्या, माळरानाच्या, मुरमाचे प्रमाण असलेल्या. जमीन पुन्हा सखल स्वरूपाची कमी, जमीन कसाला साधारण, पाणी धरण्यात साधारण आणि हवामानही तसे प्रत्येक ऋतूत टोक गाठणारे. अशा या परिस्थितीचा विचार करूनच कृषिविषयक प्रयोग केले पाहिजेत. कमी पावसात, रोगराईला न जुमानणारी, माळरान असलेल्या निकृष्ट जमिनीत तग धरणारी झाडे लावून ती जगविली आहेत. त्यामुळेच या कॉलेजने चिंच, सीताफळ इ. ना विशेष प्राधान्य दिलेले आहे.

अण्णासाहेब आवटे कॉलेजच्या या वनशेतीपासून घेण्यासारखा बोध म्हणजे जिद्दीचा आणि चिकाटी असलेला एखादा ध्येयवादी प्राचार्य स्वतःला झोकून देणारा असेल तर खडकालाही चैतन्याचे हिरवे लसलसते पान तो उत्पन्न करू शकतो. उजाड, ओसाड अन् खडकाळ डोंगराच्या बरगड्यांतून देखील हिरव्या जादूची लावण्यलतिका साकार करू शकतो. गवताचे पातेही उगविण्यास अपात्र असलेल्या माळरानावर तो हिरव्यागार बाहूंनी आकाशाला कवेत घेणारी गर्द गहिरी आणि घुमटाकार वनराई उभी करू शकतो. निसर्गावर मात करता येते. विपरीत स्थितीला अनुकूल करून घेता येते. माळाला मळ्याचे रूप देता येते, विरोधातून विकास साधता येतो, याचे मूर्तिमंत अन् नवलपूर्ण रूप म्हणजे प्राचार्य पानवळांनी उभी केलेली ईश्वरी दरबारातील पानाफुलांची रंगीत फौज–पलटण म्हणता येईल ! त्यातून शिकण्यासारखी आणखी एक गोष्ट म्हणजे

या खडकावर देखील कोणतेही फळझाड लावून जगविता येते हा आत्मविश्वास ! म्हणून या ठिकाणी आंब्यांच्या सर्व जातींची झाडे आता वयात आलेली आहेत. नारळ, फणस, सफरचंद, केळी, पेरू, डाळिंब, अंजीर, लिंबू, पपई, कढीलिंब, चेरी, ओवा यांसारखी नानाविध जातींची झाडे फलोत्पादनक्षम झालेली आहेत. परिसरातील शेतकऱ्यांना आता कसल्याही जमिनीत, कोणत्याही प्रकारचे झाड जगू शकते, येऊ शकते याचा आत्मविश्वासपूर्ण प्रत्यय येऊ लागलेला आहे. उत्पादनवाढीसाठी अन् नवनवीन प्रयोगशीलता दाखविण्यासाठी आवश्यक असलेला आत्मविश्वास या प्रकल्पाने शेतकऱ्यांच्या अंतःकरणात खोलवर रुजविला आहे. त्यामुळेच अवतीभवतीच्या अनेक शेतकऱ्यांनी याचेच अनुकरण करून उजाड माळरानाचे नंदनवन बनविलेले आहे.

खडकाळ जमिनीवर कृषिविषयक असा नवा प्रयोग करीत असताना पाण्यासारखा पैसा खर्च करून भागत नाही. प्रयोग तात्त्विकदृष्टचा यशस्वी; पण व्यावहारिकदृष्टचा आतबट्ट्याचा म्हणून अयशस्वी ठरून चालत नसतो. तो शेवटी आर्थिकदृष्टचाही परवडला पाहिजे, पेलला पाहिजे. यासाठी स्वाभाविकच उपलब्ध साधनसामुग्रीचा वापर करताना काटकसर अपेक्षित असते. जेथे जेथे शक्य असेल तेथे तेथे काटकसर करावी लागते. ही काटकसर आणि नैसर्गिक परिस्थितीचा अभ्यास यातूनच या प्रकल्पाने काही नवे प्रयोग करून दाखविले आहेत. आंब्यासारखे झाड कलमी असल्याशिवाय त्याला चांगले उत्पन्न येत नाही; पण कलमी तयार रोप कोकणातून वा विद्यापीठातून आणून लावण्यात दोन धोके असतात. एक तर नाजूक प्रकृतीचे हे कलमी रोप या हवामानाला तग धरू शकत नाही आणि हजारोंच्या संख्येने कलमी रोपे आणून लावणे आर्थिकदृष्टचा परवडणारेही नाही. पन्नासएक रुपयांना विकत घेऊन लावलेले रोप निसर्गाशी झगडताना जमिनीवर झोपले तर त्याचा काय फायदा ? म्हणून गावठी आंबा प्रथम लावून त्याची जोपासना केल्यावर, या हवामानाला टक्कर देण्यात ते यशस्वी झाल्यावर, मग त्यावर कलमी आंब्याचे कलम केले तर रोपांच्या मृत्यूचे प्रमाणही कमी होते आणि आर्थिकदृष्टचाही परवडते. ही दृष्टी या ठिकाणी वापरलेली आपणास दिसेल. तसेच दोन आंब्यांच्या रोपांमध्ये भरपूर मोकळी जागा सोडावी लागत असल्याने जमीन नापीक राहते. तिच्यापासून उत्पन्न मिळत नाही. म्हणून दोन झाडांच्यामध्ये तात्पुरते पीक घेऊन त्यांचा खर्च भागविण्याचा प्रयोग येथे यशस्वी करून दाखविला आहे. तसेच चार आंब्यांमध्ये नारळाचे एकेक रोप लावल्याने त्याच्या वाढीला अडथळा न येता उत्पन्नात वाढ होऊ शकते. एकाच प्लॉटमध्ये एकाच प्रकारची झाडे लावली तर त्यांना लागणारे खाद्य एकाच प्रकारचे असल्याने ते सर्वांना भरपूर प्रमाणात मिळत नाही म्हणून वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावून सर्व प्रकारचा जीवनरस वृक्षांना लाभण्याचा प्रयोग यशस्वी झालेला आहे. त्यामुळे जमिनीच्या पोतावरही अनिष्ट परिणाम होत नाही हे या प्रकल्पाने सिद्ध करून दाखविले आहे. तसेच आपल्या जमिनीत मनासारखे पीक येत असले तरी तिची मधूनमधून तपासणी करणे आवश्यक असते आणि त्यामध्ये जी कमरता जाणवेल त्याची पूर्तता केल्याशिवाय जमिनीची निर्मितिक्षमता वाढत नसते हे प्रकल्पाने इतरांना दाखवून दिले आहे. चाळीस हजारांच्या आसपास लावलेल्या झाडांची योग्य प्रकारे वाढ झालेली आपणास जी दिसते त्याचे महत्त्वाचे कारण शास्त्रीय भूमिकेत सामावलेले आहे.

## मुरुमाचे मातीत रूपांतर

शासनाकडून मिळालेली जमीन कोणत्या प्रकारची होती याचा उल्लेख वर येऊन गेलेला आहेच. अशा मुरमाच्या आणि माळाच्या जमिनीत खड्डे खणून नियोजनपूर्वक वनशेती करताना प्रारंभी आलेली फार मोठी अडचण म्हणजे सुपीक आणि गाळाच्या मातीची टंचाई. चाळीस हजार खड्ड्यांमध्ये गाळाची सुपीक माती आणून भरणे हे अशक्य कोटीतले नसले तरी व्यवहार्य नव्हते. म्हणून प्राचार्य पानवळांनी मोठा कल्पक असा प्रयोग करून पाहिला. मुरमाचेच सकस आणि उपजाऊ मातीमध्ये रूपांतर करण्याचा प्रयोग केला. खड्ड्याच्या शेजारी असलेला मुरूम त्यांनी वापरताना, त्यात शेण, पालापाचोळा, गवत, पानगळ इ. ची भर घातली आणि त्यात पाणी सोडून त्या मुरमाचे कसदार जमिनीत रूपांतर केले. आपण आता ही झाडे पाहिली तर असे दिसेल की, आळ्यामध्ये–बुंध्याभोवती उत्तम दर्जाची जमीन–माती–आहे आणि आळ्याच्या शेजारी दगडधोंड्यांनी माखलेला माळ आहे ! प्रथमतः पाहाणाऱ्याला, बाहेरून माती आणून या आळ्यात भरली असावी, त्यामुळेच एवढी बाळसेदार आणि सतेज झाडे आलेली आहेत असे वाटते; पण खरा प्रकार तसा नाही. तेथल्याच मुरमाचे मातीत रूपांतर करण्याचा अल्पखर्चाचा पण बहुमोल असा प्रयोग प्राचार्य पानवळांनी सिद्ध करून दाखवला आहे ! वरखतांपेक्षा या प्रकारे तयार होणारा मातीचा कस अत्यंत दर्जेदार अन् टिकाऊ असतो हे आता सर्वांनाच मान्य झालेले आहे. प्राचार्य पानवळांनी केलेला हा प्रयोग या परिसराच्या दृष्टीने मोठा मौलिक म्हणता येईल. आपल्या माळरान जमिनीत पेरलेले काहीच येत नाही व हलक्या प्रतीच्या जमिनीचा तसा उपयोगच नाही असा हताश उद्‌गार काढून निष्क्रिय झालेल्या शेतकऱ्यांच्या मनामध्ये स्वप्नांची झुंबरे यामुळे उजळून आल्याशिवाय राहणार नाहीत, यात शंका नाही.

या परिसरातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने या प्रकल्पाने केलेली आणखी एक नवलाईची गोष्ट म्हणजे पाण्याचा केलेला वापर आणि त्यासाठी केलेले व्यवहार्य प्रयोग असे म्हणता येईल. अत्यंत कमी पर्जन्यमान असताना इस्राएलने ज्याप्रमाणे पाण्याच्या शास्त्रशुद्ध वापराने क्रांती करून दाखविलेली आपण ऐकतो, त्याप्रमाणेच येथे पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा अतिशय काळजीकाटचाने वापर करून वनशेती यशस्वी करून दाखविली आहे. पाण्याची भीषण टंचाई असतानाही चार ते दहा वर्षांची चाळीस हजार झाडे आग ओकणाऱ्या उन्हाळ्यात टवटवीत रूपात कशी ठेवता येतात, याचे जणू प्रायोगिक प्रात्यक्षिकच प्राचार्य पानवळांनी या भागातील शेतकऱ्यांसमोर ठेवलेले आहे ! बाकी कशासाठी नसले तरी पाणीटंचाईवर केलेली मात यासाठी तरी या प्रकल्पाचे कौतुक करायला हवे ! पाण्याच्या टंचाईवर मात करताना कोणकोणते प्रयोग केले हे

खरोखर पाहण्यासारखे आहे ! पावसाळ्यात ओढ्याला आणि विहिरींना पुरेसे पाणी असते म्हणून प्रसंगी उघड्या पाटाने झाडांना पाणी दिले जाते; पण अशा प्रकारचे भाग्य अल्पकाळचे असल्याने उघड्या पाटाने डोंगर-माथ्यावरच्या टाकीतून सर्व झाडांना पाणी देताना पाण्याचा फार मोठा भाग नाहक वाया जातो. निम्मे पाणी रोपाच्या बुंध्यात जाईपर्यंत वाटेतच जिरते, वाया जाते. ही होणारी नासधूस परवडणारी नसते. कारण इथे पाणी तुपापेक्षाही अधिक काळजीने वापरावे लागते. म्हणून डोंगरमाथ्याच्या टोकापासून ठिकठिकाणी चेंबर्स बांधून पाइपलाइनने पाणी फक्त झाडाच्या बुंध्यातच घालण्याचा प्रयोग केला जातो. त्यामुळे पाण्याची वाटेवर होणारी नासधूस थांबते. आळ्यात घातलेले पाणी अधिक काळ टिकावे, त्याचे सूर्यकिरणांनी जलद बाष्पीभवन होऊ नये म्हणून त्या आळ्यामध्ये पालापाचोळ्याचा गालिचा अंथरला जातो आणि तो उडून जाऊ नये म्हणून त्यावर जवळचा मुरूम टाकला जातो. या प्रयोगाने पाण्याचे बाष्पीभवन होण्याचे टळतेच; पण ओल्या जमिनीवर टाकलेला पालापाचोळा कुजून त्यामुळे मुरमाड जमिनीचे कसदार जमिनीत बघता बघता रूपांतरही होते. अन् ही कसदार जमीन पाणी अधिक साठवून ठेवते. पिकांना अन्नरस चांगल्या प्रकारे पुरविते आणि पाण्याचा सदुपयोग करण्यास मदतही करते. अशा प्रयोगातून पाणी पिण्याचे भाग्यही फार काळ झाडांना लाभत नाही. फेब्रुवारी–मार्चअखेर विहिरींना अतिशय कमी पाणी राहते. त्या वेळी जरा जाणत्या अन् थोराड झालेल्या झाडांना दर वीस दिवसांनी पाणी दिले जाते. लहान रोपांना जरा लवकर पाणी दिले जाते आणि त्यातूनही तीव्र टंचाई उत्पन्न झाल्यावर मात्र एकेका मडक्यात पाणी भरून ते मडके झाडाच्या बुंध्यात गळ्याइतके पुरले जाते ! आणि त्यातून पाझरणाऱ्या पाण्याने ओल्या होणाऱ्या मातीवर ही कोवळी कोवळी बाळे हातावरच्या फोडाप्रमाणे काळजी–काटद्याने जगविली जातात–वाढविली जातात. सपाटून लागलेल्या तहानेवेळी कसेबसे घोटभर पाणी देऊन एखाद्याचे समाधान करावे, अशातली ही गत झाली ! बाकी यामुळे पाण्याची टंचाई असताना देखील कल्पकता व जिद्द असेल तर माणूस कृषिक्षेत्रात कोणते नवल घडवू शकतो याचा बोध यातून घेण्यासारखा आहे.

या वर्षापासून तर पाण्याची टंचाई फारशी राहणार नाही. म्हणून सुमारे एक लाख सुबाभुळ डोंगरउतारावर टोचलेली आहे. शासनाच्या मदतीने बांधलेल्या तलावात या वर्षापासून मत्स्यशेतीचा एक अनोखा प्रयोग कॉलेजने सुरू केलेला आहे. स्वतःची गरज भागविण्यासाठी एक छोटीशी रोपवाटिकाही तयार करून त्यातल्या त्यातही सुग्रणपणा दाखविला आहे. एखाद्या वयोवृद्ध वा रुग्णाइतालाही विनाश्रम सारी वनशेती पाहता यावी यासाठी नजरा बांधून घेणाऱ्या नागमोडी रस्त्यांची नक्षी साऱ्या प्रकल्पाला कवेत घेत आहे. डोंगरमाथ्यावरील पावसाचे पाणी वाया जाऊ नये म्हणून वरती चर खणून त्याचे पाट आपल्या पाझर तलावात वळविण्याचा प्रयोगही केलेला आहे. एका पाझरतलावातील जादा होणारे पाणी सरळ खाली ओढ्याला सोडून देण्यापेक्षा ते एका छोट्या पाटाने दुसऱ्या तलावात सोडण्याची कल्पकता येथे योजलेली आहे. विहिरींना पाणी कमी पडू नये म्हणून विशेष अशी योजनाही साकार केलेली आहे. उद्या एखाद्याला धुंद चांदण्यात आपल्या साथीदाराबरोबर स्वर्गीय सुखाचे चार क्षण रुपेरी तलावाच्या साक्षीने व्यतीत करावयाचे स्वप्न पुरे करावेसे वाटले तरी त्याची सोयही या प्रकल्पात आपणास दिसेल. नैसर्गिक सौंदर्य, मानवी बुद्धिमत्ता अथवा परिश्रम, व्यावहारिक उपयुक्तता आणि सर्वस्पर्शी प्रयोगशीलता यांचे ललितमधुर आणि ललितमोहक असे साकारलेले हिरवे स्वप्न म्हणजे प्राचार्य पानवळांनी उभी केलेला ही वनशेती होय ! डोळे भरून पाहिल्याशिवाय या चमत्काराला नमस्कार करावासा वाटणार नाही एवढेच सांगावेसे वाटते! □

एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला ?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

**लेक वालेसा**

डॉ. श्रीकांत मुंदरगी

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

श्याम वेगळा आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस श्यामचे काही राधाचे**

फिरोझ रानडे
पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

# इचलकरंजी ते हैदराबाद

सुभाष काळे

**रवींद्र म्हात्रे यांना उत्स्फूर्त 'बंद' पाळून श्रद्धांजली वाहणाऱ्या इचलकरंजीच्या हिंदु-एकतावाद्यांना भीषण मारहाण सहन करावी लागली. करीमनगर, वरंगळ, निझामाबाद, आदिलाबाद, नलगोंडा भागात संघस्वयंसेवकांचे खून पडले ! हे खून कोणी पाडले ?**

बंदच्या दिवशी (९।२।८४) सकाळी ६ वाजता उठून सहा ते सातच्या दरम्यान मी शहरातून फेरफटका मारला. लोक आपापली दुकाने बंद ठेवून म्हणजे न उघडताच बाहेरच्या पायऱ्यांवर गप्पा मारीत बसलेले होते. पोलीस फिरून त्यांना दुकाने उघडण्याचा आग्रह करीत होते. अर्थात पोलिसांचे कोणीच ऐकले नाही. उलट ते कटकट नको म्हणून घरोघर निघून गेले. मी एस. टी. स्टँडवरील पेपर-स्टॉलवरून पेपर्स घेऊन गांधीकँपकडे निघालो असतानाच नदीवेस भागात काही तरी गडबड घडल्याचे मला समजले. तेव्हा मी गांधीपुतळ्याजवळ असलेल्या 'स्वरसुधा साउंड सर्व्हिस' या माणगावकरांच्या दुकानापाशी येऊन दिलीप माणगावकर व अरुण जोशी यांना बरोबर घेतले व नदीवेसला गेलो; पण तेथे काहीच न आढळल्याने गावभाग-स्टेशनवर गेलो. त्यानंतर दिवसभरात काय काय प्रकार घडले हे इचलकरंजी हिंदुएकताचे अध्यक्ष श्री. मुरदंडे यांच्या निवेदनावरून स्पष्ट होईल. हे निवेदन त्यांनी दि. १३।२।८४ रोजी कोल्हापूरचे सहाय्यक जिल्हा पोलीसप्रमुख श्री. दिलीप हेबळे यांना सादर केलेले आहे. ते पुढीलप्रमाणे–

इचलकरंजी
दि. १३।२।८४

प्रति,
मा. सहाय्यक जिल्हा पोलीसप्रमुख
कोल्हापूर.

अर्जदार :– गजानन शंकर मुरदंडे
अध्यक्ष, हिंदुएकता आंदोलन
शाखा–इचलकरंजी, जि. कोल्हापूर.

विषय :– ब्रिटनमधील भारताचे उपउच्चायुक्त कै. रवींद्र म्हात्रे यांच्या हत्येच्या निषेधार्थ बंद पुकारला असताना पोलिसांनी हिंदुएकता आंदोलनाच्या कार्यकर्त्यांना केलेल्या अमानुष मारहाणीबाबत.

महोदय,

हिंदुएकता आंदोलन ही संघटना सन १९८१ पासून इचलकरंजी शहरात कार्य करीत आहे. हिंदुएकता आंदोलन ही संघटना कोणत्याही जातिधर्माविरुद्ध नाही, तर ती पूर्णपणे राष्ट्रवादी विचारांनी भारलेल्या तरुणांची संघटना आहे. या संघटनेत मुस्लिम व ख्रिश्चन धर्मांचे अनेक कार्यकर्ते आहेत. हिंदुएकता आंदोलन या संघटनेच्या नावात असलेला 'हिंदु' हा शब्द धर्मवाचक नसून हिंदुस्थानात राहणारा तो हिंदु या अर्थाने राष्ट्रवादी आहे.


आम्ही राष्ट्रवादी विचाराचे तरुण असल्याकारणाने या देशाच्या संदर्भात घडणाऱ्या बऱ्या–वाईट घटनांची नोंद घेणे स्वाभाविक आहे. साहजिकच भारताचे लंडनमधील उच्चउपायुक्त कै. रवींद्र म्हात्रे यांचे हत्येने आम्हाला धक्का बसला. आमचे दुःख व्यक्त करण्यासाठी व ज्या म्हात्रे कुटुंबाने आपला सुपुत्र देशाला अर्पण केला त्या म्हात्रे कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होण्यासाठी इचलकरंजी शहरातील नागरिकांना दि. ९।२।८४ रोजी हरताळ पाळून श्रद्धांजली वाहण्याचे आवाहन केले. हे आवाहन करण्यापूर्वी दोन दिवस आधी म्हणजे दि. ७।२।८४ मंगळवार सायंकाळी पाच वाजता मी व इचलकरंजी शहराचे संघटक श्री. अरविंद जोशी यांनी इचलकरंजी शहराचे इंचार्ज डी. वाय. एस. पी. व पोलीस-इन्स्पेक्टर श्री. हिंदुराव पाटील यांची भेट घेऊन त्यांना बंदविषयीच्या कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. तसेच बंदनंतर सायंकाळी सहा वाजता इचलकरंजी शहरातील सर्व नागरिकांच्या वतीने कै. रवींद्र म्हात्रेंना आदरांजली वाहण्यासाठी आयोजित करण्यात केलेल्या शोकसभेला परवानगी देण्याची विनंती केली होती.

दि. ८।२।८४ रोजी आम्ही संघटनेच्या वतीने एक पत्रक प्रसिद्ध करून, तसेच शहरात रिक्षा फिरवून लाउडस्पीकरवरून लोकांना शांततेने बंद पाळण्याचे आव्हान केले होते.

दि. ९।२।८४ रोजी इचलकरंजी शहरातील नागरिकांनी आमच्या आवाहनानुसार स्वयंस्फूर्तीने संपूर्ण हरताळ पाळला. बंददिवशी आमच्यापैकी कोणीही कार्यकर्ता घराबाहेर पडलेला नसताना लोकांनी स्वतः होऊन दुकाने बंद केली. संपूर्ण शहरात एक देखील दुकान उघडे नव्हते ! पोलीस व पोलीस-अधिकाऱ्यांनी सर्व शहरभर फिरून लोकांना दुकाने उघडून बंद न पाळण्याचे आवाहन केले; पण ते लोकांनी मानले नाही व दुकाने उघडणेस नकार दिला. हा अपमान सहन न झालेल्या पोलीस व पोलीसअधिकाऱ्यांनी शहरभर धुडगूस घालून हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांवर हल्ले चढविले. त्यांना अक्षरशः जनावरासारखी मारहाण करून पोलिसांनी त्यांचा अमानुष छळ केला. बंदच्या दिवसभरात पोलिसांनी जी रानटी वर्तणूक केली त्यातील काही पुढे देत आहे.

१) बंद दिवशी सकाळी सहा वाजता नदीवेस भागात बस जाळण्यात आल्याचे सांगणेत येऊन पोलिसांनी वातावरण तंग

बनविले व शहरभर सायरन वाजवीत गाड्या फिरविल्या. दिसेल त्या हिंदुएकताच्या कार्यकर्त्याला पकडून बुटांच्या लाथांनी मारहाण केली. वस्तुत: नदीवेसला बस अगर इतर कोणतेही वाहन जाळण्याचा प्रकार घडलेला नव्हता. कुणी तरी अज्ञात व्यक्तीने ५-६ दगड व एक लाकडाचा ओंडका रस्त्यावर आडवा टाकला होता. तो कोणी टाकला हे माहीत नसताना केवळ निमित्त पुढे करून पोलिसांनी बस जाळल्याचे खोटे वृत्त शहरभर पसरविले व हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांची धरपकड करून मारहाण केलेली आहे. पोलिसांच्या मारहाणीत केवळ हिंदुएकतेचे कार्यकर्ते सापडले नसून अनेक नागरिकही पोलिसांच्या मारहाणीत सापडले व ते अद्यापही पोलीसकस्टडीत आहेत. या मारहाणीचे समर्थन श्री. हिंदुराव पाटील यांनी लाठीचार्ज करताना केले आहे; पण ते पूर्णपणे खोटे आहे. सकाळी नदीवेस भागात कोणताही जमाव जमलेला नव्हता. इतकेच नव्हे तर चार-पाच माणसे देखील नव्हती, हे आपण लक्षात घ्यावे. जमाव नसताना लाठीचार्ज करण्याचा प्रश्न येतोच कुठे?



डावीकडून : उदय पोवार, विजय कुलकर्णी, रवि घोरपडे
हिंदुएकताचे कार्यकर्ते

¤

२) सकाळी ८ वाजता नदीवेस भागात बस जाळल्याचे वृत्त समजताच पुणे येथील साप्ताहिक माणूसचे प्रतिनिधी श्री. सुभाष काळे हे आमच्या दोन कार्यकर्त्यांना श्री. अरुण जोशी व दिलीप माणगावकर यांना घेऊन नदीवेस भागात वस्तुस्थिती पाहण्यासाठी तेथे गेले; पण तेथे त्यांना काहीच आढळले नाही. तेव्हा ते परत गावभाग पोलीसस्टेशनमध्ये गेले असताना हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांना पोलीस बडवत असल्याचे दृश्य त्यांना पहायला मिळाले. तेव्हा श्री. सुभाष काळे यांनी डी. बी. ब्रँचचे कॉन्स्टेबल श्री. शहापुरे यांनी 'यांना मारहाण करायची नाही तर काय त्यांच्या पाया पडायचे काय?' असे उद्धटपणे उत्तर देऊन परत हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांना बडवायला सुरुवात केली. श्री. काळे व शहापुरे यांचा हा संवाद चालू असताना आमचे कार्यकर्ते अरुण जोशी व दिलीप माणगावकर तेथे जवळच होते.

३) श्री. शहापुरे ऐकत नाहीत हे पाहून श्री. काळे हे माणगावकर व जोशींना बरोबर घेऊन इन्स्पेक्टर हिंदुराव पाटील यांच्याकडे गेले. त्या वेळी तेथे डी. वाय. एस. पी. श्री. ए. आर. पाटीलही आलेले होते. श्री. काळे यांनी हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांना विनाकारण होत असलेल्या मारहाणीबद्दल नापसंती व्यक्त केली. त्या वेळी हिंदुराव पाटील यांनी पकडलेल्या हिंदुएकतेच्या दोन कार्यकर्त्यांना कबुलीजबाबासाठी श्री. काळे यांच्यासमोर उभे केले. त्यानंतर त्या कार्यकर्त्यांना लॉकअपकडे नेत असताना काठ्यांनी मारहाण होत आहे, हे आमच्या कार्यकर्त्यांनी श्री. काळे यांच्या परत लक्षात आणून दिले. तेव्हा श्री. दिलीप माणगावकर, श्री. काळे व अरुण जोशी हे तिघेही लॉकअपकडे गेले तेव्हा श्री. शहापुरे व ट्रॅफिकचे सबइन्स्पेक्टर श्री. इंगळे हे स्वत: हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांना लाथा-बुटांनी मारहाण करीत असलेचे दिसून आले.

४) हा प्रकार चालू असताना पोलीसकंट्रोलरूममधून सांगलीरोडला बस पेटविण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्या वेळी स्वत: श्री. काळे, तसेच दिलीप माणगावकर व अरुण जोशी हे पोलिसांच्या गाडीतून घटनास्थळी गेले. ते घटनास्थळ पोलीसस्टेशनपासून अवघ्या एक फर्लांगावर होते. तेरा पोलीस जीप्स, एक एस. आर. पी. ची गाडी-फायर फायटर्स अशी एकूण १६ वाहने सायरनचा आवाज करीत घटनास्थळी पोचली. तेथे एका बसला कोणी तरी २-३ दगड मारल्याचे आढळून आले. त्यात फक्त एक काच फुटून किरकोळ नुकसान झाले होते. अशा प्रकारे खोट्या व विपर्यस्त बातम्या पसरवून दहशत निर्माण करण्याचे प्रयत्न स्वत: पोलीसखात्याकडूनच केले जात होते.

५) श्री. काळे यांना माहिती देण्यासाठी म्हणून बरोबर गेलेल्या दिलीप माणगावकर व अरुण जोशी यांना पोलिसांनी बसवून घेतले व त्याचप्रमाणे मला निरोप पाठवून बोलावून घेतले आणि अटक केल्याचे सांगून काहीही कारण नसताना आम्हा तिघांना सायंकाळी ५ पर्यंत एका खोलीमध्ये डांबून ठेवले. दिवसभर जेवण तर दूरच पण साधे पाणीदेखील पिण्यासाठी दिलेले नाही.

६) श्री. काळे बंदची परिस्थिती पाहण्यासाठी शहरभर फिरत होते, ते ज्या स्कूटरवरून फिरत होते, ती स्कूटर हिंदुएकतेचा कार्यकर्ता सतीश देसाई हा चालवीत होता. ती

स्कूटर दिलीप माणगावकर यांची होती. स्कूटरमधले पेट्रोल संपले म्हणून ही स्कूटर माझ्या घराजवळ उभी करण्याच्या हेतूने देसाई यांनी ती मंगळवारपेठेतील माझ्या घराकडे नेली. तेवढ्यात पोलिसांची गाडी आली. ती गाडी स्वतः हिंदुराव पाटील चालवीत होते. पोलीसगाडी स्कूटरजवळ येऊन थांबली. पोलिसांनी देसाई याला स्कूटरवरून खाली खेचले व तेथेच रस्त्यावर बेदम बडविले. त्या वेळी देसाईला पोलीसगाडीचा ड्रायव्हर दस्तगीर ऐतवडे हा कमरेचा पट्टा काढून मारीत होता, तर ट्राफिकचे सबइन्पेक्टर श्री. इंगळे हे भर रस्त्यावर देसाईला बुटाने बडवीत होते. त्यांनी देसाईचा चष्माही फोडला. हे दृश्य पाहण्यासाठी सुमारे शंभर ते दीडशे माणसे जमलेली होती. पोलीस फक्त सतीश देसाईलाच मारहाण करून थांबले नाहीत तर त्यांनी आजूबाजूला उभ्या असलेल्या लोकांनाही मारहाण केली. नंतर सतीश देसाईचा मोठा भाऊ, ज्याचा हिंदुएकतेशी कसलाही संबंध नाही, त्याला त्याच्या घरी जाऊन रस्त्याने बडवीत पोलीसस्टेशनवर आणले व दिवसभर डांबले. तसेच झडती घेण्याच्या नावाखाली ८–१० पोलिसांनी त्यांच्या घरात घुसून बायका–मुलांना शिवीगाळ करून घरातील सामानाची फेकाफेक केली.

७) हिंदुएकतेचे तालुका अध्यक्ष श्री. आप्पासाहेब ताटे हे गेल्या आठवड्यापासून मुंबईला गेले आहेत. त्यांचा १६–१७ वर्षांचा मुलगा जयंत ताटे, ज्याचा हिंदुएकतेशी कसलाही संबंध नाही, त्या जयंतला पोलिसांनी त्याच्या घरात घुसून बडवीत पोलीसस्टेशनला नेले व दिवसभर डांबून ठेवून रात्री सोडले.

८) मदन शेटके नावाचा १६–१७ वयाचा तरुण फोटोग्राफीचा व्यवसाय करतो. तो नेहमी हिंदुएकता संघटनेचे फोटो काढीत असतो. तो आकस मनात ठेवून पोलिसांनी तो राजाराममैदानावर क्रिकेटमॅच बघत असताना तेथून मारहाण करीत आणले. या १६–१७ वर्षे वयाच्या तरुणाला लॉकअपमध्ये एका वेळी २०।२० पोलिसांनी बेदम मारहाण केली. ही अमानुष मारहाण चालू असताना स्वतः हिंदुराव पाटील आमच्या कार्यकर्त्यांना आई–बहिणीवरून शिवीगाळ करीत होते.

९) पकडण्यात आलेल्या दया जगताप, उदय बुचडे, रवींद्र शिंदे, विष्णु ढवळे, सतीश देसाई, रघुनाथ जाधव या कार्यकर्त्यांना पोलिसांनी लॉकअपमध्ये अमानुष मारहाण केली. त्यांच्या अंगावरील कपडे फाडून त्यांना नग्न करून बेदम झोडपले. या सर्वांना फाटलेल्या कपड्यांसहित दि. १० फेब्रुवारी ८४ रोजी कोर्टापुढे उभे करण्यात आले होते. त्या वेळी 'साहेब, मला फाशी द्या पण मला पोलीसकस्टडी नको!' अशी किंकाळी विष्णु ढवळे यांनी भर कोर्टात फोडली. यावरून मारहाणीचा प्रकार किती भयानक असू शकेल याची आपण कल्पना करू शकता. ही मारहाण करण्यामध्ये ट्राफिकचे सबइन्स्पेक्टर श्री. इंगळे, सखाराम चव्हाण, दस्तगीर ऐतवडे, श्री. सिंगण, बैजु लोहार, हुंडे, शहापुरे, माळी, भोसले, गुरव हे पोलीस आघाडीवर होते.

१०) बहुतेकांना बंददिवशी सकाळीच पोलिसांनी पकडले होते. दिवसभर त्यांना जेवण तर दिले नाहीच; पण पाणी देखील दिले नाही. रात्री आमच्या दोन-तीन कार्यकर्त्यांनी पिण्यासाठी पोलिसांकडे पाण्याची मागणी केली तेव्हा त्यांच्यापुढे आता 'आमचा मूत प्या' म्हणून मूत्राची भांडी ठेवली गेली!

११) पोलीसकस्टडीत असलेल्या वास्कर या नावाच्या तरुणाच्या बहिणीचा विवाह दि. ११।२।८४ रोजी होता. त्याच्या घरातील लोकांनी व आम्ही त्या तरुणाला बंदोबस्तात का होईना फक्त अक्षदा टाकण्यासाठी पंधरा मिनिटे पाठविण्याची विनंती पोलीसइन्स्पेक्टर श्री. हिंदुराव पाटील व पोलीसइन्स्पेक्टर तात्याराव यांच्याकडे केली; पण ती त्यांनी धुडकावून लावली.

१२) हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांना होणारी मारहाण बघून भा. ज. प.चे श्री. रमाकांत शालगर, शामराव भिडे व रामभाऊ पंचनदीकर पोलिसांना भेटायला गेले असताना त्यांनाच पोलिसांनी दमदाटया केल्या.

१३) बंददिवशी इचलकरंजी शहरात एक लग्न होते. त्यांच्या मंगलकार्यात विघ्न येऊ नये म्हणून हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांनी त्यांना सहकार्य केले; पण पोलिसांना ते पाहावले नाही. त्यांनी वऱ्हाडाच्या गाडीवर केवळ भगवा झेंडा लावला या एका कारणावरून सबंध वऱ्हाडाला पोलीसस्टेशनवर नेले व तेथे नेऊन त्यांना दमदाटी केली.

१४) श्री. सतीश देसाई हा आमचा कार्यकर्ता ज्या वेळी सकाळी स्कूटरवर बसून पत्रकार श्री. काळे यांचेबरोबर फिरत होता तेव्हा त्यांनी शिवाजीपुतळ्यापाशी पो. इं. श्री. थोरात यांनी अडविले व दोघांनाही बाहेर न फिरकण्याची सूचना केली. तसेच हिंदुराव पाटील यांनी पत्रकार काळे यांना तुम्ही देसाई यांच्याबरोबर कसे काय फिरता, तुमचा व देसाई यांचा काही तरी कट शिजलेला असावा असा आम्हाला संशय आहे, आम्ही तुम्हाला अटक का करू नये असे शब्द वापरले.

१५) या दोन्ही घटनांनंतरच इंगळे या ट्राफिकच्या सब-इन्सपेक्टरने हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांना आणि त्यांना मदत करणाऱ्याला गोळ्या घालून ठार मारण्याशिवाय आता पर्याय नाही असे उद्‌गार इचलकरंजी शहरातील एका पत्रकारासमोर काढले. यावरून इचलकरंजी शहरात दंगल घडवून आणायची; त्याचे निमित्त पुढे करून मला, आमच्या प्रमुख कार्यकर्त्यांना आणि पत्रकार सुभाष काळे यांना गोळ्या घालून ठार मारायची एखादी योजना पोलिसांनी रचली असावी असा आम्हाला संशय आहे. कारण आजपर्यंत पोलिसांनी आमचा असाच अमानुष छळ केला आहे आणि या अन्यायाला प्रथमच पत्रकार श्री. काळे यांनी साप्ताहिक 'माणूस'मधून वाचा फोडली. त्यामुळे श्री. काळे यांच्यावर पोलीसखात्याचा फार राग आहे.

१६) दिवसभरात हे सर्व घडत असताना, पोलिसांनी प्रचंड दहशत निर्माण केली असतानाही आम्ही दुपारी साडेतीन वाजता पोलिसांच्या सहकार्याने आपल्याशी चर्चा करून बंद मागे घेण्यास सहमती दर्शविली, याची आपल्याला कल्पना आहेच. ठरल्याप्रमाणे एका रिक्शामधून लोकांनी दिलेल्या उत्स्फूर्त सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानून बंद मागे घेतल्याचे व दुकाने उघडण्याचे आव्हान आम्ही लोकांना केले. या वेळी स्वतः हिंदुराव पाटील व पोलिसांचा प्रचंड ताफा आमच्या रिक्शामागे होता. वास्तविक पाहता शहरातले संपूर्ण वातावरण निवळलेले होते; पण पोलिसांनी आम्हाला ३७ (१) कलम

लागू आहे अशी सबब सांगून शोकसभेला परवानगी नाकारली. वस्तुत: ही सभा कै. रवींद्र म्हात्रे यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आयोजित केलेली होती. त्यामागे केवळ आमची राष्ट्रवादी भावना होती; पण त्याचा-देखील पोलिसांनी सहानुभूतीने विचार केलेला नाही.

या सर्व वरील घटनांवरून पोलीस आमच्याशी सूडबुद्धीने कसे वागतात हे स्पष्ट होते. पोलिसांचे हे वर्तन आजचे नाही. गेल्या तीन वर्षांपासून पोलीस आमचा असाच छळ करीत आहेत. वास्तविक पाहता आम्ही आजपर्यंत देशविघातक अगर कोणतेही विध्वंसक कृत्य केलेले नाही. रक्तदानापासून अन्नदानापर्यंत अनेक सामाजिक व राष्ट्रीय कार्यांत महाराष्ट्रात हिंदुएकता आंदोलन आघाडीवर आहे, हे आपण लक्षात घ्यावे.

आपण या सर्व घटनांची कसून चौकशी करावी व अपराधी पोलीस व पोलीसअधिकाऱ्यांना तात्काळ बडतर्फ करावे अशी आपणाला हिंदुएकता आंदोलनाच्या वतीने मी नम्र विनंती करीत आहे. आपण माझ्या या निवेदनाची तत्काळ दक्षता घ्याल अशी अपेक्षा आहे.

**प्रति,**

मा. डी. आय. जी. कोल्हापूर,
२) मा. पोलीसमहानिरीक्षक, मुंबई,
३) मा. ना. मुख्यमंत्री वसंतदादा पाटील

आपला
गजानन शंकर मुरदंडे
अध्यक्ष,
हिंदुएकता आंदोलन, इचलकरंजी

बंददिवशी इचलकरंजी शहरात काय काय घडले याची कल्पना या निवेदनावरून येऊ शकते. बंदचा वृत्तांत बऱ्याच वृत्तपत्रांनी विपर्यस्तपणे छापला. तरुण भारतने मात्र या सर्व घटना सविस्तरपणे दिल्या. भा. ज. प. च्या लोकांनी आ. आण्णा जोशी यांना बोलावून घेतले. आण्णांनी हिंदुएकतेच्या सर्व कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेऊन चर्चा केली. आण्णानी हिंदुराव पाटील यांचीही भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. हिंदुराव पाटलांनी ही चर्चा टेप करून घेतली आणि ती कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. कल्लप्पा आण्णा आवाडे यांना नेऊन दिली. सत्ताधारी मंडळींच्या दबावाखाली पोलीसखाते कसे काम करते याचा हा एक नमुना. वास्तविक पाहता बंदच्या काळात आवाडे



**पोलीसखात्याच्या निषेधार्थ इचलकरंजीच्या महिलांचा मोर्चा**

इचलकरंजीतच होते. ( ना. आवाडे हे इचलकरंजीचे रहिवासी आहेत. त्यांचा पिढीजात व्यवसाय सावकारीचा. आजही लोक त्यांना सावकार या नावानेच ओळखतात. ) महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळातला एक जबाबदार मंत्री, इचलकरंजीचा लोकप्रतिनिधी म्हणून या प्रकरणात त्यांनी लक्ष घालायला हवे होते; पण ते गंमत बघत बसले. मात्र पुण्याहून आण्णा जोशी येताच आण्णा काय बोलतात याची टेप मात्र घेतली आणि पोलिसांनीही ती दिली.


इचलकरंजी हिंदुएकताचे सरचिटणीस श्री. अजित पाटील यांनी घटना घडल्यानंतर लगेचच मुंबईला धाव घेतली आणि मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन सर्व घटना त्यांच्या कानांवर घातल्या. तसेच कै. म्हात्रे यांच्या मातोश्रींची सांत्वनासाठी भेट घेऊन इचलकरंजी–बंदची हकिगत त्यांच्याही कानांवर घातली. स्वत:च्या मुलाच्या मृत्यूबद्दल दु:खात असताना इचलकरंजीतील प्रकार पाहून त्या माउलीचे डोळे पाण्याने भरून आले! त्याही प्रसंगात यासंबंधी मी लक्ष घालते असे त्यांनी अजित पाटलांना सांगितले.

इचलकरंजीत हिंदुएकतेची महिला आघाडी आहे; पण तिची स्थापना त्यांनी पोलीसअत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने स्थापन केलेली आहे. या महिला लढाऊ आहेत. मागच्या अत्याचाराच्या वेळी त्यांनी निरनिराळ्या पक्ष-पुढाऱ्यांकडे धाव घेऊन हे अत्याचार थांबविण्याविषयी विनंती केली; पण त्याची दखल घेतली जात नाही हे पाहून, त्यांनी मोर्चा काढून पोलिसांना घेराव घातला होता, याही वेळी त्या गप्प बसल्या नाहीत. २५ फेब्रुवारी रोजी त्यांनी सरळ गावभाग पोलीसस्टेशनवर बांगडी मोर्चा काढण्याचा आपला इरादा जाहीर केला. मोर्चानिमित्त काढलेल्या पत्रकात त्यांनी पोलिसांवर तोफ डागलेली आहे. ते पत्रक असे—

ॐ

भारताचे हुतात्मा व ब्रिटनमधील उपउच्चायुक्त कै. रवींद्र म्हात्रे यांच्या बलिदानास विनम्र अभिवादन करण्यासाठी इचलकरंजी हिंदुएकता आंदोलनाच्या आवाहनास प्रतिसाद देऊन दि. ९-२-८४ रोजी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे बंद पाळला. शहरातील दुकाने, बँका, चित्रपटगृहे इतकेच नव्हे तर इचलकरंजीच्या इतिहासात प्रथमच पॉवरलूम्ससुद्धा बंद होते! रोजंदारीवर पोट भरणाऱ्या कामगारांनीदेखील आपापले उद्योग बंद ठेवून कै. म्हात्रेच्या स्मृतीस अभिवादन केले!

इचलकरंजीतील नागरिकांनी हिंदुएकतेच्या आवाहनाला दिलेला हा प्रतिसाद धर्मनिरपेक्ष दल, अतिरेकी ग्रुप, गावगुंड आणि त्यांच्या हप्त्यावर जगणाऱ्या पोलिसांना पाहवला नाही. सर्वांनी एकत्र येऊन पद्धतशीरपणे बंद उधळून लावण्याचा प्रयत्न केला. एस. टी.वर दगडफेक करणारे व अन्य गैरप्रकार घडवून आणणारे लोक हे



**इचलकरंजी–शहरात भर रस्त्यावर चालणारा तीन पानी जुगार**

¤

या टोळीचेच हस्तक आहेत !

बंदच्या काळात एस. टी.वर दगडफेकीचे फक्त तीन प्रकार घडले; पण बसेस जाळल्या, रिक्षा–कारखाने, मशिदी आणि मुस्लिम बांधवांच्या घरांवर दगडफेक केली गेली असल्याच्या खोटया बातम्या खुद्द पोलिसांनीच हेतुपूर्वक पसरविल्या. इचलकरंजी शहरात घबराटीचे, दहशतीचे वातावरण तयार करण्यासाठी पाच–पन्नास जीपा, दोन एस. आर. पी. गाडया, तीन फायर–फायटर्स आवाज करीत फिरवल्या व सर्व हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांची धरपकड करून कै. म्हात्रेंना श्रद्धांजली वाहणाऱ्या सभेस बंदी घातली !

एस. टी.वर दगडफेक केल्याचे निमित्त पुढे करून पोलिसांनी हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांना घराघरामध्ये घुसून जी अमानुष मारहाण केली, त्यांच्या नातेवाइकांना, घरातील महिलांना धक्काबुक्की करून शिवीगाळ करीत पोलीस–स्टेशनवर नेले त्याचा आम्ही निषेध करीत आहोत.

इचलकरंजी शहरात गेल्या पंधरा–वीस वर्षांपासून गुंडगिरी चालू होती. मारामाऱ्या, खून, बलात्कार यांसारखे प्रकार दररोज घडत होते. जाळपोळ होत होती. मातृभूमी स्वीटमार्टसारखी अनेक दुकाने वर्षातून चार–चार वेळा फोडली जात होती. कै. तात्यासाहेब कबाडेसारखा सज्जन माणूस गुंडांनी रस्त्यावर कसा ठार मारला हे इचलकरंजीच्या लोकांना ठाऊक नाही काय ? मारणारे कोण आहेत, सत्ताधारी पक्ष त्यांना कसा मदत करतो, त्यांचे आर्थिक व्यवहार कसे आहेत, पोलीस त्यांच्या ताटाखालची मांजरे बनून कशी राहत आली आहेत हे लोकांना माहीत नाही काय ? पोलीसखात्यासहित सर्वजण आंधळचाने हे बघत असता एकटचा हिंदुएकतेने या गुंडगिरीचा बीमोड केला हे लोक जाणून आहेत.

इचलकरंजी महिलामंडळाच्या वतीने खालील मागण्यांसाठी गावभाग पोलीस-स्टेशनवर दि. २५ फेब्रुवारी ८४ रोजी दुपारी ३ वाजता शाहूपुतळयापासून बांगडी–मोर्चा नेण्यात येणार असून तेथे जाहीरपणे गावभाग पोलीस–स्टेशनवरील अधिकाऱ्यांना बांगडया देण्यात येतील. मागण्या खालीलप्रमाणे :

(१) गेल्या वीस वर्षांपासून गुंडगिरी करणाऱ्या, बायकांवर अत्याचार करणाऱ्या अतिरेकी ग्रुपमधील सर्व लोकांची, त्यांच्या आर्थिक व्यवहाराची कसून चौकशी करण्यात यावी.

(२) धर्म–निरपेक्ष दलसंबंधित असलेल्या लोकांची शहरभर हातभट्टी, मटका, चक्रीजुगार, व्ही. डी. ओ, ब्ल्यू–फिल्मसचे अनेक अड्डे आहेत ते बंद करून संबंधितांवर कारवाई केली जावी.

(३) इचलकरंजी शहरात पावलापावलावर हातभट्ट्या, मटक्याची दुकाने चक्रीजुगारांचे अड्डे आहेत, ब्ल्यू–फिल्मसचे अड्डे आहेत. ते स्वतः पोलीसखातेच चालविते. ते प्रथम बंद केले जावेत.

(४) बंददिवशी घडलेली गैरकृत्ये, पोलिसांनी हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांना केलेली अमानुष मारहाण व धर्म–निरपेक्ष-दलाने हिंदुएकतेविरुद्ध २५ फेब्रुवारीच्या मोर्चाचे प्रसिद्ध केलेले पत्रक याचा व पोलीसधर्म–निरपेक्षदल, अतिरेकी ग्रुप यांचा संबंध आहे. त्याची चौकशी झाली पाहिजे.

(५) बंदनिमित्त निरपराध लोकांच्या झालेल्या छळाची कसून चौकशी व्हावी.

आपल्या नम्र
हिंदुएकता आंदोलन
(महिला विभाग)

वरील मागण्यांसाठी इचलकरंजीतील महिलांनी बांगडी–मोर्चात बहुसंख्येने सहभागी व्हावे.

महिला आघाडीच्या पत्रकावरून, पोलिसांनी बंदनिमित्त जे डावपेच केले त्यावर चांगलाच प्रकाश पडतो. त्यामुळे मोर्चा निघण्यापूर्वीच पोलिसांनी १३७(१) कलम पुकारून त्यावर बंदी घातली.

¤

इचलकरंजीच्या पोलीसखात्याच्या इतिहासात कोणत्याही हातभट्टीवाल्याला, दरोडेखोराला, नंबर दोनचे धंदे करणाराला किंवा ‘खून’, ‘बलात्कारा’सारखे गुन्हे करणारांना पोलिसांनी मारहाण केलेली नाही, रस्त्यावर बेडया घालून मिरवलेले नाही किंवा तीन–तीन महिने मिसाखाली घातलेले नाही; पण हिंदुएकतावाल्यांसाठी या सर्व तंत्रांचा वापर तर झालाच; पण त्याहीपेक्षा भयानक अशी ‘थर्ड डिग्री मेथड’ वापरली गेली. कोणत्याही आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर चोवीस तासांत मॅजिस्ट्रेटपुढे उभे करायचे असते व मॅजिस्ट्रेटनी पो. कस्टडी दिल्यानंतरच आरोपीच्या अंगाला हात लावता येतो, हा कायदा आहे आणि तो इचलकरंजीचे पोलीस कसोशीने पाळतात. कितीही धोकादायक गुन्हेगार असू द्या त्याला साधी शिवीदेखील ते देत नाहीत. उलट बाईपासून बाटलीपर्यंत सर्व व्यवस्था बिनबोभाटपणे करतात; पण हिंदुएकतेचा कार्यकर्ता ताव-

डीत सापडला की, सर्व कायदे धाब्यावर बसविले जातात. शैलेश पवार, प्रमोद लाटणे यांच्यापासून परवाच्या विष्णु ढवळे यांच्यापर्यंत अनेक कार्यकर्त्यांनी 'साहेब फाशी द्या पण पी. सी. (पोलीसकस्टडी) नको' या शब्दात मॅजिस्ट्रेटसाहेबांच्या समोर पोलीस-अत्याचार कथन केले आहेत, अंगावरच्या जखमा दाखविलेल्या आहेत. बंदनिमित्त ज्याला अमानुषपणे मारहाण झाली तो सतीश देसाई तर फाटक्या-तुटक्या कपड्यांसहित-अर्धनग्न स्थितीत कोर्टापुढे आला होता!

इचलकरंजीच्या 'बंद' महाभारतानंतर हिंदुएकताचे प्रांताध्यक्ष श्री. नारायणराव कदम, श्री. गजानन मुरदंडे यांच्यासमवेत मी कोल्हापूरचे डी. आय. जी. सामरा यांची भेट घेतली. या भेटीच्या वेळी डी. एस. पी. श्री. नरवणे, ए. एस. पी. श्री. दिलीप हेबळे हेही उपस्थित होते. बंददिवशी मला काय बघायला मिळाले हे स्पष्ट केलेच व पोलिसांच्या मदतीने इचलकरंजी शहरात जुगार-अड्डे, मटका, चक्री, हातभट्ट्या कशा चालतात, कुठे कुठे चालतात, हे मी घेतलेल्या फोटोंचा उल्लेख करून सांगितले. त्या वेळी सर्वजण अवाक् झाले!

'ठीक आहे. या प्रकरणात मी सविस्तर चौकशी करेन' असे उत्तर देऊन डी. आय. जी. श्री. सामरा यांनी वेळ मारून नेली. भेटीनंतर आम्ही सर्वजण निघालो त्या वेळी मला एकट्याला मागे बसवून घेऊन सामरा यांचेसमोर डी. एस. पी. श्री. नरवणे यांनी, 'काळे, तुम्ही फक्त एकच बाजू मांडीत आहात. त्यातील दुसरीही बाजू बघा.' असे मला सांगितले. त्यावर, 'हिंदुएकतेच्या गैरकृत्याची बाजू मला दाखवून द्या. मी त्यावर निश्चितपणे लिहीन', असे उत्तर दिल्यावर नरवणे यांनी रेकॉर्ड पाहण्यासाठी दुसरे दिवशी स्वतःच्या कार्यालयात यायला मला सांगितले.

नरवणे यांनी सांगितल्याप्रमाणे दुसरे दिवशी मी परत कोल्हापूरला गेलो; पण साहेब भेटलेच नाहीत! तिसरे दिवशी गेलो तर 'नंतर या काम आहे' म्हणून वाटेला लावले. चौथ्या दिवशी ते, जिल्हाधिकाऱ्यांबरोबर कबनूर झोपडीप्रकरणी इचलकरंजीला आले असताना गावभाग पोलीस-स्टेशनवर त्यांना परत मी गाठून रेकॉर्डची मागणी केली. त्या वेळी त्यांनी पो. इ. हिंदुराव पाटलांना हिंदुएकतेचे मागील तीन वर्षांचे रेकॉर्ड द्यायला सांगितले. त्यावर,– 'हिंदुएकतेचेच तेवढे नको तर इचलकरंजीतील गेल्या वीस वर्षांचे गुन्ह्यांचे रेकॉर्ड मला द्या. त्यात मला पूर्वीच्या गुन्ह्यांचे प्रमाण आणि हिंदुएकता स्थापन झाल्यापासून त्यांनी केलेल्या गुन्ह्यांचे प्रमाण शोधता येईल' असे म्हणताच हिंदुराव पाटील म्हणाले, 'मग त्यासाठी नंतर यावे लागेल. कारण तेवढे रेकॉर्ड काही चटकन मिळणार नाही.'

हिंदुराव पाटलांचे उत्तर सयुक्तिकच होते. नाही तरी समोरच्या माणसाला निरुत्तर करण्यात हिंदुरावांचा हातखंडा आहे. उत्तराप्रमाणे अनेक हेलपाटे घातले; पण हिंदुराव पाटलांची भेट काही झाली नाही. त्यांचे इन्चार्ज म्हणून काम करणाऱ्या जहागिरदारसाहेबांची भेट घेतली. ते म्हणाले, 'पाटीलसाहेब रजेवर आहेत ते आल्याशिवाय मार्ग नाही.' आयुर्विम्याला पर्याय नसतो तसे पोलीसधिकाऱ्यांच्या नकारालाही पर्याय नसतो. शेवटी गाठले ए. एस. पी. शर्मा यांना. चार दिवसांपूर्वीच इचलकरंजी विभागाचे ए. एस. पी. म्हणून त्यांनी चार्ज घेतला होता. स्वतः डी. एस. पी. श्री. नरवणे यांनी त्यांची ओळख करून दिली होती व नरवणे यांचेशी माझे बोलणे झाले होते. त्या वेळी ते समोरच होते. हिंदुएकतेच्या रेकॉर्डसाठी डी. आय. जी. श्री. सामरा यांचेपासून डी. एस. पी. नरवणे, पो. इन्स्पेक्टर हिंदुराव पाटील, पो. सबइन्स्पेक्टर श्री. जहागिरदार अशा एकेक पायऱ्या खाली उतरत कसा आलो याची माहिती देऊन शर्मासाहेबांना म्हटले, 'साहेब, तुमचे पोलीसखाते मला हिंदुएकतेचे रेकॉर्ड पुरवू शकलेले नाही; परंतु मी मात्र फोटोसह पोलिसांचा भ्रष्टाचार दाखवून देऊ शकतो!' असे म्हणून मी त्यांना मंगळवार-पोलीसचौकीत उभ्या असलेल्या गाढवापासून, मटकाखोकी, चक्र्या, हातभट्ट्या, ब्ल्यू फिल्मगृहे, शिवाजीनगर पोलीसस्टेशनसमोर कोल्ड्रिंगचा बोर्ड लावून हातभट्टी विकणारे दुकान यांचे मी घेतलेले फोटो दाखविले आणि खुद्द पोलीसखात्यानेच इचलकरंजी शहरात गुन्हेगारांचे समांतर प्रशासन कसे चालविले आहे हे दाखवून दिले. गेल्या वीस वर्षांच्या काळातली गुन्हेगारी आणि हिंदुएकतेच्या स्थापनेनंतरची गुन्हेगारी यांचे प्रमाण दाखवून दिले. यावर शर्मासाहेब काय म्हणणार? 'सुभाषजी, आप तो काफी मेहनत उठानेवाले पत्रकार लगते है. कोई बात नही. हमे तो खुशी हैं. क्यों नही? आप पत्रकार और हम पुलीसवाले मिलकर गुन्हेगारीका प्रतिबंध कर सकते है. कुछ काम लिये हम बाहर निकले है. कल सबेरे ग्यारह बजे आप हमारे ऑफीस मे आ जावो.' पोलीसखात्यातला प्रत्येक अधिकारी 'उद्या'च यायला सांगतो. 'आज रोख उद्या उधार' तसेच हे प्रलोभन! त्यांचा 'उद्या' कधीच उजाडत नसतो हे आता अनुभवाने माहीत झाले असल्याने तेथेच मी शर्माजींचा निरोप घेतला.

¤

बंदच्या वेळी मी इचलकरंजीला गेलो होतो फक्त दोन दिवसांसाठी. कोणत्याही परिस्थितीत अधिक काळ थांबणार नव्हतो. कारण माझ्या वडिलांना बार्शीला हॉस्पिटलमध्ये ठेवले होते व ते अत्यवस्थ होते. इचलकरंजीला निघण्यापूर्वी मी त्यांची दवाखान्यात भेट घेतली होती व दोन-तीन दिवसांत निश्चित परत येईन असे सांगितले होते; पण घडले ते उलटेच. बंद आणि नंतरच्या घटनात मी इतका गुरफटून गेलो की, मला तेथून बाहेर पडताच आले नाही.

दिनांक १७ फेब्रुवारीला रात्री वडिलांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी सोलापूरला पत्नीला फोन केला. तेव्हा ते गेल्याचे कळले. अश्रु पुसले. बॅग भरली व सांगलीला येऊन कोल्हापूर-सोलापूर-बस गाठली.

मिरज-इचलकरंजी लेखमाला आणि अरब विषय इथे संपला. आपण आता हैद्राबाद वार्तापत्रांकडे वळू या.

¤

बालाजी लॉजमधील जागा कोंदट होती. कामाच्या दृष्टीनेही ते ठिकाण सोयीचे नव्हते म्हणून महाराष्ट्र मंडळात जागा शोधायला गेलो. इसामियाँबझार भागात असलेल्या मराठी साहित्यपरिषदेतले डॉक्टर डावरे यांची शिफारस बरोबर नेली होती. मंडळाचे व्यवस्थापक होते रानडे. प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या रानडेसाहेबांनी 'या' म्हणून

मराठीतच स्वागत केले. खोली मिळाली. शिफारस दाखविण्याचे कारणच पडले नाही. लगेच सामानही आणून टाकले आणि सकाळी ९ वाजताच मोर्चा वळविला तो बरकत-पुऱ्यातील 'केशव निलायम 'कडे. केशव निलायम हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यालय. पुण्यातील मोतीबागेसारखी भव्य आणि प्रशस्त वास्तु. माझ्या हातात ११ मार्च ८४ चे सा. विवेकचे कात्रण होते. त्यात आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील जगितयाल ( JAGITYALA ) या ठिकाणी गोपाल रेड्डी आणि रामचंद्रराव यांच्या हत्येचे वृत्त होते. चौकट करून दिलेल्या विवेकमधील बातमीत ही ! हत्या जातीयवादी अतिरेकी गुंडांनी केली असल्याचे म्हटले होते. गोपाल रेड्डी आणि रामचंद्रराव हे दोघेही संघ-स्वयंसेवक असल्याने जगितयालला जाण्यापूर्वी हैद्राबाद संघकार्यालयात त्या घटनेची थोडीफार माहिती मिळेल म्हणून आपला मोर्चा तिकडे वळविला.

कार्यालयप्रमुखांनी हसून स्वागत केले. विचारले त्या प्रश्नांची उत्तरे दिली; परंतु मला जगितयालच्या घटनेबद्दल माहिती हवी होती ती मात्र मिळाली नाही. कारण त्या संदर्भात सविस्तर माहिती असलेली व्यक्ती तिथे नव्हती. ज्यांना माहीत होते ते श्री. ब्रह्मपुरीकर मुंबईला गेले होते. शेवटी कार्यालय प्रमुखाने एक माणूस बरोबर देऊन 'जागृती' ( Jagriti ) या तेलगु साप्ताहिकाच्या कार्यालयाकडे माझी रवानगी केली. जागृती हे संघविचारसरणीचे साप्ताहिक आहे. त्याचा खप तीस हजारापेक्षा अधिक असून आंध्रातले ते एक लोकप्रिय साप्ताहिक आहे. जागृतीचे संपादक तिथे नव्हते. पर्सनल मॅनेजर व्ही. एस. सत्यमूर्ती भेटले. माझ्याच वयाचा हा तरुण अतिशय कुशलतेने व्यवस्थापनाची सूत्रे हलवीत होता. त्याने जगितयाल-प्रकरणावर गप्पा मारल्या; पण त्या अधिकृत समजून नोट करून घेऊ नका असे सांगितले. अधिकृत माहितीसाठी म्हणून त्याने संपादकांकडे आपल्या स्कूटरवरून पोचते केले. जागृतीचे ऑफिस नारायणगुड्यात आहे. तेथून संपादकांचे घर जवळ आहे. संपादकमहाशय भेटले; पण त्यांनी इतर वृत्तांवरच भर दिला. 'जगितयालमध्ये नेमके काय घडले ? कसे कसे घडले ? हत्या करणारे कोण आहेत ?' वगैरे प्रश्न विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की, मी संपादक जरी असलो तरी टेबलवर्क करणारा माणूस आहे. माझ्या माहितीवर विसंबून राहू नका. प्रत्यक्ष घटनांचा वृत्तांत अधिक योग्य प्रकारे मिळू शकेल तो प्राध्यापक एस. व्ही. शेषगीरराव यांच्याकडून. शेषगीरराव हे उस्मानिया युनिव्हर्सिटीत जीओ फिजिक्स या विषयाचे सीनियर प्राध्यापक आहेत. प्रथम त्यांच्या नलकुंटा भागातील घरी गेलो. तिथे ते नव्हते म्हणून विद्यापीठात गेलो. तेव्हा ते आजारी असल्याने दवाखान्यात असल्याचे समजले. संघकार्यालयापासून विद्यापीठापर्यंत तंगडेतोड करावी लागल्याने चांगलाच वैतागलो होतो; पण स्वतःला माहिती नसलेली गोष्ट कोणीही दडपून सांगण्याचा मात्र प्रयत्न केला नाही. प्रत्येक जण स्वतःला जेवढी माहिती होती तेवढीच सांगत असे. हे मात्र माझ्या चांगल्या लक्षात राहिले.

संघवाले कोणी भेटले नाहीत; परंतु दोन-तीन दिवसांच्या भटकंतीत 'डेक्कन क्रॉनिकल', 'इंडियन एक्सप्रेस', 'हिंदु', 'संडे मिडडे' या वृत्तपत्रकार्यालयांशी, त्यांच्या प्रतिनिधींशी तसेच पोलीसकंट्रोलरूमशी संपर्क साधून बरीच माहिती गोळा केली होती.

'जगितयाल'मधील हत्यांसह फेब्रुवारी महिन्यात संघस्वयंसेवकांचे तीन खून झाले. हे तिघेही स्वयंसेवक असले तरी तिघांचेही कार्यक्षेत्र निरनिराळे होते. रवींद्र रेड्डी हा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता. वरंगल (Warangal) जिल्ह्यातील 'जंगम' (Jangam)चा राहणारा. त्याने नुकतीच पदवी संपादन केली होती व तो विद्यार्थी परिषदेचा सक्रिय कार्यकर्ता म्हणून कार्य करीत होता. ७ फेब्रुवारीला रात्री ११ वाजता आपले काम संपवून रेल्वेस्टेशनवरून घरी जायला निघाला असताना त्याला वाटेत ठार करण्यात आले !

जगितयालच्या हत्या १९ मार्चला घडल्या. त्यात डॉ. गोपाल रेड्डी हे भारतीय किसानसंघाचे करीमनगर जिल्ह्याचे संघटक होते, तर बी. रामचंद्रराव हा तरुण वकील जगितयाल तालुका शाखा-कार्यवाह होता. हे दोघेही जगितयालजवळील खेड्यातील एक विवाहाला हजर राहून मोटारसायकलवरून परतत असताना ही घटना घडली. हल्लेखोरांनी प्रथम बारा बोअरगनने गोपाळ रेड्डीला ठार मारले. नंतर रामचंद्रराववर रिव्हॉल्वरनी जवळून गोळ्या घातल्या. हल्लेखोरांपैकी एकाने जवळ येऊन चाकूने भोसकले. गोपाल रेड्डी जागीच ठार झाला तर रामचंद्रराव दुसरे दिवशी हॉस्पिटलमध्ये वारला !

गोपाळ रेड्डी हा माजी करीमनगर जिल्हा शारीरिक प्रमुख होता. चांगला तगडा तरुण होता; पण पाठीमागून येऊन गोळ्या झाडण्यात आल्याने त्याला प्रतिकाराची संधीच मिळाली नाही. त्याच्यामागे विधवा पत्नी आणि दोन मुले आहेत !

रामचंद्रराव हा जगितयाल कोर्टात वकिली करीत होता. उस्मानिया विद्यापीठातून पदवी संपादन करून त्याने आता कुठे वकिलीत जम बसविला होता. गेल्याच वर्षी त्याचे लग्न झाले होते व नुकताच तो एका कन्येचा पिता बनला होता ! अवघ्या वर्षभराच्या सहजीवनात १८ वर्षांच्या या तरुणीवर पतिवियोगाचे संकट कोसळले होते. बिचारी दुःखाने वेडी झाली होती !

हल्लेखोर कोण आहेत ? तर ते आहेत नक्सलवादी ! त्यांच्यात अनेक गट आहेत. रवींद्र रेड्डी, गोपाल रेड्डी आणि रामचंद्रराव यांची हत्या झाली ती कोंडापल्ली सीतारामय्या (Kondapalli Seetaramaiah) या ग्रुपकडून. करीमनगर, वरंगल, निझामबाद, अदिलाबाद आणि नलगोंडा या पाच जिल्ह्यात 'आर्थिक समता व सामाजिक न्याय 'चा नारा लावीत हे नक्सलवादी गेल्या चार वर्षांपासून खून पाडीत आहेत. आतापर्यंत त्यांनी दीडशेपेक्षाही जादा खून पाडलेले आहेत ! हे सर्व खून प्रामुख्याने संघ-स्वयंसेवकांचे आहेत. भारतीय किसान संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, विश्व हिंदु परिषद या संघप्रणीत निरनिराळ्या क्षेत्रांत कार्य करणारे संघस्वयंसेवक टिपून टिपून मारले जात आहेत. त्याचे एकमेव कारण म्हणजे संघाची आंध्रात वाढत चाललेली ताकद. समाजातील सर्व स्तरांवरचे लोक संघकार्यात रस घेत आहेत. समाजातील निरनिराळ्या क्षेत्रात जाऊन ती क्षेत्रे काबीज करीत आहेत. त्यामुळे नक्सलवाद्यांच्या पायाखालची वाळू घसरू लागलेली आहे. त्यात आंध्रातील जनतेने चार भा. ज. प. प्रतिनिधी विधानसभेत पाठविले आणि यामुळे नक्सलवादी गरम बनलेले आहेत. त्यांच्या विचाराची जागा अविचाराने घेतली आहे.

(क्रमशः)




'शेषप्रश्न' मध्ये एक व्यवस्थितपणे गुंफलेले कथानक आहे. शिवनाथबद्दल आशुबाबूंना प्रथम वाटलेले कौतुक व सहानुभूती व नंतर वाटलेली घृणा, कमल व शिवनाथ यांच्या नात्याबद्दल कुतूहल; अजित व मनोरमा, मनोरमा व शिवनाथ, अजित व कमल यांचे बदलत गेलेले भावानुबंध हे या कथानकाचे धागे आहेत.

शरच्चंद्रांच्या नवमतवादी विचारांचा या कादंबरीत दिसणारा ठसा या दृष्टीने 'शेषप्रश्न' लक्ष वेधून घेणारा आहे. या कादंबरीचे रसग्रहण प्रदीर्घ असल्यामुळे लेख दोन भागात दिला आहे.

# शरदबाबूंची एक नवमतवादी कादंबरी : शेषप्रश्न

**लेखांक : सहा । लेखक : प्रा. बा. वि. पोतदार**

शरदबाबू हे एक सुधारणावादी कथाकार होते; परंतु भारतीय संस्कृतीत व परंपरेत जे चांगले होते, त्यावर त्यांचा विश्वास होता, प्रेम होते. त्याग, संयम, वैराग्य या गुणांबद्दल त्यांना आदर होता. निर्घृण व कालबाह्य परंपरागत रूढीमुळे झालेली स्त्रियांची व समाजातल्या खालच्या स्तरांची कुचंबणा त्यांनी आपल्या बहुतेक साहित्यात चित्रित केलेली आहे. उलट, संयमाचे व वैराग्याचे संस्कार नसतील तर 'स्वामी' या कथेतील सौदामिनीप्रमाणे किंवा 'गृहदाह' या कादंबरीतील अचलेप्रमाणे, स्त्री स्खलनशील वा उच्छृंखल होऊ शकते हेही त्यांनी दर्शविले आहे. मनुष्यस्वभावच तसा आहे म्हणून संयम व वैराग्याच्या संस्कारांची प्रथमपासून आवश्यकता; पण या गुणांच्या अंध बडिवारामुळे, विधवेची नसलेल्या पतीबद्दलची परायणता व संयम यांचे कालबाह्य स्तोम माजविले जाते, तिच्या तारुण्यातच तिच्यावर ब्रह्मचर्य लादले जाते. अशा परंपरांमध्ये सतीच्या चालीइतकीच निर्घृणता होती व अशा रूढीमुळेच समाजात पतिताही निर्माण होत होत्या. त्यामुळे स्त्रियांच्या कुचंबणेचे चित्रण शरदबाबूंनी अतीव सहृदयतेने केले व 'नारीजातीचा परम मित्र' अशी पदवी स्त्रियांच्या एका सभेत त्यांना बहाल करण्यात आली.

धर्मवेडातूव संकुचितपणा व स्वार्थ यांचा उदय होऊ शकतो. त्यामुळे धर्म व परंपरेचा अभिमान, यापेक्षा मानवतावादी मूल्यांना शिरोधार्य करणे अधिक श्रेयस्कर, याची जाण शरदबाबूंच्या सर्वच कादंबऱ्यांत दिसते. माणुसकीशी विसंगत असे वर्तन मूढ समाजाकडून वारंवार होत राहाते. अंधश्रद्धा, अनावश्यक रूढी यांचा समावेश धर्माच्या नावाखाली 'भारतीय संस्कृति' या उदात्त संकल्पनेत अज्ञानी जनतेकडून केला जातो, हे शरदबाबूंनी वारंवार पाहिले होते. कारण बंगालच्या बहुजनसमाजाशी त्यांचा विशेष परिचय होता. त्यामुळे धर्म व भारतीय संस्कृति या संकल्पनांवरच प्रहार करणे त्यांना शेवटी आवश्यक वाटले व 'शेषप्रश्न' मध्ये कमलच्या भूमिकेतून त्यांनी असे प्रहार केले; परंतु संस्कृतीचे महत्त्व धर्मातीत आहे, तरी संस्कृति आजवर धर्माच्या आधारे टिकून राहिलेली आहे, याची जाणीव 'शेषप्रश्न' मधील अन्य पात्रांकडून वारंवार व्यक्त झालेली आहे. आशुबाबू कमलला म्हणतात, 'आमचं भारतीय वैशिष्टय म्हणजे नुसत्या बोलायच्या गोष्टी नव्हेत ! ते घालविणं म्हणजे किती जबरदस्त नुकसान आहे याची कल्पना करणं सुद्धा कठीण. किती प्रकारचे धर्म, किती आदर्श, किती पुराणं, किती इतिहास, काव्य, कथा, शिल्प किती तरी बिनमोल संपत्ति या वैशिष्टयांच्या आधारे आजवर टिकून राहिलेली आहे...या देशाचा धर्म, इतिहास–पुराणं, आचार–विचार सारं काही पाश्चात्यांच्या आक्रमणाखाली व दडपणाखाली नाहीसं होऊ लागलं होतं. त्या सर्व गोष्टींवर लोकांची श्रद्धा व विश्वास, जो आता पुन्हा उत्पन्न होऊ लागला आहे, तो केवळ आमच्या पूर्वजांच्या भविष्यकाळाकडे पाहाण्याच्या दृष्टीमुळे व शक्तीमुळेच...तपोवनाचा जो आदर्श केवळ आमच्याकडेच होता,

सारी पृथ्वी धुंडाळून तरी त्याला कुठें तोड सापडेल का ? आमचा समाज ज्यांनी पूर्वी घडविला होता ते आमचे पूर्वज कुणी वाणी-उदमी नव्हते. ते संन्यासी होते. त्यांचा हा वारसा झुकत्या मानेनें जर आम्हाला गिरवता आला, तरच आमच्या जिण्याचं सार्थक !'

आशुबाबू पुष्कळ वर्षे विलायतेत राहून आलेले असले, तरी त्यांची दृष्टि या प्रकारे भारताच्या उज्ज्वल भूतकाळावर खिळलेली होती. प्रखर बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टिकोणातून अशा पुनरुत्थानवादी मनोवृत्तीवर टीका करण्याची वेळ आलेली होती. म्हणून 'शेषप्रश्न' मधील कमलद्वारे मानवतावादी व इहवादी दृष्टिकोणातून भारतीय समाजाच्या धारणांवर शरदबाबूंनी विस्तृत चर्चा घडवून आणलेली आहे. त्यासाठी त्यांनी प्रिय असलेल्या ग्रामीण बंगालचा निरोप घेऊन आग्रा शहरातील मोजक्या, सुसंस्कृत व सुशिक्षित व्यक्तींच्याद्वारे कथानकाची गुंफण केलेली आहे. बहुजनसमाज आणि त्यातील वास्तव यांचा व आपल्या कथानकाचा संबंध मधूनमधून तुटल्यासारखा होतो व आग्रा शहरातील एकेक सुशिक्षित पात्र एकेका भूमिकेचे प्रतीक बनते. अर्थात् शरदबाबूंच्या कलेच्या असामान्य सामर्थ्यामुळे या व्यक्तिरेखा जिवंत व हाडामासाच्या बनतात. त्यामुळे वादविवाद व चर्चा यामध्ये सुशिक्षित वाचकांना रस निर्माण होतो. काही पात्रे हळूहळू चांगलीच संमिश्र प्रकृतीची बनत जातात. कारण बऱ्याचशा चर्चा जशा त्यांच्या व्यक्तिगत जीवनातून उद्भवतात, तद्वतच या वादविवादांचा परिणाम त्यांच्या व्यक्तिगत मनोभूमिकेवर व प्रत्यक्ष कृतींवरही झालेला दिसून येतो.

### कमलचा नाट्यात्म परिचय

आग्रा येथे प्रकृतिस्वास्थ्यासाठी नुकतेच येऊन राहिलेले गर्भश्रीमंत, सुसंस्कृत परंतु निगर्वी स्वभावाचे आशुबाबू, त्यांची रूपसंपन्न व सुशिक्षित कन्या मनोरमा, संगीतात असामान्य गति असलेला कलावंत शिवनाथ, त्याची पत्नी कमल, गावातील कॉलेजात प्राध्यापकी करणारे अविनाशबाबू, अक्षय व हरेन्द्र. सामाजिक जाणीव असलेल्या हरेन्द्रने आपल्या सहज स्थापन केलेल्या आश्रमाच्या कार्यासाठी शोधून आणलेले त्याचे मित्र सतीश व राजेंद्र, नुकताच विलायतेतून परतलेला व मनोरमेशी पूर्वी वाङ्‌निश्चय झालेला अजित, अविनाशची विधवा मेहुणी नीलिमा ही या कादंबरीतील पात्रे. ही सर्व सुशिक्षित व सुसंस्कृत आहेत व शरदबाबूंनी योजिलेल्या चर्चांच्या दृष्टीने ते आवश्यकच आहे.

'पथेर दाबी' व 'शेषप्रश्न' या कादंबऱ्या एकाच कालखंडात लिहिल्या गेलेल्या आहेत व त्या दोन्ही चर्चात्मक आहेत, त्यामुळे कलादृष्ट्या त्यात काही उणीवा असणार असे वाचक बहुधा गृहीत धरतात; परंतु बारकाईने पाहिल्यास असे दिसून येईल की, या दोन्ही कादंबऱ्यांची रचना शरदबाबूंच्या उत्कृष्ट रचनेइतकीच कलात्मक आहे. कोणत्याही कथारचनेच्या बाबतीत शरदबाबूंची स्वाभाविक कलात्मकता नेहमीच भासमान होते. तथापि रचनेत तितकीच योजनापूर्वकताही असते. प्रयत्न वा परिश्रम वर-वर पाहता दिसून येत नाहीत, त्यामुळेच त्यांची कला मोठी. 'शेषप्रश्न' मध्ये एक–दोन प्रसंगी असा भास होतो की, पात्रांना मुद्दाम चर्चा करण्यासाठी एकत्र आणलेले आहे; परंतु बहुधा असे दिसते की, पात्रांना चर्चा करण्यास काही स्वाभाविक कारणे आहेत. 'शेषप्रश्न' मध्ये आशुबाबूंनी जमा केलेले मित्रमंडळ सुशिक्षित व बुद्धिजीवी मंडळींचं असल्यामुळे स्वाभाविकतःच चर्चा करीत राहाते. कधी पात्रांच्या मनावर ताण पडलेला असतो, कधी त्यांना एकमेकांबद्दल कुतूहल असते, तर कधी काही नवीन घटना घडलेल्या असतात. त्यामुळे स्वाभाविकपणे, मंडळी एकत्र जमल्यावर त्यावर चर्चा होतात. शिवनाथच्या पहिल्या मैफलीमुळे सर्वच जण भारावून जातात. आशुबाबूंची मान अभिमानाने उंचावते, तर नंतरच्या चर्चेमुळे शिवनाथबद्दलची काही कटु सत्ये बाहेर येतात. चर्चा हीही एक घटनाच असते व तीमधून काही भावानुबंधही निर्माण होतात. या घटना-संवादातून एक आकृतिबंध निर्माण होतो. तो कलात्मक असतो. कमलची मते, अन्य पात्रांच्या तुलनेने पाहाता, जगावेगळी आहेत. कधी बऱ्याचशा व्यक्ती एकत्र जमलेल्या असताना, कमलच्या निर्भीड मतप्रदर्शनामुळे इतरांना मुख्यतः धक्का देण्याचेच कार्य साधले जाते. आशुबाबू समतोल व प्रगल्भ विचाराचे आणि शांत स्वभावाचे असल्याने, कमलच्या विचारातील सत्यांश समजून घेण्याचा व इतरांना तो समजावून सांगण्याचा ते प्रयत्न करतात, त्यामुळे कमल बैठकीतून निघून गेल्यानंतरही स्वाभाविकपणे चर्चा होत राहाते. ही चर्चा कमलच्या मतांबद्दल असते तशी ती तिच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल, चारित्र्याबद्दलही असते. त्यामुळे चर्चेत संघर्ष, नाट्य, मतभेद, जिवंतपणा निर्माण होतो. काहींना कमलची मते अर्धवट पटतात, त्यांच्या मनात तिच्याबद्दल थोडा-फार आदर व सहानुभूति निर्माण होते. अशा व्यक्ती कुतूहलाने तिच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करतात, यात अजित व हरेंद्र यांचा समावेश होतो. त्यांच्या कमलशी पुन्हा व्यक्तिगत चर्चा होतात. या सर्व व्यक्ती जिवंत, हाडामासाच्या असल्याने याही चर्चा रंगतात व या काही व्यक्तींचे कमलशी वेगवेगळ्या प्रकारचे भावानुबंध निर्माण होतात. या चर्चा व हे भावानुबंध शरदबाबू पुन्हा मोठ्या कौशल्याने कथानकात गुंफून देतात.

'शेषप्रश्न' मध्ये एक व्यवस्थितपणे गुंफलेले कथानक आहे. शिवनाथबद्दल आशुबाबूंना प्रथम वाटलेले कौतुक व सहानुभूति व नंतर वाटलेली घृणा, कमल व शिवनाथ यांच्या नात्याबद्दल कुतूहल; अजित व मनोरमा, मनोरमा व शिवनाथ, अजित व कमल यांचे बदलत गेलेले भावानुबंध; नीलिमा व बेला यांमधील विरोध, नीलिमेला आशुबाबूंविषयी निर्माण झालेले प्रेम, हे सर्व या कथानकाचे धागे आहेत.

आशुबाबू व त्यांच्या मेळाव्यातील सर्वच व्यक्तींना भारतीय संस्कृतीबद्दल प्रेमादर आहे. या मेळाव्याचा दोन वेगळ्या प्रकारच्या व्यक्तींशी सुरुवातीलाच परिचय होतो. त्या व्यक्ती म्हणजे शिवनाथ व त्याची पत्नी कमल. शिवनाथ हा एक गुणी माणूस, एक कलावंत. त्याच्या चारित्र्याबद्दल व स्वार्थी स्वभावाबद्दल इतरांकडून ताशेरे ऐकूनही आशुबाबूंचे त्याच्या गुणांबद्दलचे कौतुक नाहीसे होत नाही. कारण त्यांचा स्वभावच उदार व सदाशिव आहे. कमलचा व त्यांचा परिचयही नाट्यात्म पद्धतीने होतो. ताजमहालसमोर तिची अगदी वेगळ्या पद्धतीची मते ऐकून त्यांना तिच्याबद्दल कौतुक वाटते. मग पावसाच्या निमित्ताने ती त्यांच्याच घरी येते. कमल ही एका मोलकरणीची मुलगी असे शिवनाथने, तिच्या पतीनेच, सांगितलेले असल्याने, पावसात चिंब भिजलेली कमल जेव्हा आशुबाबूंकडे येते तेव्हा त्यांनी किंवा मनोरमेने कसे वागावे याबद्दल त्यांना मोठा प्रश्न

पडतो. मनोरमा मोठ्या औदार्याने हे काम अंगावर घेते; परंतु तिची तुच्छताबुद्धी लक्षात आल्यावर कमल मुद्दामच कोरे कपडे, कोरा साबण, याबद्दल उपरोधिक आग्रह धरते. नंतर तिच्या बोलण्यातील स्पष्टोक्ती, बुद्धिवाद, मोकळेपणा पाहून, सर्वांनाच धक्का बसतो. एखाद्या सामान्य मोलकरणीची ही मुलगी असेल यावर कुणाचाच विश्वास बसत नाही.

## भावनिक संघर्ष

अर्थात मनोरमेच्या मनात या प्रसंगामुळे कमलबद्दल अढी निर्माण होते. शिवनाथबद्दल ऐकलेल्या हकीकतींमुळे मनोरमेला त्याची वर वर पाहता घृणा वाटत असली तरी तिच्या मनात शिवनाथबद्दल प्रच्छन्न आकर्षण आहे व म्हणून तिच्या मनात कमलबद्दल प्रच्छन्न मत्सर व अढी आहे, ही गोष्ट चाणाक्ष वाचकांच्या लक्षात येते. मनोरमा ही एक सामान्य सुशिक्षित मुलगी आहे व कमलच्या तत्त्वचर्चेत तिला काहीच रस नाही, त्यामुळे त्यांचे संबंध दुरावलेले राहातात. पात्रांच्या भूमिकांत होणारे बदल, त्यामागचे हेतु आणि कथानकाचे टप्पे यांची गुंफण या कादंबरीत सर्वत्रच मोठ्या कौशल्याने साधलेली आहे; परंतु या कादंबरीतील तत्त्वचर्चा आपले मन इतके आकर्षून घेते की, शरदबाबूंच्या रचनाकौशल्याकडे आपले लक्षच जात नाही. अजितबद्दलचे मनोरमेचे आकर्षण नाहीसे झालेले आहे हे सुरुवातीपासूनच सुचविलेले आहे. त्यामुळे अजित गाडी काढून एकटाच फिरायला जाऊ लागतो व म्हणूनच त्याची कमलशी भेट होते व शिवनाथ गेले कित्येक दिवस घरीच आलेला नव्हता हे तिच्या बोलण्यातून अजितला कळून येते. उशीरा घरी म्हणजे आशुबाबूंकडे पोहोचल्यावर त्याला दिसून येते की, त्याची वाट पाहत राहण्याऐवजी मनोरमा एवढ्या रात्री बागेत झाडाआड शिवनाथशी गोष्टी करीत बसलेली होती. तरी या दोघांची मजल कुठपर्यंत गेलेली होती याची बराच काळपर्यंत कुणालाच कल्पना येत नाही.

मनोरमा-प्रकरणाचा उत्कर्षबिंदूही अतिशय नाट्यात्मक आहे. अजित एक दिवस कमलकडे गप्पा मारीत बसलेला असताना आशुबाबूंकडून निरोप येतो की, शिवनाथ आजारी असून त्यांच्याकडे होता व कमलने येऊन त्याला घरी घेऊन जावे. कमलने नवऱ्याच्या प्रकृतीची हेळसांड केल्याबद्दल आशुबाबूंना कमलचा रागही आलेला असतो. कारण शिवनाथने कमलला टाकलेले आहे हे अर्थातच त्यांना माहीत नसते. अजित व कमल आशुबाबूंकडे पोहोचतात तेव्हा बरीच रात्र झालेली असते. सर्वजण शिवनाथच्या खोलीकडे जातात तेव्हा त्याच्या छातीवर डोके टेकून व त्याचे हात गळ्याभोवती लपेटून घेऊन झोपी गेलेली मनोरमा सर्वांच्या दृष्टीला पडते. आजारी शिवनाथच्या औषधपाण्याची व्यवस्था वाटल्यास आशुबाबूंनी करावी पण ते आपल्यावर स्वतःवर उपकार आहेत असे समजण्याची चूक त्यांनी करू नये. कारण शिवनाथचा व आपला संबंध आता संपलेला आहे, असे नंतरच्या चर्चेत कमल स्पष्ट करते. या निमित्ताने तिचे पुन्हा प्रेम, विवाह, संसार याबाबतची आपली मते स्पष्ट केलेली आहेत. घटनांच्या मांडणीतून सहजपणे स्फुरलेल्या चर्चेचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. हरेंद्रची कमलविषयीची सहानुभूति वाढत जाते व तो एक दिवस तिला मुद्दाम भेटायला जातो, तेव्हा तिथेही चर्चा होते. शिवनाथला काही तरी अद्दल घडवावी असे सर्वांना वाटत असले तरी कमलेने या कल्पनेला कसून विरोध केलेला आहे. तिची तक्रार एवढीच होती की, शिवनाथने फसवणुकीचा अवलंब न करता, जे करायचे ते तिला सांगून-सवरून करायला पाहिजे होते.

कमलच्या मतांमुळे चकित होऊन प्रथम तिच्याबद्दल तुच्छता दर्शविणारे हरेंद्र व अजितच नव्हेत तर अक्षयसारख्या मंडळींच्या आदराला सुद्धा ती शेवटी पात्र होते असे दर्शवून शरदबाबूंनी तिच्या व्यक्तिमत्त्वाचे व विचारप्रणालीचे याही प्रकारे समर्थन केले आहे. नाट्यात्मतेसाठी संघर्षाची आवश्यकता असते. या कादंबरीतील संघर्ष ज्या प्रमाणात वैचारिक आहेत तितक्याच प्रमाणात ते भावनात्मकही आहेत. मनोरमेला वाटलेले शिवनाथबद्दलचे आकर्षण व त्यामुळे आशुबाबूंना बसलेला धक्का, त्याचे दुःख व अगतिकता; अजित परदेशातून परत आल्यापासूनची मनोरमेची त्याच्याबद्दलची उदासीनता; कमलने अजितला दिलेले आव्हान, हे संघर्ष प्रामुख्याने भावनात्मक पातळीवरचे आहेत. जे संघर्ष वैचारिक पातळीवरचे आहेत त्यांनाही भावनेची झालर आहे. आशुबाबूंच्या ऋजु, उदार व ममत्वपूर्ण व्यक्तिमत्त्वामुळे व कमलच्या सुसंस्कृततेमुळे संघर्ष खालच्या पातळीवर येत नाहीत. अक्षयबाबूंनीसुद्धा शेवटी पराभूत होऊन कमलच्या म्हणण्यातील तथ्य मान्य केलेले आहे.

स्वर्गवासी पत्नीच्या फोटोला हार घालणाऱ्या अविनाशबाबूंनी पुन्हा विवाह करणे, निलिमेच्या मनात पुनर्विवाहाची इच्छा निर्माण होणे, यातही कमलच्या मनाचा उपरोधिक विजय सूचित होतो. जुनी मते आचरणारी प्रेमळ सेवाभावी विधवा निलिमा व आधुनिक, स्वयंकेंद्रित, नवऱ्याने दिलेल्या पोटगीवर चैनीत जगणारी बेला, यांच्या व्यक्तिमत्त्वातील विरोधही सूचक व मनोरम आहे. निलिमेच्या आशुबाबूंवरील प्रेमाची अभिव्यक्ति अनपेक्षित असल्यामुळे ती प्रत्यक्ष न दाखविता, आशुबाबूंनी कमलपुढे केलेल्या निवेदनातून ती मांडण्याचे शरदबाबूंचे तारतम्यही कलात्मक आहे. सर्व कादंबरीस कमल व्यापून राहिलेली आहे. त्यामुळे कादंबरीचा शेवटही कमलच्या वाक्याने होणे उचित होते. एका मंदिरातील देवतेची मूर्ती आगीतून वाचविण्याच्या प्रयत्नात राजेंद्र स्वर्गवासी झाल्याची तार आल्यावर सर्वांनाच मोठा धक्का बसतो. कमललाही वाईट वाटले असणारच. कारण कॉलऱ्याने ग्रासलेल्या चांभारवाड्यातील दलितांची सेवा तिने राजेंद्रच्या बरोबरीने केली होती; पण असा गुणी माणूस एखाद्या मंदिराच्या मूर्तीसाठी दग्ध व्हावा हे तिच्या बुद्धिवादी मनाला दुःसह होते. भावना आवरून ती कठोर स्वरात म्हणते, 'रडू नका हरेनबाबू, अज्ञानाचे बळी सदोदीत असेच खर्ची पडतात!' नुकताच आशुबाबूंचा अनौपचारिक निरोपसमारंभ पार पडलेला असतो व भावनात्मक औदार्याचे वातावरण निर्माण झालेले असते; परंतु अज्ञानमूलक परंपरेविरुद्ध व अंधश्रद्धांविरुद्ध कमलच्या बुद्धीची धार नेहमी तीव्रच राहणार.

**'रडू नका हरेनबाबू, अज्ञानाचे बळी सदोदीत असेच खर्ची पडतात.'**

कादंबरीची सुरुवात ताजमहालबद्दलच्या चर्चेतून झालेली आहे. आशुबाबूंची पत्नी निवर्तली त्या वेळी त्यांचे वय फारसे झालेले नव्हते. मुलगी लहान होती; पण त्यांनी पुन्हा विवाह केला नाही. गत पत्नीची स्मृती त्यांच्या हृदयाच्या गाभाऱ्यात तेवत राहिली. मनोरमेच्या आईच्या जागी दुसरी कुणी आणून बसविण्याची कल्पनाही आतापर्यंत त्यांच्या मनास शिवली नाही. या एकनिष्ठतेचा त्यांना रास्त अभिमान आहे व त्यांच्या अन्य गुणांबरोबरच त्यांच्याही गुणाबद्दल इतरांना त्यांच्याबद्दल रास्त आदरभाव आहे. हा धागा पकडून, ताजमहाल हे शहाजहान व मुमताज यांच्या अमर व एकनिष्ठ प्रेमाचे स्मारक खरोखरच समजता येईल काय, या चर्चेतून सुरुवात करून शरदबाबूंनी वारंवार प्रेम व त्याचे स्वरूप, विवाहपूर्व व विवाहोत्तर प्रेम, विवाहपद्धती, प्रेम आणि निष्ठा, घटस्फोट, प्रेम क्षणभंगुर असते की चिरस्थायी, विधवा–विवाह इत्यादि प्रश्नांवर चर्चा घडवून आणल्या आहेत. याच प्रश्नांशी संलग्न विषय म्हणून विधवेची आपल्या दिवंगत पतीबद्दलची निष्ठा, तिचे ब्रह्मचर्य, संयम व सेवाभाव, यांना काही मूल्य आहे काय याबद्दलही चर्चा होतात. कारण अविनाशबाबूंची विधवा मेहुणी नीलिमा ही विधुर अविनाशबाबूंचा संसार सेवाभावाने सांभाळीत राहिलेली आहे. यातूनच, भारतीय परंपरा व त्यावरील निष्ठा, पूर्वजांच्या आदेशांचे अंधानुकरण या विषयांवर चर्चा होत राहातात. प्रत्येक वेळी कमल इहवादी व मानववादी भूमिकेतून या प्रश्नावर सर्वंकष पद्धतीने आपली परखड मते मांडत गेलेली आहे. ही मते ऐकणाऱ्यास धक्कादायक वाटतात. काही मते आजही धक्कादायक वाटू शकतील; पण कमलच्या बोलण्यात असा काही एक स्वाभाविक आत्मविश्वास आहे, असा काही एक निश्चित जोर आहे की, ऐकणाऱ्याला त्यावर विचार करावाच लागतो आणि तिचे स्वतःचे मन इतके निःस्पृह आहे, संयमी आहे व तिचे स्वतःचे जीवन इतके कष्टाचे व दारिद्र्याचे आहे, कुणाचीही मदत न घेता ती इतक्या सहजपणे व विनातक्रार ते व्यतीत करत आहे की, पुरेसा परिचय झाल्यावर कुणाच्याही मनात तिच्याविषयी आदर, सहानुभूती निर्माण होते आणि त्यामुळेही तिचे विचार इतरांना हळूहळू कमी अनाकलनीय व कमी धक्कादायक वाटत जातात.




## स्त्री जातीचं सार्थक ?

गत पत्नीबाबत उरात जन्मभर प्रेम बाळगणाऱ्या आशुबाबूंना ताजमहाल हे शहानजहानच्या पत्नीवरील दिव्य, एकनिष्ठ प्रेमाचे प्रतीक वाटते; पण कमलच्या दृष्टीने ते फक्त बादशहाच्या कलाप्रेमी, स्वयंसिद्ध आनंदाच्या मनोवृत्तीचे प्रतीक होते. बादशहाला पुष्कळ बेगमा होत्या. एकनिष्ठ प्रेम त्याला माहीत नव्हते; पण त्यात काय बिघडते ? कमल म्हणते, 'एकदा ज्याच्यावर प्रेम केलं त्यात केव्हाही, कोणत्याही कारणानं बदल होणं शक्य नाही, अशी जर मनाची दृढ भावना असली तर ती स्वास्थ्यकरही नव्हे की, सुंदरही नव्हे !' आशुबाबूंबद्दल तिला अनेक कारणांनी प्रेमादर आहे; परंतु ती म्हणते, 'वर्तमानापेक्षा भूतकाळच अधिक चिरस्थायी असं समजून आयुष्य कंठायचं या वृत्तीत मोठासा आदर्श आहे असं मला मुळीच वाटत नाही.' आशुबाबू विचारतात, 'मनोरमेच्या स्वर्गस्थ आईच्या जागी दुसरी कुणी आणून बसविण्याची कल्पनासुद्धा कधी मनात आली नाही. त्याचं काय ?' कमलचे निर्भीड भाष्य असे आहे की, ते म्हातारे झाले होते व यापूर्वी मनाने ते म्हातारे होते. 'मनाचं वार्धक्य मी त्यालाच म्हणते आशुबाबू, की जे पुढे पाहायला तयार नसतं... गतकाल म्हणजे त्यांचं सर्वस्व. त्यांचा आनंद, त्याच्या वेदना तेच त्यांचं मुद्दल. ते मोडून खाऊन उरलेले दिवस कसेबसे काढायची इच्छा म्हणजेच वार्धक्य.

संयम, आत्मनिग्रह हे गुण आपल्या समाजात विधवांवर अस्वाभाविकरीत्या लादले होते. त्यामुळे कमलने या गुणांच्या आवश्यकतेवरच काही वेळा हल्ले चढविले आहेत. जिथे संयमात काही अर्थ नसतो तिथे संयम म्हणजे केवळ आत्मपीडन. विधवांचा सेवाभाव, दुसऱ्याच्या संसारात खपून आश्रिताप्रमाणे दडपलेले जीवन जगणे हा त्यांच्यापुढचा आदर्श होता. अविनाशचा संसार त्याची विधवा मेहुणी नीलिमा सांभाळीत होती. तिचा निर्देश करून हरेंद्र म्हणतो, 'स्त्रीत्वाचा एवढा मोठा महिमा, एवढा मोठा आदर्श, कुठल्या देशात आहे ? कोणत्या देशातल्या विधवा अशा प्रकारे परक्यासाठी आपला स्वार्थ असा नाहीसा करून टाकतात ?' कमलच्या मते, ही गोष्ट अद्भुत असेलही; परंतु अद्भुत म्हणून ती चांगली म्हणता येणार नाही. नीलिमेला ती म्हणते, 'शब्दांच्या जोरावर, विशेषणांच्या चातुर्यावर, लोक या गोष्टीला कितीही मोठी करून सांगोत; पण हे फारसं भूषणावह नाही... पूर्वकर्माच्या भोगाच्या कैफाखाली पुरुषजात आम्हाला बेभान करून ठेवीत असते. त्यांच्या शाबासकीची उंची दारू पिऊन आमचे डोळे धुंद होत असतात अन् मग आम्हाला वाटतं, स्त्रीजातीचं सार्थक ते हेच !' पुढे पुन्हा एकदा तिने नीलिमेला म्हटले आहे, 'स्त्रीपुरुषांच्या प्रेमाचा इतिहास म्हणजे मानवी संस्कृतीचा सर्वांत मोठा इतिहास–सत्याचा खरा पत्ता सर्वांपेक्षा

अधिक त्यांनाच लागलेला आहे; पण ज्यांनी घोषणा केलीय की, पुत्रासाठीच भार्येचं प्रयोजन, त्यांनी स्त्रीजातीचा नुसता अपमान केला आहे इतकंच नव्हे तर स्वतःच्या मोठेपणाचा मार्गसुद्धा त्यांनी बंद करून टाकलाय.. गोड गोड बोलाच्या नाना अलंकारांनी आमचा देह सजवून ज्यांनी प्रचार केला आहे की, मातृत्व म्हणजेच स्त्रीजातीची खरी सार्थकता, त्यांनी साऱ्या स्त्रीजातीची फसवणूक केलीय ! अन्यत्र तिने म्हटले आहे, 'या जगात अनेक गोष्टी घडून येत असतात त्यातली लग्न ही एक गोष्ट आहे. ते लग्न म्हणजेच स्त्रीचं सर्वस्व असं ज्या दिवशी ठरलं गेलं त्या दिवसापासूनच स्त्रीच्या जीवनातली मोठ्यातली मोठी ट्रॅजिडी सुरू झालेली आहे.

## अजित–कमल–शिवनाथ

अजितला भारतीय परंपरेचा अभिमान असूनही त्याचे कमलवर प्रेम जडत जाते. मनोरमेने त्याला दिलेल्या धक्क्यामुळे त्याच्या हे लक्षात आले असावे की, केवळ शिक्षण, संस्कार, घराणी याबाबतीत वधू–वर अनुरूप आहेत एवढ्यामुळेच त्यांच्यात पुढे प्रेम निर्माण होईल असे नाही. विवाहपूर्व प्रेमाचा विचारच पूर्वी कधी त्याच्या मनात आलेला नव्हता. तीन–चार वर्षे तो विलायतेत राहून आलेला असला तरी तो भारतीय परंपरेचा अभिमानी होता; परंतु पूर्वी शिवनाथवरचे कमलचे प्रेम पाहून व आता कमलवर जडत चाललेले त्याचे स्वतःचे प्रेम पाहून 'प्रेम' या गोष्टीच्या सामर्थ्यावर आता त्याचा विश्वास बसला असावा. त्याबरोबरच रूपाचे आकर्षण, क्षणिक शारीरिक वा बौद्धिक मोह आणि खरे प्रेम यात फरक कुठे व कसा आहे यावर त्याचे अंतर्मन सारखा विचार करीत राहाते. कमलशी चर्चा करताना त्याने एकदा म्हटले आहे की, मोहाची तुलना धुक्याशी करता येईल तर खऱ्या प्रेमाची तुलना सूर्याशी करता येईल. धुके नष्ट होते, सूर्य मात्र अचल आहे. कमल म्हणते की, धुकेही खरे आहे व सूर्यही खरा आहे. धुके नेहमीच असते व वारंवार ते सूर्याआड येत असते. 'सूर्य अचल आहे की नाही ते सांगता यायचं नाही; पण धुकं खोटं आहे असंही काही शाबित झालेलं नाही. कदाचित ती दोन्ही नश्वर असतील, कदाचित दोन्ही चिरंतन असतील, त्याप्रमाणे मोह क्षणिक असेलही; परंतु तो मोहाचा क्षण खोटा म्हणता येणार नाही. क्षणकालच्या सत्याची पुन्हा पुन्हा आवृत्ती होत असते. मालतीच्या फुलाचं आयुष्य सूर्यमुखीच्या फुलाइतकं टिकाऊ नाही म्हणून का ते कुणी फेकून देतं ?'

शिवनाथने तिच्याशी शैवपद्धतीने विवाह केला होता; पण तो रूढ नसल्याने त्यात पळून जायला मार्ग मोकळा होता. त्याचीही तिला चिंता वाटली नव्हती. ही मोकळीक दोघांच्याही दृष्टीने चांगली असे तिचे भाष्य आहे. शिवनाथ तिला सोडून जातोही. कमलला दुःख तर होतेच; पण तिची खरी तक्रार एवढीच असते की, त्याने नुसता पळ न काढता तिला सर्व गोष्टी स्पष्ट करून मग जायला पाहिजे होते. फसवून गेल्याप्रमाणे तो नुसताच गायब होतो; पण त्याच्याबरोबर घालविलेले प्रेमाचे दिवस खोटे थोडेच होते ? प्रेम किती काळ टिकते याच्या लांबीरुंदीवर प्रेमाच्या आनंदाचे मोजमाप करता येईल का ? अजितचे प्रेम तिच्यावर जडू लागल्यावर त्यालाही तिच्या बुद्धिवादी मतामुळे तिच्या प्रेमाच्या चिरस्थायित्वाबद्दल खात्री वाटत नाही. यासंबंधी चर्चा निघते तेव्हा ती म्हणते, 'झाडावरून तोडून आणलेलं फूल कोमेजतं, म्हणून कधीही न कोमेजणाऱ्या कागदी फुलांची पुरचुंडी आणून जे फुलदाणीत ठेवतात त्यांचं माझं कधीच जमायचं नाही. तुम्हाला हेच सांगायचंय मला की, कोणत्याही प्रकारच्या आनंदात चिरस्थायित्व नसतं, असतात ते क्षणस्थायी काही दिवस. मानवी जीवनातला मोठ्यातला मोठा संचय काय तो तो ! तो बांधून ठेवायला गेलं की, संपतंच त्याचं आयुष्य !' तिचंही पूर्वी शिवनाथवर खूप प्रेम होतं. 'आज त्याचा मागमूस दिसत नाही, म्हणून त्या वेळी तुमच्या नजरेला जे माझं शिवनाथवरचं प्रेम आलं ते नुसतं माझं ढोंगच का ?... त्या वेळचं ते प्रेम असणं जितकं खरं तितकंच आजचं नसणं हेही खरं.'

अजित विचारतो, 'जे क्षणभंगुर आहे, जे अल्पकाळ टिकतं त्याला माणूस महत्त्व कसं देईल ?' कमल म्हणते, 'नाही देणार ते मला माहीत आहे, माझ्या ओसरीच्या कडेला जे फूल फुललंय त्याचं आयुष्य अर्ध्या दिवसापेक्षा जास्त नाही. त्याच्यापेक्षा हा चटणी वाटायचा वरवंटा जास्त टिकाऊ. तुम्हाला सत्याची कसोटी लावून पाहायला याच्यापेक्षा दुसरं मोठं साधन कुठं मिळेल ?... फुलाचं मर्म ज्याला कळत नाही त्याच्या दृष्टीनं दगडाचा वरवंटाच सत्यस्वरूप ठरतो. पाकळ्या गळायची, कोमेजायची भीतीच नाही मुळी ! चार घटकांचं आयुष्य नाही त्याचं, चिरंजीव आहे तो ! स्वयंपाकघरात तो फार उपयोगी. जन्मभर घोटून घोटून मसाला कुटून देईल. भात गिळायला भाजी–आमटीसाठी मसाला हवा ना ? तो द्यायचं सामर्थ्य आहे त्याचं. तो चिरंजीव वरवंटा नसला तर हा संसार निःसार होईल... हृदय ही चीज लोखंडाची बनविलेली नाही हे माणसाच्या लक्षातच येत नाही. अगदी निश्चितपणे त्याच्यावर विसंबून चालत नाही... शिवनाथला मी इतक्या सहजपणे क्षमा कशी केली याचा विचार करूनही कुणी पाहिलं नाही. जन्मभर रडत बसत, तारुण्यात संन्यासिनी होणं त्यांना पटतं; पण हे सहन होत नाही त्यांना. झाडाचं वाळलेलं पान गळून पडतं आणि त्याच्या जागी नवं पान उगवतं हे झालं खोटं आणि बाहेरची वाळलेली वेल मेली तरीसुद्धा झाडाच्या सर्वांगाला बिलगून चावा घेऊन राहाते हे सत्य झालं होय ?'

एखाद्या वेळी आपण मोहाला बळी पडलो तर त्यातून दुःखच निर्माण होते. अशा वेळी आपल्याला खराखुरा आनंद मिळाला असं म्हणता येईल काय ? अजितच्या या प्रश्नाला उत्तर देताना कमल म्हणते, 'ज्या वेळी जेवढं मिळालं तेवढंच पदरात पडलं असं मी धरून चालते. पूर्वी मिळालेल्या सुखाच्या लहानशा बिंदूलादेखील नंतरच्या दुःखाचा दाह आटवू शकत नाही. तो बिंदु केवढा का लहान असेना, तरीही तो आनंदाचा अनुभव नाकबूल करता यायचा नाही... या जीवनात सुख असो की दुःख, काहीच खरं नव्हे अजितबाबू. सत्य आहे तो चंचल क्षण. त्या क्षणाची पळती

**'या जीवनात सुख असो की दुःख, काहीच खरं नव्हे अजितबाबू....'**

पाऊलवाट. बुद्धीनं आणि भावनेनं तो क्षण आत्मसात करणं, म्हणजेच तो आनंद खरोखर मिळवणं.' अजित म्हणतो, 'एक दिवस मीही तुला असाच गमावून बसलो तर काय होईल ?' कमल शांतपणे म्हणाली, 'काहीसुद्धा व्हायचं नाही. त्या दिवशी ते गमावून बसणंही तितकंच सहज होऊन जाईल.' अजित म्हणतो, 'विलायतेत असताना पाहिलंय ते. अगदी क्षुल्लक कारणासाठी ते लोक कायमची ताडातोड करून टाकतात. मला वाटे, यांना मुळीच का हे जाणवत नाही ?' कमल म्हणाली, 'अजितबाबू, या गोष्टी वर्तमानपत्रात वाचल्या म्हणजे जेवढ्या सोप्या दिसतात तेवढ्या सोप्या सरळ नसतात त्या. तरीसुद्धा मला वाटतं, स्त्री-पुरुषांच्या परिचयाची ही पद्धत एके दिवशी या जगात हवापाण्याइतकीच स्वाभाविक होऊन जाईल !'

## प्रेमाचे रहस्य

यातून सुख व दुःख दोन्ही निर्माण होऊ शकतात हे मान्य करून कमल नंतर एकदा आशुबाबूंना म्हणते, 'शिवनाथनं देता येण्याजोगं होतं ते दिलं. मला मिळण्याजोगं होतं ते मिळालं. आनंदाचा तो छोटा क्षण मी हिरेमाणकासारखा जपून ठेवला आहे ! उगीच मनात भडका उडवून मी तो जाळून टाकला नाही की, आटलेल्या झऱ्याखाली भिक्षा घाला म्हणून हात पसरूनही राहिले नाही. त्याच्या प्रेमाचं आयुष्य जेव्हा संपलं तेव्हा शांत मनाने त्याला निरोप दिला !' आशुबाबू जेव्हा विचारतात की, तिने शिवनाथवर जेवढ्या उत्कटपणे प्रेम केले तेवढ्या उत्कटपणे तिला पुन्हा कुणावर प्रेम करता येईल काय ? तेव्हा क्षणभरही न डगमगता कमल म्हणते, 'त्याच आशेवर तर जीव धरून राहिले आहे आशुबाबू. आज सूर्य ढगाआड गेलाय म्हणून पडलेला काळोख तोच खरा अन् उद्या सकाळी प्रकाशानं सारं आकाश भरून जाईल तेव्हा दोन्ही डोळे झाकून घेऊन तो प्रकाशच नव्हे, ते सारं खोटंच, असं का समजायचं ? जीवनाबरोबर असा पोरखेळ खेळून का जीवनाची सांगता करायची ?' ही हकीकत नंतर इतरांना सांगताना आशुबाबूंनी भाष्य केले आहे, 'ती अदृष्ट मानीत नव्हती. तिच्या समोरच्या रस्त्याला भूतकाळाची आठवण आड येत नव्हती. जे आजसुद्धा येऊन पोहोचलेलं नाही त्यालाच ती अनागत म्हणत होती. म्हणूनच तिची आशाही जशी जबरदस्त होती तसा तिचा आनंदही अखंडित होता. कुणी तरी आपल्या जीवनाचा खेळखंडोबा केला म्हणून स्वतःच्या जीवनावर पाणी सोडायची तिची तयारी नव्हती.'

कमलला सोडून शिवनाथ मनोरमेचा छंद धरतो. दोघेही विवाह करायचे ठरवितात व आशुबाबूंनी आशीर्वाद द्यावा म्हणून दोघांची त्यांना पत्रे येतात. त्यामुळ आशुबाबू चिडून जातात. हा विवाह होऊ नये म्हणून काय करता येईल याचा विचार करू लागतात. बापाला नुसती मायाच नसते, कर्तव्यही असते. शिवनाथ हा एक बदमाष होता हे त्यांनी ओळखले होते. या सवनाशी जबड्यातून मुलीला कसे वाचवायचे असा त्यांना प्रश्न पडला होता; पण त्यांनी जरब देऊनही या एकुलत्या एक मुलीने ऐकले नाही तर ? हे लग्न झाले तर बापाचा एक पैसाही तिला मिळणार नाही असे मुलीला लिहावे काय ? पण कमल म्हणते, 'तुम्हाला न जुमानता तिने जर चूक केली तर त्याचं फळ ती भोगील; पण तिचं दुःख निवारण करता आलं नाही तर तिच्या दुःखाचा बोजा काय तुम्ही हजारपट वाढवून ठेवणार ?... जो माणूस अगदी वाईट आहे असं तुम्हाला वाटतं, त्याच्या हाती जन्माची कंगाल करून का तुम्ही आपल्या मुलीला सोपविणार आहात ? फिरून घरी यायचा मार्ग काय तुम्ही तिला मोकळा ठेवणार नाही ?'

पण नंतर नवऱ्याला सोडचिठ्ठी देऊन परत येण्याची कल्पना आशुबाबूंच्या संस्कारात बसत नव्हती. याउलट कमलचे म्हणणे असे होते की, 'आपली चूक ज्या वेळी कधी तिच्या नजरेला येईल त्या वेळी ती दुरुस्त करण्याचा मार्ग तिला बंद असता कामा नये. आपल्या चुका दुरुस्त करीतच अशा प्रकारे आज माणूस माणसात आला आहे. जोपर्यंत दुसऱ्या बाजूची वाट मोकळी आहे तोपर्यंत चूक करायला भ्यायला नको आशुबाबू. ती वाट बंद असल्याचं आज तुम्हाला दिसतंय म्हणूनच तुमच्या मनात इतकं काहूर उठलेलं आहे.' मुलीला केवळ जरब दाखविली तर कदाचित ती ऐकेलही; पण नंतर बापाबद्दल तिला उभ्या आयुष्यात आदर वाटणार नाही ही शक्यताही कमलने बोलून दाखविली.

आशुबाबूंच्या दृष्टीने मनोरमेचे शिवनाथबद्दलचे प्रेम ही केवळ एक धुंदी होती, कैफ होता. धुंदी उतरली म्हणजे तिच्या दुःखाला पारावार राहणार नव्हता. त्या वेळी तिचा बचाव कसा होणार होता ? कमल म्हणते, 'त्या कैफात थोडी भावनाही आहे. धुंदी उतरून ती जेव्हा भानावर येईल तेव्हा मात्र तिला कसलंच भय राहायचं नाही. तिचं ते त्यानंतरचं मनस्वास्थ्यच त्या वेळी तिचा बचाव करील.' कमल स्वतः बुद्धिमती होती, संयमी होती. तिच्या बाबतीत असं होणे शक्य होते; परंतु मनोरमेला शिवनाथने फसविल्यानंतरही तिचा मोह कायम राहिला तर ? तिचा काही पैसा असल्यास तो उधळून मग त्याने तिची अवहेलना व उपेक्षा केली तर ? एकीच्या बाबतीत जे शक्य झाले ते दुसरीच्या बाबतीत शक्य होईलच असे नाही. परत आल्यावर केवढे तरी आयुष्य मनोरमेला जगायला लागेल ते ती कसे जगणार ? कमल म्हणते, 'मी आजवर कशी जगून राहिले आहे ? ज्या वेळी तिची चूक तिला कळून येईल त्या वेळी तो तिला सहज मोकळीक देईल. कोणत्याही लोभाच्या किंवा जरबेच्या भीतीनं तो तिला ग्रहण लावणार नाही एवढाच तुम्ही तिला आशीर्वाद द्या !' कमलच्या मते प्रेम हे एक रहस्य होते. जीवनातला एक गूढ अनुभव होता. मनोरमा त्या रहस्यापुढे जाऊन उभी राहिलेली होती आणि तो अनुभव आई-बापांच्या चिंतेपेक्षाही फार मोठा होता, मौल्यवान होता. तो पत्करण्याखेरीज गत्यंतर नव्हते. आकडेमोड करून प्रेमाचे फळ शोधायला गेले तर ते सापडू शकेल का ? कमलला वाटले : पुढे कधी तरी, शिवनाथचे प्रेम व स्वास्थ्यकर जीवन गमावल्यानंतरही, मनोरमेच्या हाती जे काही पडणार होते, ते तिच्या बापाच्या सुखी दांपत्यजीवनापेक्षा पुष्कळच अधिक होते. कोणत्याही वस्तूचे मूल्यमापन करताना त्याचे परिणाम पाहण्याचीच ज्यांची एकमात्र कसोटी, त्यांच्याबरोबर वाद करायचा कसा ? ती मनात म्हणाली, आशुबाबू, मोह आहे म्हणूनच केवळ तो खोटा नव्हे. मुलीच्या चित्ताकाशांत क्षणभर चमकणारी ती विजेची रेषा ! बापाच्या सतत तेवत राहिलेल्या नंदादीपाचा प्रकाश परि-

णामाच्या दृष्टीने दिपवून टाकू शकेल. तिला वाटले : ही माणसे घराची एकच खिडकी उघडी ठेवीत होती, त्यामुळे बाहेरच्या दृश्याची एकच बाजू त्यांना दिसत होती.

पाश्चात्य देशांतल्या घटस्फोटांचा उल्लेख करून आशुबाबू म्हणाले, आमच्या देशातली विवाहाची प्रथा कशी आहे ? ती कधीच कोसळत नाही कमल.' कमल म्हणाली, ' कोसळण्याचा प्रश्नच नाही आशुबाबू; तो काही अनभिज्ञ तारुण्याचा पागलपणा नव्हे. सर्वदर्शी गुरुजनांनी आकडेमोड करून केलेला तो व्यवस्थित कारभार आहे. ते स्वप्नातलं मुद्दल नव्हे, डोळे उघडे ठेवून, शहाण्यासुरत्या माणसांनी शक्य तितकी घासाघीस करून ठरविलेला तो बिनधोक व्यवहार आहे. आकडेमोडीत कुठे गळेकापू गल्लत नसली तर तो व्यवहार सहसा तडकत नाही. या अन् त्या साऱ्या बाजूनं तो मजबूत असतो. जन्मभर वज्रासारखा टिकून राहातो.'

प्रेम, प्रेमविवाह घटस्फोट याबद्दल जशी तिने बुद्धिवादी व व्यक्तिवादी मते प्रदर्शित केलेली आहेत तद्वतच देशाभिमान, पूर्वपरंपरेचा अभिमान याबद्दलही त्याच प्रकारची मते प्रदर्शित केलेली आहेत. एकदा अशीच चर्चा निघाल्या वेळी अविनाश म्हणतो, ' देशातल्या सामाजिक व्यवहारात सुधारणा करायची असली, तर सुपरिचित आणि सुप्रतिष्ठित मार्गानं जाणंच आवश्यक असतं. युरोपच्या संसर्गानं आम्ही बऱ्याच चांगल्या गोष्टी शिकलो आहोत, आमच्यातल्या बऱ्याचशा उणीवा आमच्या नजरेला आलेल्या आहेत, कबूल आहे मला; पण आम्हाला ज्या सुधारणा करायच्या आहेत त्या आमच्या स्वतःच्या पद्धतीने झाल्या पाहिजेत. परक्यांचं अनुकरण इष्ट नाही.' भारतीयांनी आपल्या वैशिष्ट्यांचा एवढा बडिवार का माजवावा ते कमलला कळत नाही. ती म्हणते, ' कोणत्याही देशाच्या वैशिष्ट्यासाठी काही माणूस अस्तित्वात आलेला नाही. माणूस आहे म्हणूनच त्या वैशिष्ट्याचं महत्त्व. जे पाहायचं ते हेच की वर्तमानकाळात ते वैशिष्ट्य कल्याणप्रद आहे की नाही ? एखाद्या जमातीचं कोणतं तरी एखादं विशेषत्व फार दिवस चालत आलेलं आहे, म्हणून त्याच साच्यातून त्या देशातला माणूस सदोदित बनवला पाहिजे असं म्हणण्यात काय अर्थ ? माणसाचं विशेषत्व हे त्या माणसापेक्षा मोठं नव्हे आणि हेच जर आपण विसरलो तर विशेषत्वही जातं आणि माणूसही नाहीसा होतो. आपल्या जुन्या संस्कृतीतलं जे नाहीसं होणार नाही ते कधीही जाणार नाही. माणसाच्या योजनेनं तें पुन्हा नव्या स्वरूपात, नव्या सौंदर्यात, नव्या मूल्यांत दिसून येईल. तोच होईल त्याचा खराखुरा परिचय. नाही तर, बराच काळ टिकून राहिलं म्हणून त्याला आणखी बराच काळ टिकवून धरलं पाहिजे या म्हणण्यात काय हशील ?...आतिथ्य म्हणजे आमचा किती मोठा आदर्श ! किती कथा, किती काव्यं, किती पुराणं त्यावर आधारून लिहिली गेली आहेत ! अतिथीला खूष करण्यासाठी दाता कर्णानं पुत्रहत्या सुद्धा केली ! या प्रसंगाच्या कथा ऐकताना किती लोकांनी डोळ्यातून किती पाणी सांडलं असेल त्याला अंत नाही ! आणखी एक गोष्ट तर नुसती ओंगळच नव्हे तर बीभत्स आहे. कुष्ठरोगानं सडलेल्या नवऱ्याला पाठंगुळीला घेऊन एक पतिव्रता त्याच्या रखेलीच्या घरी गेली होती. एके काळी या आदर्शाला तुलना नाही असं समजलं जात होतं; पण आता ती गोष्ट नुसती ऐकली तरी शिसारी येऊ लागते. पूर्वीच्या जीवनात जो आदर्श आणि त्याग, आश्चर्य आणि श्रद्धा निर्माण करण्यास कारणीभूत झाला तो कदाचित आज कीव करण्याजोगा विषय ठरेल !'

( क्रमशः )

(कमल, शिवनाथ, मनोरमा, अजित व आशुबाबू यांच्या व्यक्तिमत्त्वाची पुसट ओळख या पहिल्या भागात आहे. पुढील अंकातील दुसऱ्या भागात या व्यक्तींमधील बदलत गेलेले नातेसंबंध आणि त्यातून या कादंबरीची नायिका 'कमल'च्या नवमतवादी विचारांचं स्पष्ट चित्र शरदबाबूंनी रेखाटलं आहे.)

# एम. जी. आर. ला शिवाजी गणेशनचे आव्हान

अभय गोखले

दक्षिणेकडील राजकारणात सीनेनटांचा वाढता प्रभाव दुर्लक्षित करण्यासारखा नाही. करुणानिधी, एम. जी. रामचंद्रन या सीनेव्यवसायातील मातब्बर व्यक्तींनी तामिळनाडूचे मुख्यमंत्रिपद भूषवल्यावर त्यांच्या पावलावर पाऊल टाकून आंध्रमध्ये तेथील लोकप्रिय नट एन. टी. रामारावने इंदिरा कॉंग्रेसची इतक्या वर्षांची सत्ता उलथवून थोड्याच कालावधीत लोकप्रियता मिळवलेल्या आपल्या तेलगुदेशम या पक्षाला प्रचंड बहुमताने सत्तेवर आणले व तोही आता करुणानिधी, एम. जी. रामचंद्रन यांच्याप्रमाणे आंध्रप्रदेशाचे मुख्यमंत्रीपद भूषवत आहे. दाक्षिणात्य लोकांमध्ये चित्रपटांचे वेड जबरदस्त आहे आणि काही गाजलेले नट व नट्या देवाप्रमाणे आदरणीय वाटतात. त्यांची या नटांवर खूपच भक्ती असते. प्रत्येक स्टार–ॲक्टरचे पाठीराखे गावोगावी पसरलेले असतात व त्या त्या नटाच्या फॅन्सचे क्लब साधारणतः गावोगावी आढळतात. मग हा नट म्हणेल ती पूर्वदिशा समजून ते तो सांगेल त्याप्रमाणे भारावलेल्या भावनेने करतात. साधारणतः दक्षिणेतील नट हे कन्नड, तामीळ, तेलगु, मल्याळम या चारी भाषांतून कामे करतात. त्यामुळे एखाद्या तामिळनटाचे फॅन्स हे फक्त तामिळनाडूतच नव्हे तर कर्नाटक, आंध्र, केरळ या तिन्ही राज्यांतही असतात. या नटांचा चाहतावर्ग मोठा असण्यामागे हेही एक कारण असेल. हिंदी चित्रपटांची काशी ही मुंबई मानली जाते त्याप्रमाणे मद्रास ही दाक्षिणात्य चित्रपटांची काशी आहे.

तामिळनाडू व आंध्रमध्ये नट हे मुख्यमंत्री असताना कर्नाटक व

केरळ ह्या बाबतीत मागे राहू इच्छित नाहीत. प्रत्येकाने आपापले फिल्ड सांभाळावे ही गोष्ट दाक्षिणात्य लोकांना समजत नाही. नटाने चित्रपटक्षेत्र गाजवावे तर राजकारण हे राजकारणाची खाज असलेल्यानेच बघावे हा विचार सामान्य दाक्षिणात्य मतदार पहात नाही. त्यामुळे काही वेळा गमतीजमती निर्माण होतात. ह्याचा अनुभव आंध्रप्रदेशात एन. टी. रामाराव हा नट मुख्यमंत्री झाल्यापासून पहावयास मिळत आहे. एन. टी. रामारावची सुरुवातीला विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळेस धांदल उडत असे. त्याने मुख्यमंत्री झाल्यावर काही घोषणा केल्या, त्या तो राजकारणाला नवखा असल्याने नंतर त्याच्या अंगलटीस आल्या. महाराष्ट्रात दादा कोंडकेसारखा लोकप्रिय नट फार तर निवडून येईल (ग्रामीण भागातून) पण त्याने पक्ष स्थापन करून निवडणुका लढवल्या तर त्याचा पक्ष सत्तेवर येऊ शकणार नाही. कारण एखाद्या नटाला राजकारणी म्हणून स्वीकारण्यास महाराष्ट्रियन लोक तयार होणार नाहीत. प्रत्येकाने आपापला प्रांत सांभाळावा. एकमेकांच्या प्रांतात लुडबूड नको असा महाराष्ट्रियन माणसाचा सुज्ञ दृष्टिकोन असतो. शिवाय एखाद्या नटाचे भक्त बनून तो सांगेल ती पूर्वदिशा म्हणण्याइतके महाराष्ट्रियन लोक बहकलेले नाहीत. मागे महाराष्ट्राचा आणि भारताचाही लोकप्रिय खेळाडू सुनील गावस्करने एक दोन मराठी चित्रपटात भूमिका केल्या; परंतु त्याच्या चित्रपटातील भूमिकांना प्रेक्षकांकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही. कारण त्याच्या चाहत्यांना त्याचे धावा जमवण्यासाठी धावणे आवडते; पण एखाद्या चित्रपटात त्याने नटीमागे धावणे त्यांना रुचत नाही, याचे कारण तो त्याचा प्रांत नव्हे असे महाराष्ट्रियन रसिक व त्याचे क्रिकेटफॅन्स समजतात. आंध्रप्रदेशात एन. टी. रामाराव, तामिळनाडूत करुणानिधी, एम. जी. रामचंद्रन, जयललिता हे सिनेव्यवसायातील लोक राजकारण व्यापून टाकत असताना केरळात प्रेमनझीर हा नट आता राजकारणात उतरला आहे. केरळात अगोदरच असंख्य पक्ष असताना त्यात प्रेमनझीरच्या आणखी एका पक्षाची भर पडेल. अर्थात केरळातील छोटया छोटया पक्षांचे महत्त्व लक्षात घेता व तेथील जातींवर आधारित पक्षरचना पहाता प्रेमनझीरचा पक्ष एकटयाने सत्ता काबीज करू शकणार नाही हे उघडच आहे. केरळमध्ये साधारणतः प्रत्येक जातीचा पक्ष असल्याने जरी तेथे इतर दाक्षिणात्य प्रेक्षकांप्रमाणे चित्रपटवेडे असले तरी आपल्या जातीच्या उमेदवाराला जास्त महत्त्व दिले जाईल. त्यामुळे आंध्र, तामिळनाडूप्रमाणे तेथे प्रेमनझीरला, एन. टी. रामाराव व करुणानिधी–एम. जी. आर यांच्याइतके भव्य यश मिळणार नाही.


## शिवाजी गणेशनचे भक्त

कर्नाटकात तेथील लोकप्रिय स्थानिक नट राजकुमारने धुमाकूळ घालावयास सुरुवात केली आहे. एखादा पक्ष स्थापून आपण एन. टी. रामाराव किंवा एम. जी. रामचंद्रन व्हावे असे त्याला वाटते किंवा नाही हे आताच स्पष्ट झालेले नाही; परंतु कर्नाटकात गावोगावी पसरलेल्या त्याच्या फॅनसक्लबनी मनावर घेतलं तर तो सत्तारूढ जनतापक्ष व इंदिरा कॉंग्रेसपक्ष यांना जबरदस्त आव्हान निर्माण करू शकेल. निरनिराळ्या सरकारी कार्यालयात व इतरत्र कन्नडभाषा सक्तीची करण्यावरून कन्नडवाद्यांनी जे उग्र आंदोलन चालवले आहे त्याचा प्रमुख सूत्रधार राजकुमार हा तेथील लोकप्रिय नट आहे. कन्नडभाषेच्या प्रश्नावरून लोकांची सहानुभूती गाठीस बांधून मग पक्ष स्थापन करून अथवा एखाद्या पक्षाला पाठिंबा देऊन सत्तेवर येण्याचा राजकुमार व त्याच्या चाहत्यांचा मनसुबा असण्याची शक्यता नाकारता येत नाही. राजकुमार हा नट कन्नडबरोबरच तामिळ चित्रपटांतही कामे करत असल्याने त्याच्या कन्नडभाषेच्या फाजील अभिमानामुळे तो आपला तामीळ प्रेक्षकवर्ग गमावण्याची शक्यता आहे. त्याशिवाय काही तामिळी तर आता त्याचा द्वेष करायला लागले आहेत. कारण राजकुमारचे कन्नड पाठीराखे कर्नाटकातील तामिळींना त्रास देतात. त्याची प्रतिक्रिया म्हणजे राजकुमार एके ठिकाणी चित्रपटाच्या शूटिंगसाठी गेला असता त्याच्यावर काही तामिळींनी हल्ला केला. नंतर मग या प्रकाराने चिडून जाऊन राजकुमारच्या पाठीराख्यांनी कर्नाटकातील तामिळींना नेहमीप्रमाणे त्रास दिला. कर्नाटकात तामीळ चित्रपट दाखवण्यास काही दिवस बंदी घालण्यात आली. राजकुमारच्या पाठीराख्यांनी याचा फायदा घेऊन बराच दंगा केला व तामिळींच्या मालमत्तेचे नुकसान केले. राजकुमारला आपले तामीळ पाठीराखे (प्रेक्षक) गमवायचे नव्हते. मग त्याने आपल्यावर हल्ला झाल्याचा किंवा आपल्याला दुखापत झाल्याचा इन्कार केला व जे तामीळ युवक आपल्यावर चालून आले होते त्यांच्याच नायकाने तसे करण्यापासून त्यांना परावृत्त केल्याचा खुलासा केला. हा सर्व खुलासा अर्थातच मद्रासमध्ये व इतरत्र तामीळवाद्यांनी आपल्या चित्रपटांवर बहिष्कार घालू नये व त्यांच्यातील आपली लोकप्रियता कमी होऊ नये म्हणूनच केलेला होता. तामिळनाडूत आता शिवाजी गणेशन या नटाने जोर केला आहे. मराठी माणसाचे दैवत छत्रपती शिवाजीमहाराज यांचा शिवाजी गणेशन हा परमभक्त आहे. एक नट म्हणून शिवाजी गणेशन हा उच्च दर्जाचा मानला जातो. त्याच्या बहुतेक चित्रपटांनी एक वेळ तामिळनाडूतील प्रेक्षक अक्षरशः त्याचे परमभक्त होऊन गेले होते. त्याच्या उच्च दर्जाच्या अभिनयाने तो तामिळनाडूत दिलीपकुमारप्रमाणे गौरवला जातो. आता तो तरुण राहिला नाही तरी अजूनही त्याचा असा मोठा प्रेक्षकवर्ग तामीळनाडूत आहे.एम.जी. रामचंद्रनच्या खालोखाल तामिळनाडूत शिवाजी गणेशनच लोकप्रिय आहे. शिवाजी गणेशनचे फॅनसक्लब तामिळनाडूत सर्वत्र आहेत. शिवाजी गणेशन तसा राजकारणात नवखा नाही. मात्र करुणानिधी, एम. जी. आर. यांचा प्रादेशिक वाद त्याला कधीच मानवला नाही. राष्ट्रीय दृष्टिकोनास महत्त्व देऊन तो सतत कॉंग्रेसमध्येच राहिला. प्रथम तो कामराज यांचा पाठीराखा समजला जायचा. त्याने नेहमीच निवडणुकांच्या वेळेस कॉंग्रेसला मदत केली; परंतु करुणानिधी किंवा एम. जी. आर. यांच्याप्रमाणे स्वतःच्या पाठीराख्यांचा पक्ष स्थापन केला नाही. कॉंग्रेसला त्याने मदत केली; पण त्या बदल्यात एखादे पद मागितले नाही. १९६९ मध्ये कॉंग्रेसमध्ये फूट पडून सिंडिकेट व इंडिकेट अशी दोन शकले झाल्यावर तो कामराज यांच्याबरोबर सिंडिकेटमध्ये राहिला. कामराज यांच्या निधनानंतर तामिळनाडूत संघटना कॉंग्रेस नावालाच राहिली; मग शिवाजी गणेशन इंदिरा गांधींच्या कॉंग्रेसमध्ये आला.


## एम. जी. आर.ला दुखावणारे ?

तामिळनाडूत सध्या इंदिरा काँग्रेसमध्ये दोन ग्रुप आहेत. एक मुपनार यांचा व दुसरा संरक्षणमंत्री व्यंकटरामन यांचा. मुपनार हे अखिल भारतीय इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस आहेत. शिवाजी-गणेशन सुरुवातीला मुपनार–ग्रुपबरोबर होता; परंतु राज्यसभेत उमेदवार नॉमिनेट करताना मुपनार यांनी अमिताभ बच्चनला शिवाजी गणेशनपेक्षा पसंत केल्याने त्या दोघांमध्ये शत्रुत्व निर्माण झाले आहे. शेवटी शिवाजी गणेशनलाच राज्यसभेमध्ये नॉमिनेट करण्यात आले. एवढ्या वर्षांच्या त्याच्या काँग्रेस-सेवेबद्दल त्याला हे पद मिळाले. त्याचबरोबर पद्मश्रीसारखे किताबही मिळाले. सध्या तामिळनाडू काँग्रेसचे अध्यक्ष असलेले पालानीयांदी हे मुपनार-ग्रुपचे आहेत तर व्यंकटरामन यांचा ग्रुप शिवाजी गणेशनच्या सहाय्याने मुपनार–ग्रुपला शह देण्याच्या प्रयत्नात आहे. शिवाजी गणेशनने आता तामिळनाडूतील इंदिरा काँग्रेसला तेथे सत्तेवर आणण्याचा चंगच बांधला असून त्या दृष्टीने पूर्वतयारी म्हणून त्याच्या पाठीराख्यांची एक भव्य राज्यव्यापी परिषद त्याने मध्यंतरी मद्रास येथे भरवली होती. त्या परिषदेला त्याच्या पाठीराख्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला. त्याच्या त्या मेळाव्यास अर्ध्या लाखाहून जास्त लोक उपस्थित होते. शिवाय शिवाजी गणेशनची जेव्हा भव्य मिरवणूक शहरात काढण्यात आली तेव्हा त्याच्या स्वागतास्तव त्याला शुभेच्छा देण्यास रस्त्याच्या दुतर्फा या मिरवणुकीत हजारो लोक सामील झाले होते. शिवाजी गणेशनची ही लोकप्रियता व त्याच्या रूपाने निर्माण झालेले जबरदस्त आव्हान पाहून अण्णाद्रमुक व द्रमुक हे दोन्ही पक्ष इतके हादरून गेले की, लगेच दुसऱ्या दिवशी या पक्षांना पाठिंबा देणाऱ्या वृत्तपत्रांतून शिवाजी गणेशनवर टीकेची राळ उडवण्यात आली व तो सर्व प्रकार म्हणजे एक स्टंट असण्याची मल्लीनाथी करण्यात आली; परंतु शिवाजी गणेशनच्या मेळाव्यास अपशकुन केला तो अण्णाद्रमुक किंवा द्रमुकने नव्हे तर त्याच्याच इंदिरा काँग्रेस पक्षातील नतद्रष्टांनी. मुपनार-ग्रुपने या मेळाव्यावर बहिष्कार टाकला. आपापसातील हेवेदावे बाहेरच्या जगाला दिसू नयेत म्हणून तामिळनाडू काँग्रेसचे अध्यक्ष पालानीयंदी यांना या मेळाव्यात हजर करण्याचे जोरदार प्रयत्न शिवाजी गणेशनच्या पाठीराख्यांनी केले; परंतु त्यांच्या आग्रहाला पालानीयंदी बळी पडू नयेत म्हणून मुपनारग्रुपने त्यांची मेळाव्याच्या वेळेस दूरवर रवानगी केली होती. मात्र व्यंकटरामनगटाचा शिवाजी गणेशनला जोरदार पाठिंबा आहे. तामिळनाडूत सत्ता काबीज करायची असेल किंवा निदान द्रमुकला मागे टाकून दोन नंबरचा पक्ष बनायचे असेल तर शिवाजी गणेशनसारखा लोकप्रिय नट तिचा अध्यक्ष असावा असे व्यंकटरामनगटाला वाटते. त्या दृष्टीने व्यंकटरामन यांनी इंदिरा गांधींचे मन वळवायचा व पालानीयंदींची उचलबांगडी करून त्या जागी शिवाजी गणेशनची नेमणूक करण्याची मागणी केली असल्यास नवल वाटावयास नको; परंतु खरा प्रश्न असा आहे की, इंदिरा गांधी शिवाजी गणेशनला व त्याच्या मेळाव्यास महत्त्व देतील का? त्या शिवाजी गणेशनला तामिळनाडूतील इंदिरा काँग्रेसचा त्राता मानतात का? तो मतदारांना मोठ्या प्रमाणावर खेचू शकेल याबाबत त्यांना विश्वास वाटतो का? समजा, तो इंदिरा काँग्रेसचा मुख्यमंत्री झाला तर त्यांच्या मुठीत राहील का? तसा एम. जी. आर.ही इंदिरा गांधींच्या आज्ञेत आहे. त्यांचा व एम. जी. आर.चा एक गुप्त करार झालाय. त्यानुसार लोकसभेच्या निवडणुकांत तो इंदिरा गांधींच्या उमेदवारांना जास्तीत जास्त संधी देणार असून त्या बदल्यात विधानसभेच्या निवडणुकांत तशाच प्रकारचे सहकार्य त्याला इंदिरा काँग्रेसने द्यावयाचे आहे. अशा परिस्थितीत शिवाजी गणेशन या एम. जी. आर.च्या प्रतिस्पर्ध्यास तामिळनाडू काँग्रेसचे अध्यक्षपद देऊन इंदिरा गांधी एम. जी. आर.ला दुखावण्याचे धाडस करतील का?

त्याचबरोबर काही गोष्टी शिवाजी गणेशनच्या विरोधात जातात. कित्येकांच्या मते शिवाजी गणेशनच्या मेळाव्यास जो भव्य पाठिंबा मिळाला त्याने फसून जाण्याचे कारण नाही. त्यातील कित्येक लोक उत्सुकता म्हणून हजर होते. हे सगळेच लोक काँग्रेस (इं)ला पाठिंबा देतील या संभ्रमात रहाण्यात अर्थ नाही. शिवाय या शिवाजी गणेशनच्या फॅन्सच्या इंदिरा काँग्रेसच्या पाठिंब्याबद्दल काही गृहीत धरता येणार नाही. त्यांचे (शिवाजी गणेशनच्या पाठीराख्यांचे) इंदिरा काँग्रेसवरील प्रेम हे त्यांचा हिरो सध्या काँग्रेस (इं)मध्ये असल्यामुळे आहे. उद्या शिवाजी जर कम्युनिस्ट पक्षात गेला तर त्याचे पाठीराखे त्या पक्षात जाण्यास कुरकुर करणार नाहीत. शिवाजीला तामिळनाडू काँग्रेसचे अध्यक्षपद देऊन त्या ( इंदिराजी ) आपल्या मर्जीतील मुपनारगटाला नाराज करणार नाहीत असे वाटते. शिवाय शिवाजी गणेशनचे व एम. जी. आर.चे आतापर्यंतचे स्नेहपूर्ण संबंध पहाता शिवाजी हा एम. जी. आर.ला प्रखरपणे विरोध करू शकेल किंवा नाही याबद्दल माताजींना संशय येणे स्वाभाविकच आहे. आज तरी एम. जी. आर.ला जोरदार आव्हान देईल असा नेता तामिळनाडूत दिसत नाही. करुणानिधींचा द्रमुक पक्ष हळूहळू विकलांग होत चालला आहे. एम. जी. आर.च्या खालोखाल गर्दी खेचणारी जयललिता त्याच्याच पक्षात आहे, तर सुपरस्टार भाग्यराज जो एम. जी. आर.चा वारस समजला जातो तोही अण्णा द्रमुकच्या पाठीशी उभा आहे. अशा परिस्थितीत शिवाजी गणेशनला अध्यक्षपद द्यायचे किंवा नाही हा प्रश्न इंदिरा गांधींना फारच त्रासदायक ठरणार आहे.



# कुंपण आणि आकाश



**मंगला गोडबोले**

पुण्यामध्ये मोलकरणींचा संप सुरू होता त्या काळातली गोष्ट आहे. एक परिचित प्राध्यापिका रस्त्यात भेटल्या होत्या. कॉलेजला, कामावर जायला उशीर झाल्याने त्या मुळातच त्रासलेल्या होत्या. त्यात मी अनवधानाने मोलकरणीविषयी बोलल्याने त्यांचा पारा एकदमच चढला. चिडून म्हणायला लागल्या, 'पैसे वाढवा म्हणे ! कशासाठी ? घरात काय कोळसे, चुली आहेत ? का दहा माणसांचा रगाडा आहे ? एवढसंस काम; पण पाच वर्षांमध्ये पगाराची मागणी दुपटीपर्यंत गेली ! तुम्हाला सांगते, समजून दोनपाचाची भर आम्हीही करू पगारात; पण मागणी कशासाठी ? आठ–दहा दिवस आपण मालकिणींनी एकजूट करून यांना दाराबाहेर ठेवलं ना तर उपाशी मरतील !'

मला मोठी गंमत वाटली. या बाई स्वतः प्राध्यापिका. आयुष्यभर नोकरी करणाऱ्या. माझ्यापेक्षा नोकरीचे अनेक बरेवाईट प्रश्न त्यांना चांगले समजायला हवेत. गेल्या इतक्या वर्षात दरवेळी पगार वाढताना त्यांचं काम वाढलं होतं का ? 'समजून' दोन–पाच रुपये जास्त देण्याची वृत्ती ह्यांच्या स्वतःच्याबाबतीत त्यांना आवडली असती का ? हक्क, मागण्या, संघटना यांचा आधार त्यांनी वेळोवेळी घेतलेला नाही का ? पण छे ! हे काही समजून घेण्याच्या मनःस्थितीतच त्या नव्हत्या. माझे विचार मोलकरणींच्या बाजूचे असावेत अशी शंका येताच त्यांनी (त्यांच्या मते) माझ्या वर्मावरच बोट ठेवलं, 'आम्ही एकएक पैसा मिळवायला कष्ट करतोय, आमचं आम्हाला माहीत. तुमचं ठीक आहे. पाचदहा रुपये इकडे काय आणि तिकडे काय...'

वास्तविक पाहता मालकीण म्हणून मला स्वस्तातच काय, फुकटात काम करून मिळालं असतं तरी आवडलंच असतं; पण चहूकडचं अर्थकारण, समाजजीवन, जीवनमान वगैरे बघता ते तसं मिळणार नाही हे मी समजू शकते. माझ्यापेक्षा जास्त शिकलेली, शिक्षणक्षेत्रामध्ये वावरणारी, डॉक्टरेट मिळवलेली, बुद्धिमान म्हणून नवाजलेली ही स्त्री मात्र व्यक्तिगत अडचणींपलीकडे दुसऱ्या कशाचा विचारच करायला तयार नव्हती. असं का व्हावं ? एकाच वाक्यात सांगायचं तर याचं कारण इतकंच की, ही स्त्री बुद्धिमान असेल; पण बुद्धिवादी नाही. केवळ बुद्धीच्या कसोटीवर प्रश्न तपासू शकत नाही,

आपल्याकडे या दोन शब्दांची पुष्कळ वेळा गल्लत होते. स्त्रियांच्या बाबतीत तर विशेषच होते आणि लोक सरसकट विधान करतात की बघा, इतक्या बायका शिकल्या तरी त्यांचे प्रश्न सुटलेत का ? एक तर स्त्रिया किंवा पुरुष कोणाचंही अधिकृत शिक्षण, पदव्या वगैरे हा बुद्धिमत्तेचा पुरावा मानणं मुळातच धाडसाचं आहे; पण त्यातही पुष्कळदा मुली, स्त्रिया मेरिट लिस्टमध्ये येतात, गुणानुक्रमाने वर चमकतात, स्वतःविषयी काही आशा निर्माण करतात; पण अभ्यासविषयाच्या किंवा व्यवसायाच्या त्या ठराविक कक्षेपलीकडे त्यांची बुद्धी अभावानेच जाते. जमाना स्पेशलायझेशनचा आहे, करिअरच्या–व्यवसायाच्या स्पर्धेच्या मागण्या वाढत आहेत, माणसांची बहुतेक शक्ती व वेळ त्यात खर्च होत आहे हे तर खरंच; पण आपल्या निवडलेल्या क्षेत्राखेरीज बाह्य जगाकडे, त्यातल्या प्रश्नांकडे, वास्तवाकडे एका किमान बुद्धिवादी दृष्टीने पाहणेही अशक्य का व्हावे ? मुळामध्ये बुद्धिवाद ही गोष्ट इतकी अवघड आहे की स्त्रिया–पुरुष कोणालाच ती सोयीनुसार, ऐच्छिक–पर्यायी स्वरूपात स्वीकारता येणार नाही. माणसाचा भ्रमात राहण्याचा, स्वतःला, समाजाला फसवण्याचा, वास्तवाची आपल्याला आवडेल तेवढीच बाजू बघण्याचा हक्क बुद्धिवाद डावलत असतो. एका अर्थानं तो माणसाला उघडं पाडतो; पण दुसऱ्या अर्थानं या उघड्या अंगावर हार आणि प्रहार झेलण्याचं अमर्याद अंतःसामर्थ्यही तोच माणसाला देत असतो. असं हे 'सतीचं वाण' घेण्यात आजचे पुरुष फार आघाडीवर आहेत अशातली बाब मुळीच नाही; पण स्त्रिया मात्र याबाबतीत लक्षात येण्याइतक्या मागे पडतात हे कटु असलं तरी सत्य आहे. याची कारणं काय असावीत ?

## 'पुरुषी' लेबलाची भीती

माझ्या कल्पनेप्रमाणे बुद्धी आणि भावना यांचा सनातन असा संघर्ष आपल्याकडे चितारला गेलेला आहे आणि भावनेचं सगळं ओझं आपण कायमचं स्त्रियांच्या शिरावर लादलेलं आहे. हळवेपणा, काळज्या, चिंता, रडकेपणा, हुरहूर ही सगळी बायकांची खाती. पुरुष कसा कणखर, राकट, पोलादी वगैरे हवा. त्यानं प्रसंगानुरूप भावना वगैरे तुडवल्या की, त्याच्या पौरुषाची थोरवी वाढलीच म्हणून समजा ! उलट बाईच्या बाबतीत भावनेचं अवास्तव स्तोम माजवण्याची सवय तिला लहानपणापासूनच लावली जाते. ती मनानं दुर्बळ असावी, तिला क्षणोक्षणी कुणाचा तरी (अर्थात पुरुषाचाच) भावनिक आधार लागावा हे मनावर बिंबवल्यानं कधी तरी ती स्वतःच स्वतःला दुबळी समजायला लागते. बहुसंख्य स्त्रिया या वर्गात मोडतात. इतर काहीजणींना भावनांच्या जपणुकीतला खोटेपणा जाणवतो; पण ते दाखवण्याचं धाडस नसतं. कारण भावनेपलीकडे जाऊन तार्किक पातळीवर एखादीनं एखादा मुद्दा मांडला की, ती क्षणात 'पुरुषी' ठरेल, चेष्टेचा विषय ठरेल हे तिला माहीत असतं. फार कशाला, दुःखाच्या प्रसंगी अश्रू आवरणं हे सुद्धा आपल्याकडे 'पुरुषी' ठरू शकतं आणि असलं भयंकर 'दूषण' लावून घेण्यापेक्षा हळवं, भाबडं राहाणं स्त्रियांना परवडतं. याचबरोबर सगळ्या परंपरा जपण्याचं, संस्कृतिसंवर्धनाचं, नातीगोती सांभाळण्याचं झेंगट तर सदाच बाईच्या मागे असतं ! परंपरेत 'असं का ?' हे विचारणं बसत नाही, नात्यागोत्यांना दुखवून चालत नाही आणि संस्कृति म्हणजे नक्की काय हे आपल्यापैकी फारसं कोणाला समजलेलंच

नाही. अशा सगळ्या गोलमाल अवस्थेमध्ये वाट्याला आलेलं जिणं फारसं न कुरकुरता स्वीकारणं हा एकच पर्याय बाईपुढं उरतो आणि बुद्धिवादाची शक्यता फारशी कधी निर्माणच होत नाही. अपत्य आणि पती या दोन नात्यांबाबत मात्र बाई इतक्या वेगवेगळ्या प्रकारांनी गुंतलेली असते की, भल्याभल्यांची तर्कशुद्धताही त्या नात्यांमध्ये त्यांना चकवून गेल्याचंच आपल्याला दिसतं. आंधळ्या प्रेमाविषयी आपण खूप ऐकलंय, वाचलंय. नवरा आणि मुलं यांच्याबद्दलच्या बाईच्या भावनेला सदैवप्रेमाचंच लेबल लावावं असं मला वाटत नाही; पण ते जे काही प्रेम असेल, स्वार्थ असेल, भविष्याची तरतूद असेल, सोय असेल ते सगळं मिळून पुष्कळदा बाईला नुसतं आंधळंच नव्हे तर मुकं आणि बधिरही करत असतं. या सर्व गोष्टींमुळे कौटुंबिक पातळीवर बुद्धिवाद स्त्रियांना परवडत नसावा असा माझा तर्क आहे. बाह्य जगाविषयी बोलायचं तर, एक तर बहुसंख्य स्त्रियांना त्याचं फारसं वारं लागलेलंच नसतं. वाचनानं, विचारानं, चिंतनानं त्याच्याशी ओळख करून घेण्याचा बहुसंख्य स्त्रियांचा प्रयत्नही नसतो. संधीही सहजासहजी मिळत नसते. उलट परिस्थितीनं, आर्थिक रेट्यानं ज्या बायकांना घराबाहेर पडावं लागतं, त्यांचा समाजाशी येणारा संपर्क हा इतका नैमित्तिक, वरवरचा, तात्पुरता राहतो की, त्याही स्वतःला सोडून, त्रयस्थपणे समाजाचा विचार करण्यात कमी पडतात. कुठलाही प्रश्न त्या दूरान्वयाने स्वतःशी जोडू बघतात किंवा स्वतःच्या संदर्भात त्याची चाचपणी करतात. वर उल्लेखलेल्या प्राध्यापिकाबाईंचं असंच काहीसं झालं होतं. मोलकरणींचा प्रश्न म्हणजे त्यांच्या दृष्टीनं त्या व त्यांची एकटी मोलकरीण यातला संघर्ष! त्या चांगल्या म्हणून सगळ्या मालकिणी चांगल्या व त्यांची मोलकरीण वाईट म्हणून सगळ्या मोलकरणी गुन्हेगार! या दोन टोकांच्या दरम्यान या नात्याच्याही अनेक शक्यता असू शकतील हे त्यांच्या लक्षातच येत नव्हतं.

या सगळ्यामुळं घरात, घराबाहेर, कुटुंबात, समाजात कुठेच बहुसंख्य स्त्रिया बुद्धिवाद अंगिकारू शकत नाहीत. त्यामुळं त्यांचं आणि समाजाचं—दोघांचंही सारखंच नुकसान होतं. त्यांचे व्यक्तिगत प्रश्न त्या सोडवू शकत नाहीत. कारण मुळात त्या प्रश्नाकडे डोळ्याला डोळा भिडवून बघितलेलंच नसतं त्यांनी. मग कधी आकलन पूर्वग्रहदूषित असतं, कधी उत्तराची दिशा चुकते तर कधी साध्या प्रश्नाचं फार अवडंबर माजतं आणि कधी बौद्धिक दृष्टीने असाध्य असणाऱ्या प्रश्नासाठी त्या देवदेवस्कीमध्ये अपरंपार वेळ, पैसा, शक्ती खर्च करतात; पण हे झालं त्यांच्या स्वतःपुरतं. माझ्या दृष्टीनं आणखी गंभीर समस्या ही आहे की, घरात आई, आजी म्हणून, शाळेत शिक्षिका म्हणून सर्व मुलं जास्तीत जास्त वेळा याच स्त्रियांच्या सान्निध्यात, प्रभावाखाली येतात आणि पर्यायानं तीही बुद्धिवादापासून वंचित राहतात. ऐनसंस्कारक्षम वयात त्यांच्या विचाराला तार्किकतेचं वळणच लागू शकत नाही, ही आपल्या समाजाची फार मोठी हानी नव्हे का?

परवा त्या प्राध्यापिकाबाई भेटल्या तेव्हा चित्र अगदी उलटं होतं. त्या खुशीत होत्या. मागच्या मोलकरणीएवढ्याच पगारात त्यांना जास्त काम करणारी दुसरी मोलकरीण मिळाली होती. त्यांच्या दृष्टीनं मोलकरणींचा प्रश्न सुटलाच होता. आता तर त्या पोस्ट डॉक्टरल रिसर्चही करणार होत्या, पुन्हापुन्हा म्हणत होत्या,

'अभ्यासाचं काय हो? आता वळणंच लागलंय मनाला; पण आमच्यासारख्यांचा वेळ घरकामात जायला लागला की, हळहळ वाटते. वाटतं, आपली बुद्धी केरफरशीत घालवण्यासाठी का आहे? मी करतेय तसा रिसर्च तर परदेशातसुद्धा झालेला नाहीये म्हणे. आपल्यासारख्या अविकसित देशातून असा बुद्धिविलास झालेला पाहून ते लोक थक्कच होतात; पण आपल्याकडे किती साध्यासाध्या गोष्टींसाठी झगडावं लागतं ते त्यांना काय सांगणार?' मी ऐकत होते. त्यांच्या बुद्धिविलासाची मला कदर आहेच; पण आपल्यासारख्या अविकसित देशाच्या दृष्टीनं विचार केला तर मला तरी खूपदा वाटतं, काही स्त्रिया खूप बुद्धिमान निपजण्यापेक्षा बहुसंख्य स्त्रिया किमान बुद्धिवाद स्वीकारतील तेव्हाच स्त्रीजीवन खऱ्या अर्थानं समृद्ध होईल!

□

## पुस्तके

### कोर्टाच्या आवारातल्या कथा

# चक्रव्यूह

पुस्तकाचं नाव आहे, चक्रव्यूह. ज्याच्यातून सुटून बाहेर पडणंच महामुश्कील! आपल्या आजूबाजूला दिसणाऱ्या सामान्य मुली–स्त्रिया रोजच्या व्यवहारातून मार्ग काढता काढता जीवनाच्या चक्रव्यूहात कशा सापडतात त्याच्या या बोलक्या कथा आहेत. चक्रव्यूहातून मार्ग काढणंही जमू शकतं; पण केव्हा? नशिबाचं दान पडेल तेव्हा! नाही तर मार्ग काढता काढता, संपून जाणं हाच त्यातला शेवट!

कोर्टाच्या आवारात घडलेल्या अकरा कथांचा हा संग्रह आहे. पुस्तकाच्या लेखिका ॲड. सुप्रिया सरवटे यांनी अखेरचा प्रयत्न म्हणून कोर्टाचं दार ठोठावणाऱ्या अकरा मुली इथे उभ्या केल्या आहेत. मुलगी झाली म्हणून सौतन आणणाऱ्या नवऱ्याविरुद्ध कोर्टात दाद मागणारी आणि न्याय मिळवणारी सलमा, प्रेमविवाह करून नंतर बायकोला वाऱ्यावर सोडणाऱ्या डेव्हिडविरुद्ध झगडून निराश झालेली मेरी, लग्न ठरल्यानंतर बलात्कार झालेली, होरपळून निघालेली सुमित्रा, आपल्या आईला धंद्याला लावणाऱ्या बापाविरुद्ध कोर्टात उभं रहायला लागलेली गुलाब, नवऱ्यानं बांधलेलं मंगळसूत्र स्वतःच्या हातानं तोडून भाचीला दत्तक घेऊन जखमी वाघिणीचं आयुष्य जगणारी रेणुका...मोठ्या माणसांच्या हट्टानं लग्नाला बळी पडलेली, कोमेजून पुन्हा एकाकी जगणारी शामली, कॉलेजमधल्या गुंड पोरांनी उद्ध्वस्त केलेली तेजस, दहेज कमी आणला म्हणून ज्वालांमध्ये होरपळलेली मोहिनी... डॉ. मैथिली...रेवती...शांताबाई यांच्या या कथा आहेत.

शहाण्या माणसानं कोर्टाची पायरी चढू नये ही खरी आपल्या समाजाची शिकवण. कारण बदनामीची भीती. ही भीती टाळून जेव्हा एकटी–दुकटी बाई कोर्टात

जाते तेव्हा तिला होणारा मनस्ताप सहज लक्षात येतो. या पुस्तकातील व्यक्तिरेखांचं हेच वैशिष्टय आहे. यातल्या मुली मोडून पडत नाहीत. आगीत होरपळतानासुद्धा पुन्हा पुन्हा पेटून उठतात, जळत रहातात !

या पुस्तकातली प्रत्येक कथा साधारणपणे तीन टप्प्यांत घडते. पार्श्वभूमी–कोर्टात जाण्याचा निर्णय घेतला ती अवस्था आणि शेवटी कोर्टाचा निर्णय. यातल्या बहुतेक मुलींनी न्याय मिळवला आहे.कधी तारुण्याचा होम करून, कधी चारित्र्याचा होम करून तर कधी नाती-गोती तोडून. त्यामुळे यातील संघर्षप्रसंग खोल विचार करायला लावणारे आहेत. समाजमनाचं चित्र डोळ्यांसमोर उभे करणारे आहेत. कोर्टाच्या अधिकाराबाबत सामान्य लोकांच्या मनात विश्वास निर्माण करणारे आहेत.

या अकरा कथांतील व्यक्तिरेखांना ढोबळमानाने पांढरा-काळा रंग आहे. त्यामुळे एखादी व्यक्तिरेखा वकिली पद्धतीने आपल्याला कथेचा परिणाम घडवण्यासाठी हव्या त्याच रंगात रंगवण्याचा दोषही या पुस्तकात आहे. त्यामुळे नात्यांमधील, भावनांमधील सूक्ष्म बारकावे या कथांमध्ये नाहीत. नाही तर कोर्टातील घटनांविषयीच्या कथा एवढेच त्यांचे स्वरूप न राहता स्वतंत्र कथा म्हणूनसुद्धा त्या पूर्ण ठरल्या असत्या.

हे जरी असले तरी कोर्टातील प्रश्नोत्तरांची, त्यातील निवडक डावपेचांची, वकिली प्रतिवादांची आणि न्यायसंस्थेकडून मिळणाऱ्या हक्कांची जाणीव करून देण्यात हे पुस्तक यशस्वी ठरलं आहे.

आपल्या समाजानं बायकांना घरात आणि बाहेर नेहमीच असुरक्षित ठेवलं आहे.नवऱ्यानं मारलं आणि पावसानं झोडपलं तर सांगायचं कुणाला अशी बायकांची पूर्वापार गत. यातून बाहेर पडण्यासाठी आता कुठे बायका कायद्याचा दरवाजा उघडू बघताहेत. कायदाविषयक जाणीव सर्वसामान्य बायकांमध्ये निर्माण होण्यासाठी काही महिलासंघटना प्रयत्न करताना दिसतात, कायदासल्लागारकक्ष चालवतात. याच जाणीव–जागृतीतील 'चक्रव्यूह' हा एक चांगला प्रयत्न आहे.

**–मेधा राजहंस**

चक्रव्यूह
अॅड. सुप्रिया सरवटे
मेनका प्रकाशन
पृष्ठे १६५, मूल्य २५ रुपये.

## वेधून घेणाऱ्या कथा
# रत्नकांबळ

प्राचीन भारतीय संस्कृतींपैकी श्रमणसंस्कृति ही एक श्रेष्ठ संस्कृती आहे. भगवान महावीरांची शिष्यपरंपरा त्यांच्या काळात खूप मोठी होती. वैशाली, क्षत्रियकुंड, राजगृही, कौशाम्बी उज्जयिनी इ. राजनगरांचे अधिपती आणि त्यांच्या पत्नीसुद्धा श्रमणसंस्कृतीच्या पुरस्कर्त्या होत्या, प्रजाजनही या तत्त्वज्ञानाने प्रभावित झालेले होते. भोगलालसेकडे पाठ फिरवून श्रमणसंस्कृतीतले तत्त्वज्ञान निग्रहाने जगू पाहणाऱ्या सामान्य माणसांच्या आणि राजे-राण्यांच्या अंतःकरणातली वादळं, वासना जिंकताना होणारी तडफड, थोर तत्त्वांची थोरवी प्रत्यक्ष अनुभवल्यानंतर मनाला मिळणारं शांत समाधान या साऱ्यांमधली हळुवार स्पंदनं टिपणाऱ्या या कथा ! विषयातलं हे नाविन्य मराठी कथाविश्वानं नोंद घेण्याजोगं आहे. मात्र हे नाविन्य,हा आगळेपणा ही या कथांची मर्यादाही आहे असं स्पष्ट जाणवतं.

राजा श्रेणिक बिंबिसार आणि राणी चेलना यांच्या तीन कथा यात आहेत. ( राजगृही, उकल, अकल्पित ) मोहना वारांगना आणि राजनर्तिका कोशा यांच्या भ्रमनिरासाच्या कथा आहेत. इथे नवी दृष्टी लाभलेला महामंत्री विमलशहा भेटतो आणि 'असामान्य सामान्य' भीमा वाणियाही भेटतो. अशा अनेक व्यक्ती! अनेक प्रसंग! पण सगळ्यांचे सूत्र एकच ! वासना जिंकून मुक्ती मिळवण्याचे ! मनःपरिवर्तनातून जीवनविषयक आध्यात्मिक दृष्टी मिळणं, साम्राज्य, सत्ता, संपत्ति, सौंदर्य यांच्याबद्दलची अवघी लालसा लाथाडून उच्च आनंदात स्वतःला विसर्जित करणं हा या साऱ्या कथांचा शेवट आहे. या एकच एक कथासूत्रामुळे, 'and they lived happily together'ची आठवण येते. लेखकाने कथा लिहिण्यासाठी ज्या एका मध्यवर्ती आशयाची निवड केली त्यातून अपरिहार्यपणे हा तोचतोचपणा आलेला आहे. मात्र व्यक्ती, घटना, प्रसंग यात विविधता आहे. प्रत्येकापुढल्या समस्यांमध्ये वेगळेपणा आहे. सर्व समस्यांचे अंतिम उत्तर मात्र एकच ! हा बालबोधपणा ही या लेखनाची मोठीच मर्यादा म्हणावी लागेल.

ऐश्वर्याची, सौंदर्याची जी वर्णने यात येतात त्यात लेखकाच्या शैलीचा सुखद प्रत्यय येतो. व्यक्तींच्या दोन मनातील आंतरिक द्वंद्वही चांगले चितारले आहे. मृगावती, कोशा, विमलशहा, बादशहा अकबर अशा अनेकांची मानसिक तळमळ, श्रेणिक बिंबिसाराचे आत्मपरीक्षण परिणामकारक ठरते ते कुशल मांडणीमुळे. ऐतिहासिक वातावरणनिर्मिती हेही या कथांचे एक वैशिष्टय आहे; पण तरीही या कथा मनाच्या पृष्ठभागावरच राहतात. त्या खोलवर आत शिरत नाहीत, जीवनानुभूतीचा उत्कट प्रत्यय देत नाहीत.'

**–मेधा सिधये**

रत्नकांबळ
शांतिलाल भंडारी
चिरायू प्रकाशन, पुणे
पृष्ठे २४०, मूल्य ५० रुपये

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# ज्योतिष–शास्त्र की अंधश्रद्धेचे मूळ?

प्रकाश घाटपांडे

बऱ्याच लोकांना प्रश्न पडतो की, ज्योतिषशास्त्रावर विश्वास ठेवावा की नाही? काही लोक वरून म्हणतात की, ज्योतिषशास्त्रावर आमचा विश्वास नाही; पण आतून मात्र ज्योतिषाचा सल्ला घेतल्याशिवाय प्लॅन आखत नाहीत. मुळात ज्योतिषशास्त्र हा एक वादातीत मुद्दा आहे. ज्योतिषशास्त्रात तथ्य आहे का नाही? असल्यास कितपत तथ्य आहे?

ज्योतिषशास्त्राचा एक मूलभूत सिद्धांत आहे की, ग्रह हे मानवावर किंबहुना सजीवसृष्टीवर परिणाम करतातच.

'ग्रह बिचारे त्यांच्या मार्गाने फिरत असतात, ते कसला तुमच्यावर परिणाम करणार बोडक्याचा?' असं जर कुणी म्हटलं तर आमची कडवी ज्योतिषप्रेमी मंडळी म्हणतात की, चंद्र व सूर्य यांच्या गुरुत्वाकर्षणाचा भरती–ओहोटीवर परिणाम होतो हे तर सिद्धच झाले आहे. वेड्याच्या मानसिक स्थितीवर अमावास्या–पौर्णिमेचा परिणाम होत असतो, तर तुमच्या शरिरातल्या plasma वरसुद्धा चंद्राचा परिणाम होत असतो. डॉ. अमके अमके, एवढे विद्वान गृहस्थ, पण तेसुद्धा शस्त्रक्रिया करताना चांगला दिवस शोधून मगच करतात. तुम्ही कालची पोरं – जरा कुठं कॉलेजमध्ये जायला लागले की, लागले अक्कल पाजळायला!

कुणी ज्योतिषशास्त्राच्या 'शास्त्र' या शब्दावर आक्षेप घेतला तर आमची ही मंडळी म्हणतात, 'तुमच्या सायन्समध्ये तरी सगळ्या प्रश्नांना उत्तरं कुठं आहेत? एकाचं मत हे, एकाचं मत ते. तुमचा एखादा phenomneon फेल जायला लागला की, लगेच अपवाद म्हणून मोकळे होता किंवा गृहीत असे घेता की, ते फेल जाणार नाही. हे manipulation नाही तर काय आहे?

बरेच लोक म्हणतात ज्योतिषशास्त्रात तथ्य आहे; पण त्याला मर्यादा आहेत. हे विधान ते त्यांच्या अनुभवांवरून करतात. त्यांना त्यांच्याबाबतीत किंवा त्यांच्या संबंधितांबाबत कुणी तरी वर्तवलेली भविष्यं considerably खरी ठरलेली असतात. अर्थात काही (बरीचशी) चुकलेली पण असतात. ते म्हणतात, 'केनेडींच्या खुनाचं भविष्य अमक्यानं वर्तवलं होतं.' तरुण वर्गातले म्हणतात, अमिताभच्या अपघाताचं भविष्य पं.व्यास यांनी वर्तवलं होतं. काहीजण हिरोशिमावर बाँब पडणार आहे हे एका बाईला आरशात दिसलं होतं, असं एका मासिकात वाचल्याचं सांगतात. आणखी काही मासिकांत अतींद्रिय सामर्थ्याच्या जोरावर वर्तविलेली भविष्यं खरी कशी झाली यावर लेख असतो. काही मंडळी व्यवहारातील उदाहरणं देऊन ती खरी कशी झाली हे सांगतात आणि मग विचारतात एवढं असून ज्योतिषशास्त्रात तथ्य नाही असं तुम्ही कसं म्हणता?

राजकीय ज्योतिषवाली मंडळी तर भन्नाटच असतात. त्यांची भाषाच अशी संदिग्ध असते की, काही झालं तरी त्यांची भविष्यं खरी ठरतात. काही लोक ज्योतिषशास्त्रावर उलटसुलट चर्चा करून उत्तर वाचकांवरच सोपवतात. काही भविष्य चुकलं तर म्हणतात, 'राजकीय मंडळींच्या जन्मवेळेत फरक असतो. त्यामुळे कधी कधी उत्तरात तफावत येते व भविष्य चुकू शकते.' असं म्हणून आपल्या मनाचा तथाकथित मोठेपणा दाखवतात व आपलं बरोबर आलेलं भविष्य बरोबर जोडतात.

मी पूर्वी पुणे विद्यार्थी गृहात होणाऱ्या ज्योतिषशास्त्रावरच्या व्याख्यानांना जायचो; पण तेथे होणारी चर्चा ही नवीन काही देणारी नसते व पोस्टमार्टेम असतं. एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीची कुंडली घेऊन त्यावर कुंडलीतले ग्रहयोग व त्या व्यक्तीचे आयुष्य कसे निगडित आहे व एकमेकांना कसे बरोब्बर जुळते हे दाखवायचा प्रयत्न असतो. एखाद्या वेळेला कुंडली व त्या व्यक्तीचे जीवन यात तफावत असेल तर 'या कुंडलीत शनि–मंगळ केंद्रयोग जरी असला तरी गुरु हा इतका powerfull आहे की, त्या केंद्रयोगावर मात करून ही व्यक्ती अमक्या पदाला पोहोचली!' तेथे भागवत नावाचे गृहस्थ यायचे. ते या पोस्टमार्टेमवर आक्षेप घ्यायचे. ते म्हणायचे 'तुम्हाला कुंडलीवर ठामपणे काही सांगता यायचे नाही.' त्यांच्या वृद्धत्वाचा आदर करून ही ज्योतिष विज्ञान मंडळी आपली चर्चा चालू ठेवायचे.

एकदा कुणी तरी त्यांना एक कुंडली दिली व विचारले, या व्यक्तीचे जीवन कसे असेल? दिसायला कुंडली अतिसामान्य दर्जाची होती. त्यावरून बऱ्याचजणांनी सांगितले की ही व्यक्ती सामान्य आहे. फार फार तर कसंबसं स्वतःचं घर आहे. काहींनी सांगितले, ही व्यक्ती अल्पशिक्षित आहे व कुठे तरी कष्टाचे किरकोळ काम करून उपजीविका करते. नंतर कुंडली देणाऱ्या व्यक्तीने खरी परिस्थिती सांगितली, 'ही व्यक्ती उच्चशिक्षित असून चांगल्या पगारावर नोकरीला आहे.' यावर संयोजकांनी चुकलं तरी हरकत नाही. यातूनच आपल्याला शिकायचं आहे. अपयश ही यशाची पहिली पायरी आहे, असं म्हणून चर्चा पुढे चालू ठेवली.

एकंदरीत ज्योतिष विज्ञान मंडळ यात विज्ञान या शब्दाचं interpretation मला कुठे दिसलंच नाही.

एकदा 'सकाळ' मध्ये ज्योतिष संस्थेसाठी अभ्यासू उमेदवार पाहिजेत अशी जाहिरात आली. मी Application टाकून दिलं. त्याला त्यांचं उत्तर आलं की, वा वा! तुम्ही विद्यार्थी असून तुम्हाला यात रस आहे. तुम्ही काय काय वाचलेत ते कळवा. इतकी इतकी मेंबरशिपची फी आहे.

त्यावर मी त्यांना उत्तर पाठवलं–असं असं मी वाचलेलं आहे. Astrology शी Astrophysics शी संबंध असलेली शास्त्रीय चर्चा मला दिसली नाही. 'तुम्हीवर्तमानकाळ

जर व्यवस्थित सांगू शकत नाही तर भविष्य काय सांगणार?' असं जर तुम्हाला कुणी विचारलं तर तुमच्याकडे मुद्देसूद उत्तर आहे का ? पूर्वीचे ज्योतिषी होते त्यांचं ज्ञान त्यांच्याबरोबरच लयाला गेलं. त्यामुळं या विषयाला गूढपणा आला, वगैरे वगैरे कॉमेंटस् असलेल्या या पत्राला त्यांनी उत्तरच दिलं नाही. पोस्टबॉक्सवर जाहिरात होती त्यामुळे व्यक्तशः भेटताही आलं नाही. त्यांनी कदाचित हा मूर्ख मनुष्य आहे असं म्हणून फाडून फेकून दिलं असेल.

नंतर पुण्यात Astrological world convention झाले. ते तीन दिवस चालले होते. डॉ. पुरंदरे मुंबईतले प्रख्यात डॉक्टर हे प्रमुख आकर्षण होते. त्यांना Man of the convention असा किताबही मिळाला. ते म्हणाले, 'मी पूर्वी ज्योतिषशास्त्राच्या विरोधी होतो; पण नंतर मी ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासाला सुरुवात केली व मला असं आढळून आलं की, यात काही तरी तथ्य आहे. मी प्रसूतिला आलेल्या बाईच्या कुंडलीचा अभ्यास करून प्रसुति केव्हा व कशी होईल याचं निदान करतो. यातून मला ज्योतिषशास्त्राची प्रचीती आली.' त्यांनी यात संशोधन व्हावं अशी इच्छा व्यक्त केली.

नंतर माझ्या मनात विचार आले—इथे ज्योतिषशास्त्राची चर्चा होते खरी; पण यातून विधायक असं काय निष्पन्न होतं? मी माझ्या शंका एका कागदावर लिहून काढल्या.

समजा तुम्हाला एखाद्या व्यक्तीची कुंडली ( अचूक जन्मवेळेसहित ) दिली. अगदी जन्मवेळच्या स्पष्ट ग्रहांसहित आणि तुम्हाला विचारले खालील प्रश्न. तर तुम्हाला ठामपणे अचूक उत्तर देता येईल का ?

१) ही व्यक्ती स्त्री आहे का पुरुष ?

२) जिवंत आहे का मृत ?

३) विवाहित आहे का अविवाहित ?

४) ही सध्या कुठल्या क्षेत्रात काय काम करीत असली पाहिजे ? हिचा भूतकाळ काय ?

५) तुम्ही भविष्य कुठल्याही पद्धतीने बघा; पण उत्तर सारखंच यायला पाहिजे. निरयनपद्धतीत चतुर्थ स्थानावरून मातृसुख बघतात तर सायनपद्धतीत त्याच स्थानावरून पितृसौख्य बघतात. सायनपद्धत बरोबर का निरयनपद्धत बरोबर ? सामान्य जातकाला त्यात रस नसतो.

६) जुन्या ज्योतिषांची पुस्तके सायन पद्धतीवरून का बेतलेली असतात ? निरयन पद्धत ही परंपरागत असूनही ? उदाहरणार्थ द्वारकानाथ नारायण राजे यांची पुस्तके.

मी हे शंकावजा मुद्दे घेऊन convention ला गेलो. तेथे 'Astro analysis centre' चे अभ्यंकर नावाचे ज्योतिषी गृहस्थ भेटले. त्यांनी या प्रश्नांची सगळी उत्तरं देता येतात असं सांगितलं. कशी ते मात्र सांगितलं नाही. Cosmic radiations चा मानवावर परिणाम होतो. अल्फा, बीटा, गॅमा ही radiations सत्त्व, रजस, तमस या गुणांशी साम्य दाखवतात. 15% tolerance ने सगळ्या प्रश्नांची उत्तरं देता येतात. त्यांच्या 'विश्वताराचक्र' च्या स्टॉलवर एक जाहिरात होती. माणिकप्रभू भारतीय विद्या संशोधन केंद्राची.

Astrology ? ? ?

Foolishness of fortune lovers ! It is fake Mr. Impatient ! Please wait we will prove that it is science

पण conventionमध्ये ज्योतिषशास्त्राच्या आक्षेपांना तर्कशुद्ध अशी उत्तरे व स्पष्टीकरण केल्याचे माझ्या स्मरणात नाही. (माझ्या अनुपस्थितीत दिली असतील तर मला माहीत नाही; पण त्याला प्रसिद्धी मिळाली नाही हे नक्की.)

ज्योतिषशास्त्रामुळे अंधश्रद्धा कमी व्हायच्या ऐवजी वाढायला लागते का ? हा मुद्दा महत्त्वाचा आहे. शास्त्री-पंडित वगैरे मंडळी सांगतात, तुम्हाला शनिचा त्रास आहे. अमका मंत्र म्हणा. शनिची उपासना करा. साडेसातीत शनिचे स्तोत्र म्हणा. अन्यथा शनिची कृपादृष्टी जर वक्र झाली तर तुमचे काही खरं नाही अशी गर्भित धमकी त्यात असते. म्हणूनच बाजीरावरोडवरच्या शनिच्या देवळात दर शनिवारी जबरदस्त गर्दी असते. शनीविषयी एक भीतीयुक्त आदर असतो. मनुष्य जेव्हा संकटात सापडतो तेव्हा तो आपल्या तत्त्वांना फाटा देतो. मी जर २१ प्रदक्षिणा घातल्याने माझ्या मनाला शांती मिळत असेल, माझे संकट टळत असेल तर मी का या गोष्टी करू नये. माझी मानसिक शक्ती वाढते. तुम्ही याला अंधश्रद्धा म्हणा नाही तर काहीही म्हणा, असं उच्चशिक्षित मनुष्यही म्हणतो. आपल्यालाही मग त्यात गैर वाटत नाही.

तुमच्या घराला मुंजाचा त्रास आहे. त्याची शांत करा. माझा मुलगा त्रास देतो काय करू ? दररोज जेवायच्या वेळेला बाहेर दहिभात ठेवा. पांढरे बुधवार करा. चतुर्थीचा उपवास करा वगैरे गोष्टी ज्योतिषी सांगतो आणि जातकमंडळीही ते करतात.

कारण तो संकटात इतका त्रस्त झालेला असतो की, झक मारत करतो. घरच्यांसाठी तरी करावा लागतं. बरं ही तथाकथित टीकाकार मंडळी काही मला मदत करायला येणार नाहीत तेव्हा सांगितल्याप्रमाणे करावं हे उत्तम.

दुसरे खूळ म्हणजे मंगळाचं. मंगळ आहे का नाही हे ठरवण्यात सुद्धा वाद. एकाने गोदावरीनदीच्या काठी असलेल्यांनी मंगळदोष मानू नये अशा आशयाचा मूळ संस्कृत श्लोक देऊन, मंगळदोष मानू नये असा निर्वाळा दिला. काहींच्या मते मंगळावर शनिचा दाब आहे का नाही हे पहाणे इष्ट असते. काहींच्या मते मुलीला मंगळ असला तरी मुलाच्या पत्रिकेत आयुष्ययोग चांगला असला तर लग्नाला हरकत नाही. काहींच्या मते मंगळाला मंगळाचीच मुलगा / मुलगी बघितली पाहिजे नाही तर वैवाहिक आयुष्याची तो दाणादाण उडवतो. अमक्याने मंगळ न बघितल्याने त्याचे काय झाले हे सांगितले जाते. त्यामुळे बिचारा वधूपिता ज्योतिषाच्या सांगण्याला मान्यता देतो. कारण कुठल्याही पित्याची अशी इच्छा नसते की आपल्या मुलीचं वाईट व्हावं.

अशा अनेक गोष्टींमुळे ज्योतिषशास्त्र सामान्य मनुष्याला संभ्रमात टाकते. ज्योतिषशास्त्रामुळे पसरणाऱ्या अंधश्रद्धांना जबाबदार कोण ? ज्योतिषशास्त्रावर जर टीका केली तर ही मंडळी चिडून म्हणतात, 'तुम्हाला विश्वास ठेवायचा असेल तर ठेवा नाहीतर नका ठेवू. तुम्हाला जेव्हा अनुभव येतील तेव्हा कळेल ज्योतिषशास्त्राचे महत्व. मग पस्तावाल पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असेल.' काही म्हणतील. अर्धवट ज्ञान ना, उथळ पाण्याला खळखळाट फार !

काही तरी लिहायचं आणि प्रसिद्धी मिळवायची.'

ज्योतिषशास्त्र हे जर ' Perfect science आहे, तर आंतरराष्ट्रीय घडामोडीत ज्योतिष-सल्लागार म्हणून एखाद्या व्यक्तिला न नेमण्यात सरकार भली मोठी चूक करत आहे.

ज्योतिषशास्त्रावर निष्फळ चर्चा करण्यापेक्षा ज्योतिषशास्त्रावर आक्षेप घेणाऱ्यांचे मुद्दे लक्षात घेऊन त्या गोष्टीवर मुद्देसूद, तर्कशुद्ध, असंदिग्ध, शास्त्रीय आधार असलेली उत्तरे तोंडावर फेकून त्यांची तोंडे गप्प करावीत मग त्यांनी हे Perfect science असं म्हणण्याचा आग्रह धरला तर त्यात काही गैर नाही ते जर science असेल तर या गोष्टीवर संशोधन होणे आवश्यक आहे. त्याआगोदर मान्यता मिळणं आवश्यक आहे. नाही तर आतापर्यंत जे चालत आलंय तेच चालत राहणार अशीच अंधश्रद्धा वाढत राहणार. त्याचबरोबर असेच अनुत्तरीत आक्षेप येत राहणार. □

# रंगभूमी

## 'कविराय राम जोशी'

वि. भा. देशपांडे

सोलापूरचे कवी आणि नाटककार रा. ना. पवार यांचे ' कविराय राम जोशी ' हे नाटक पुन्हा नव्याने रंगभूमीवर प्रयोगरूपाने आलेले आहे. यापूर्वी हे नाटक जयराम शिलेदार, लीला गांधी आदी मातब्बर कलावंतांनी अठरा–वीस वर्षापूर्वी मोठ्या दिमाखात पेश केले होते. तो प्रयोग ज्यांनी पाहिला असेल त्यांच्या त्या प्रयोगाच्या सुखद स्मृती अद्यापही मनात असतील. या प्रयोगानंतर पुण्यातल्या रेल्वेकर्मचारी संघाच्या कलाकारांनी याच नाटकाचा प्रयोग केल्याचे स्मरते.

आता नव्याने प्रयोग पेश केला आहे तो पुण्याच्या कलासंगम या नाट्यसंस्थेने. या प्रयोगात प्रामुख्याने आकर्षण आहे ते शाहीर रामजोशी यांच्या जीवनातील घटनांचे. त्यातही त्यांचे कवित्व कसे बहराला आले आणि त्यांनी अखेरीस अध्यात्ममार्ग कसा स्वीकारला या सूत्राचे ! इथपर्यंत नाटककाराने हे नाटक आणून थांबवलेले आहे. आता इतक्या वर्षांनंतर हे नाटक पाहाताना लेखनाच्या संदर्भात काही गोष्टी जाणवल्या त्या म्हणजे अनेक व्यक्तिरेखांच्या तोंडी असलेली प्रासयुक्त संवादरचना. त्यातही काही ठिकाणी वाक्प्रचार, म्हणीवजा वाक्यांचा केलेला वापर इत्यादी गोष्टी आता काहीशा कृत्रिम आणि कालबाह्य वाटतात. अद्यापही शब्द–संवादात रमणारा किंवा शब्दांच्या खेळात गुंतून पडणारा प्रेक्षकांचा एक वर्ग आहे, त्याला ही कृत्रिमता जाणवणार नाही. तसेच प्रयोगासाठी जी संहिता वापरली आहे तीमध्ये तिसऱ्या अंकातील अखेरचा भाग म्हणजे रामजोशींची विरक्ती ही अति जलद गतीने दाखवली गेल्याने परिणामकारी होत नाही. इष्काच्या आणि शब्दशृंगाराच्या उत्सवात गुंतलेला कविराय मोरोपंताच्या भेटीमुळे किंवा सांगण्यामुळे एकदम आपली जीवनदिशा बदलतो हे केवळ निवेदनाने प्रभावी वाटत नाही.

प्रस्तुतच्या प्रयोगात कविराय राम जोशीच्या भूमिकेत चंद्रकांत काळे होता. त्याचे दिसणे, वावरणे हे जोशी घराण्यातले किंवा ब्राह्मणी–शास्त्री घराण्यातले वाटत होतेच; पण त्याचे गाणेही तितकेच सुरेल आणि आनंददायी होते. त्याचा शब्द स्वच्छ आहे, आवाज उत्तम आहे याचा प्रत्यय येत होता. थिएटर ॲकेडमी या संस्थेतून काही भूमिका करताना आपण त्याला अनेकदा पाहिलेले आहे. त्यातल्या ' घाशीराम 'मधली सूत्रधार भागवताची गानभूमिका, तसेच ' बेगम बर्वे ' इत्यादी नाटकातील मध्यवर्ती भूमिका त्याने प्रभावी रीतीने केलेल्या होत्या. व्यावसायिक रंगभूमीवरही त्याने दोन नाटके केली; पण त्यापेक्षा कविरायाची भूमिका अधिक आव्हानात्मक आहे जसजसे प्रयोग होतील तसतशा काही जागा तो भरून या नाटकाची रंगत वाढवील. कविरायाच्या जोडीला धोंडीच्या भूमिकेत प्रकाश इनामदार आणि बयाच्या भूमिकेत जयमाला काळे हे दोघे होते. यांनी आपली अभिनयगुणवत्ता ' गाढवाचं लग्न ' मध्ये उत्तमपणाने सिद्ध केलेली आहेच. त्याच सहजतेने प्रकाश धोंडी उभा करून विनोदाची बाजू सांभाळतो. तुलनेने जयाला नृत्य कमी दिलेले आहे. ते अधिक वाढवायला हवे. कविरायाबद्दलचा आरंभीचा तिरस्कार आणि नंतरचे प्रेम अधिक व्यक्त व्हायला हवे. तसेच जुन्या बाजाचे लावणीढंगाचे नृत्यही अधिक प्रमाणात हवे. कारण जया ही एक प्रसन्नवदना चैतन्यमयी अशी नृत्यांगना आहे. तिच्या नृत्याचा, अभिनयाचा वापर मोठ्या प्रमाणात व्हायला हवा. कविराय राम जोशींचे कवन, धोंडीची विनोदाची साथ, बयाचे नृत्य अशा तिहेरी मिश्रणातून हे नाट्य फुलते असा पूर्वअनुभव आहे. तो याही प्रयोगात काही प्रमाणात आला तो अधिकपणाने येण्यासाठी संहितेची संपादणी, छोट्या कलाकारांकडून अधिक तालमी आदी गोष्टी व्हायला हव्यात. या सगळ्या प्रयोगात सुहासिनी देशपांडेसारखी एक चांगली कलावती अकारण खर्ची पडली असे वाटले ! तरीही हा प्रयोग अवश्य पहावा. □

## ' उत्तररात्र '
## एक श्रवणीय कार्यक्रम

रॉय किणीकर हे गूढ वाटणारे साहित्य–व्यक्तिमत्त्व होऊन गेले. वास्तव आणि कल्पितांच्या अनेक कथा त्यांच्याविषयी सांगितल्या गेल्या, अद्यापही सांगितल्या जातात. ते काय होते, ते काय जगले, त्यांनी काय अनुभवले याचा सारा हिशेब मांडणे

अवघड आहे. तसा प्रयत्नही व्यर्थ आहे. एक मात्र आहे की, गूढ वाटणारे, वादळी वाटणारे, कुतूहलाच्या स्तरावर कायम राहिलेले व्यक्तिमत्त्व आपल्या मस्तीत जगले, येणाऱ्या अनुभवांना सामोरे गेले. जे जे जसे वाटले तसे त्यांनी साहित्याच्या विविध अंगांनी ते व्यक्त केले. त्यातही कविता ही अधिक आत्मनिष्ठ. एका अर्थाने जीवन–चरित्रातला तळातला तपशील सांगणारी. आपण काय आहोत याचा उत्कटतेने शोध घेणारी. अशा उत्कट कवितेतून किणीकर आपल्यासमोर शिल्लक राहिले. 'रुबाया' हा परदेशी काव्यप्रकार त्यांना जवळचा वाटला. चार चार ओळींचा हा आविष्कार जीवनाचे चिंतन, स्पंदन नेमक्या शब्दांत व्यक्त करणारा, तो किणीकरांना आपलासा वाटावा यात आश्चर्य नाही. ते आयुष्याबद्दल, त्यातल्या अनुभवांच्या तुकड्यांबद्दल, बिलोरी जीवनक्षणांबद्दल व्यक्त होत गेले तरीही त्यांना वाटत राहिले...

हे लिहिले नाटक, रचिले कोणी गीत
संवाद बसविले, दिले कुणी संगीत
अर्ध्यावर नाटक टाकुनि नायक गेला
शेवटचा पडदा अजुनि नाही पडला ॥

तरीही ते लिहीत राहिले. अनंत काळ लिहूनही त्यांच्या लक्षात आले...

पण लिहावयाचे लिहून झाले नाही
पण सांगायाचे सांगून झाले नाही
संपली कथा जी कुणी ऐकली नाही
संपली रात्र, वेदना संपली नाही ॥

रॉय किणीकर हे वेदनेचे कवी होते. ती वेदना त्यांना लिहिती करती गेली. पु. ल. देशपांडे यांनी स्वतःच्या एका नाटकात (तुझे आहे तुजपाशी) म्हटले आहे की, 'वेदना जितकी सुंदर बोलते तितके सुख बोलत नाही' किणीकरांच्या बाबतीत हे सर्वार्थाने सत्य आहे.

ही वेदना जशी कवितेच्या पुस्तकरूपाने आली तशीच ती 'उत्तररात्र' याच नावाने एका वाचन–गायनाच्या कार्यक्रमाने आली. खरे तर कविता ही स्वांतसुखाय वाचनाची–अनुभवाची गोष्ट; पण गेल्या काही वर्षांत काही कवींनी आपल्या कविता वाचून–गाऊन दाखवण्याचे खाजगी–जाहीर कार्यक्रम केले. पु. लं. नी तर मर्ढेकर–आरती प्रभूंच्या कविता परिणामी रीतीने वाचल्या. तसाच हाही कार्यक्रम श्रवणीय असा झालेला आहे. या वाचनात श्रीकांत मोघे, वीणा देव, अमृता आणि अजित सातभाई, मृदुला देव, राहुल घोरपडे, अंजली माहुलीकर आदी कलाकार होते. संगीतदिग्दर्शन आणि सूत्रचालन केले होते सुधीर मोघेने. सुधीर हा जसा चांगला कवी आहे तसाच संगीताचा जाणकारही आहे. त्याला साहित्यातल्या शब्दांचे वजन जसे कळते तसेच तो शब्द सर्व साजांसह संगीतातून श्रोत्यांपर्यंत कसा पोहोचवायचा याचेही जाणकारीचे भान आहे. त्याने या कार्यक्रमात रुबायांची केलेली निवड, वाचनाचा क्रम, कलावंतांची योजना कार्यक्रमाची रंगत वाढवणारी होती.

या प्रकारचे कार्यक्रम रंगमंचावरून पेश होण्याची आवश्यकता अधिक असते. मात्र ते करताना काही पथ्ये सांभाळणे आवश्यक आहे. एक तर कार्यक्रमाचा एकूण वेळ तास–सव्वा तासापेक्षा अधिक नसावा. असा कार्यक्रम छोट्या सभागृहात शे–दीडशे श्रोत्यांसाठीच असावा. तिथे कोणत्याही प्रास्ताविकाची आवश्यकतेपेक्षा गरज भासू नये. यातल्या काही गोष्टी या कार्यक्रमात आहेत. काहींची काळजी घेऊन अधिकाधिक कार्यक्रम पेश करावेत. कारण अशा कार्यक्रमातून मूळचा कवी कळायला अधिक मदत होते. रुबायांच्या उत्तररात्रीतून रॉय किणीकर निश्चितच साकार झाले ! □

चित्रपट

**'गुपचुप'ला नुकतेच फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळाले. त्यापूर्वी महाराष्ट्र राज्य फिल्मोत्सवात याच चित्रपटाला उत्कृष्ट संवाद, दिग्दर्शन आणि अभिनेत्रीचे पारितोषिक मिळाले आहे. या चित्रपटावरील दोन बोलक्या प्रतिक्रिया पुढे दिल्या आहेत.**

# आवडेल आणि हसवेल असा 'गुपचुप'

तमाशाप्रधान चित्रपट, सूडकथा, रहस्यमय चित्रपट, संस्कृति–धर्म–परंपरारक्षित चित्रपटांचे मराठीत प्राधान्य आहे. हिंदी चित्रांवरून रचलेल्या कथा, मारामारी, ॲक्शनचा जोर असलेले पण मराठी भाषेतले चित्रपटदेखील काढले जात आहेत. मराठी भाषेतील खास विनोदी ढंग दाखविणारा चित्रपट मात्र क्वचित पाहण्यात येतो. विनोदी साहित्य, विनोदी लेखक यांची कमतरता नसताना मराठी चित्रपटात मात्र त्याचा अभाव दिसावा ही दुर्दैवी गोष्ट आहे. (दादा कोंडके यांचे चित्रपट हा सर्व दृष्टींनी अपवाद समजावा.)

भैरू पैलवान की जय, गोंधळात गोंधळ, सासू वरचढ जावई हे अलीकडचे काही विनोदी चित्रपट. कमलाकर तोरणे, राजदत्त आणि व्ही. के. नाईक या दिग्दर्शकांनी या चित्रपट–निर्मात्यांना आर्थिक यशही प्राप्तही करून दिले.

शिवशक्ति प्रॉडक्शनचा 'गुपचुप गुपचुप' याच यशस्वी विनोदी चित्रांच्या मालिकेत बसणारा आहे. दिग्दर्शन, संकलन, संवाद आणि अभिनय सर्वच बाजूंनी 'गुपचुप' ची निर्मिती एक रसरशीत परिणाम देते. मराठी चित्र पाहणाऱ्या रसिकांना तो आवडेलच; पण मराठी चित्राला नाके मुरडणाऱ्या प्रेक्षकांनाही हे चित्र निर्भेळ करमणूक देईल.

महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवात दुसऱ्या क्रमांकाने निवडला गेलेला हा चित्रपट. उत्कृष्ट संवाद (कालेलकर), उत्कृष्ट अभिनेत्री (रंजना) आणि उत्कृष्ट दिग्दर्शन (व्ही. के. नाईक) म्हणूनही गौरविला गेला. नुकतेच या चित्रपटाला फिल्म फेअरॲवॉर्डही मिळाले.

हेमा (रंजना) आणि शामा (शुभांगी) या दोन कॉलेजकन्यकांना धाकात ठेवणाऱ्या करारी सरसाहेबांच्या (डॉ. श्रीराम लागू) कुटुंबाची ही कथा. मुलींचे समाधान स्वतःच्या

दृष्टीने पाहिल्याने सरसाहेब वैतागलेले आणि त्यांच्या दबडग्याला कंटाळून स्वतःचा मार्ग निवडणाऱ्या सुजाण कन्याकांची 'गुपचुप' पणे चाललेली करामत. 'ना घरका ना घाटका' प्रमाणे कारभारी डोंगरे (शरद तळवलकर) दोन्ही बाजूंना वेळ पडेल तसे झुकतात. धाकट्या बहिणीचे प्रेम प्रकरण चालू रहावे यासाठी मदत करणारी हेमा विविध ढंगाने सरसाहेबांशी वागते. अतुल (महेश कोठारे) आणि शामाची वाढती जवळीक सरसाहेबांच्या कानी येते.

दोन मुलींना सरळ करण्यासाठी गव्हर्नेसची (पद्मा चव्हाण) नेमणूक होते. हेमा, शामा गव्हर्नेसला जुमानत नाहीत. शेवटी सरसाहेब दोघींना गोव्याच्या कॉलेजात घालण्याचा निर्णय घेतात.

गोव्यात न जाता हेमाच्या सहाय्याने शामा अतुलशी लग्न करते. गोव्यात हेमाला शामा व हेमा बनून हरघडी नाटक पार पाडावे लागते. हेमा आधुनिक कॉलेजकन्यका तर शामा सोज्ज्वळ, सुशील, डोळ्यांसमोर चालणारी प्रौढ तरुणी. मुंबईच्या महाविद्यालयातील मराठीचे प्रा. धोंड (अशोक सराफ) हेमावर खूष असतात. तिच्या प्रेमात पडतात. अचानक त्यांची बदली गोव्याला होते. हेमापण त्याच कॉलेजात येते. प्रा. धोंड हेमावर खूष होतात; पण हेमाच शामाची गाठ घालून देऊन प्रा. धोंड यांची फसवणूक करते. हेमाच शामा बनत असल्याने ते नाटक जेव्हा उघडकीला येते. तेव्हा ही बनवाबनवी प्रा. धोंड यांना कळते.

## वाढती रंगत

हेमा पार्श्वगायक सुरेशकुमारच्या प्रेमात अडकते. त्यांचे प्रकरण सुरू असताना मुंबईत सरसाहेब गव्हर्नेसशी जवळीक करतात. त्यांचा स्वभाव बदलतो. अचानक शामाचे लग्न झाल्याचे त्यांना कळते. दोघेही गोव्यात येतात. आँटी (आशालता) च्या भरवशावर ठेवलेल्या आपल्या कन्यकांचे खरे स्वरूप (जे आँटीलाही) माहीत नसते ते मूर्त स्वरूपात येण्याची वेळ तिथे येते. शामाच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि पोटातील कोवळा जीव तिचे खरेपण सिद्ध करतात.

अडीच तासांचा निखळ करमणूक करणारा हा चित्रपट खुर्चीला खिळवून ठेवतो. मनमुराद हसवतो.

प्रत्येक प्रसंग खुलविण्याचा यशस्वी प्रयत्न व्ही. के. नाईक यांनी केला आहे. दिग्दर्शक म्हणून त्यांनी चित्रपटाचा परिणाम कायम ठेवला आहे. व्यक्तिरेखांना स्वतःची इमेज दिली आहे. नटांना संयमी तरीही स्वतंत्र चौकटीत रंगविले आहे. टायटलपासून चित्राची रंगत वाढत जाते.

संजीव नाईक यांनी संकलक म्हणून चित्राला गती दिली आहे. सूर्यकांत लवंदे यांचे छायाचित्रण नयनरम्य तर आहेच; पण गोव्याचे बाह्यचित्रण पाहातच रहावे असे केले आहे.

अनिल-अरुण यांनी संगीत देताना चित्राची विनोदी पातळी वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. 'ये ना, घे ना, दे ना, जवळ घे ना' या सुरेश भागवत व शुभांगी यांच्या गाण्यात पाश्चिमात्य वाद्यमेळ उत्तम साधला आहे. 'पाहिले मी तुला, तू मला पाहिले' हे सुरेश वाडकर याने गायलेले गीत संगीतकाराच्या अनुभवाची साक्ष देणारे ठरते. सुरेश वाडकर यांनी ते म्हणलेही छान!

मधुसूदन कालेलकरांची कथा, पटकथा आणि विशेषतः संवाद ऐकण्यासारखे आहेत. संवादांना स्वतःची विनोदी लय आहे. नटांनी ती लय अर्थासहीत उचलल्याने ते अधिक प्रभावी वाटतात. 'सर्कशीतही माझ्या जोगे काम नाही म्हणून शेवटी प्राध्यापक झालो' असे प्रा. धोंड यांचे तोंडीचे संवाद. किंवा 'बाई भलतीच कडक आहे. हिची जागा दिल्लीत आहे.' अशा सूचक सामाजिक स्थितीतले चिमटेही संवादात आहेत.

चित्रात सर्वात परिणामकारक बनतो प्रा. धोंड (अशोक सराफ) मालवणी हेल असलेली संवादफेक, वागण्यातली ढिलाई, स्वभावातला मोकळेपणा, सान्यातून अशोक सराफ प्राध्यापकाचे यथार्थ बावळेपण साकार करतात. गंभीर कामे करणारी रंजना इथे हेमा आणि शामाही बनून विनोदी भूमिका रंगविते. नव्हे ती जगण्याचा प्रयत्न करते. अभिनयात भडकपणा असला तरी त्रिविध रंग दाखविण्याची रंजनात ताकद आहे, हे इथे सिद्ध होते.

सरसाहेबांची करारी आणि प्रेमळ मुद्रा डॉ. लागू सहजी आत्मविश्वासाने साकार करतात. पद्मा चव्हाण काही काळ मनोरंजन करतात. शरद तळवलकर डोंगरे दिवाणजींच्या रूपात खुलून दिसतात. चित्रपटातला विनोद जिवंत ठेवतात. सुरेश भागवत श्रीमंतीत वाढलेला बावळट तरुण बनून पडद्यावर येतात. त्यांची भूमिका आहे छोटी. पण त्यात ते मजा आणतात. प्रेक्षक त्यांच्या भूमिकेला पूर्णपणे दाद देतात.

कुलदीप पवार, आशालता वाबगावकर यांच्या भूमिकेतही वेगळेपण आहे. महेश कोठारे आणि नवतारका शुभांगी यांनी प्रेमिक आणि सांसारीक संबंध पडद्यावर साकार केला आहे. त्यात अभिनय कमी आणि कृतिमता जास्त आढळते. शुभांगीचे बोलणेपण कृतिमतेकडे कलते.

किशोर मिस्कीन यांनी निर्माण केलेला हा विनोदी मराठी चित्रपट मराठी प्रेक्षकांना आवडेल यात संदेह नाही. व्ही. के. नाईक यांची 'गोंधळात गोंधळ' नंतरची ही चित्रनिर्मिती त्यांच्याही कर्तृत्वाची साक्ष देते.

— सुभाष इनामदार

---

# वासरात लंगडी गाय 'गुपचुप गुपचुप'

नुकतेच 'गुपचुप गुपचुप'ला फिल्मफेअर पारितोषिक मिळाले. याआधी राज्यपुरस्कारही मिळाला. त्यामुळे बऱ्याच जणांच्या या चित्रपटाविषयीच्या आशा उंचावल्या. अशा पारितोषिकांनी आपण आशावादी बनत असू तर निराशाच वाट्याला येणार.

अजूनही तमाशा, जाऊ-वहिनी अशा चक्रांतून बाहेर न पडलेल्या मराठी चित्रपटांत बरे चित्रपट एक–दोन. बरं, मराठी निर्माते गरीब असल्याने तांत्रिकदृष्ट्याही हे चित्रपट सुखावह नाहीत. त्यात एखाद्या चित्रपटाला पारितोषिक मिळालं तर त्यात अभिमानास्पद काही आहे असं मला तरी वाटत नाही.

मूठभर कलाकारांची Permutation

combinations मराठी चित्रपटांत वापरली जातात. 'गुपचुप' मधले कॉंबिनेशन आहे– रंजना, कुलदीप पवार, अशोक सराफ, श्रीराम लागू, पद्मा चव्हाण, शरद तळवलकर इ. इ. त्यांचा एकमेकांतला संबंध असा :– सरसाहेब (श्रीराम लागू), हेमा (रंजना) आणि शामा (नवतारका शुभांगी) यांचे पिताजी. मॅडम शोभना (पद्मा चव्हाण) या कॉलेजकुमारींची गव्हर्नेस. डोंगरे (शरद तळवलकर) सरसाहेबांचे सेक्रेटरी. अशोक (महेश कोठारे) शामाचा प्रियकर तर अतुल (सुरेश भागवत) तिचाच नियोजित पती. प्रो. घोंड (अशोक सराफ) केवळ विनोदनिर्मिती.

हेमा थोरली मुलगी. मित्राला दिलेल्या वचनाप्रमाणं मुलीचं मित्राच्या मुलाशी लग्न ठरवलं जातं. हेमा त्या मुलापेक्षा वयानं मोठी म्हणून त्याऐवजी शामाचं लग्न ठरतं. हा वाग्दत्त वर महाबावळट. शामाचं दुसऱ्या तरुणावर प्रेम. हेमाची तिला फूस. परिणाम त्याच्यावर नजर ठेवायला गवर्नेस. ती अयशस्वी. परिणाम– गोव्याला रवानगी. दरम्यान शामा पळून जाऊन लग्न करते. गोव्यात हेमा–हेमा आणि शामा म्हणून आणखी गोंधळ. शेवट गोड. ही एवढी कथा.

चित्रपटाचे दिग्दर्शक व्ही. के. नाईक यांनी प्रत्येक पात्राला खास 'स्टाइल' देण्याचा अट्टाहास केला आहे. कोकणी, थोडासा बायकी ढंगानं बोलणारा प्रो. घोंड, परकीयांसारखे मराठी बोलणारा अतुल गोवॅनीज आंटी (आशालता), खेकसणारे सरसाहेब, बावळट डोंगरे– अशा 'स्टाइल' मध्ये बोलण्याने त्या बोलण्यात विलक्षण कृत्रिमपणा जाणवतो. अभिनेते अभिनय करतायत हे तर माहीतच असते; पण तो इतका नाटकी करण्याचा दिग्दर्शकाला हव्यास का ?

विनोदनिर्मितीसाठी हे सगळे करण्यात आले असेल तर फक्त अशोक सराफ त्यात यशस्वी होतो. मुळात हा कलाकार अतिशय गुणी आहे. कुठलीही भूमिका असली तरी तो नेटाने तडीस नेतो. (एक डाव भुताचा मधलं भूत असलं तरीही). त्याचे पॅंट सावरणे, त्या विनोदी ढंगात बोलणे त्यालाच शोभते. प्रत्यक्षात कुणीही माणूस असे बोलणार नाही हे कळत असूनही आपण आपल्या नकळत त्याच्या बोलण्याला हसतो. बस तेवढाच काय तो विरंगुळा.

चित्रपटात बाकी ज्या कल्पना वापरल्या आहेत त्या अगदी जुनाट झालेल्या. नको असलेल्या गव्हर्नेसला सतावण्यासाठी अजून किती पिढ्यातली मुले स्टुलांचे पाय तोडणारेत कळत नाही; पण इथेही या कॉलेजयुवती तीच क्लृप्ती वापरतात. (कल्पक चित्रपटवाल्यांनी जरा नवीन कल्पना वापरल्या तर प्रत्यक्षात कुणाला त्याचा उपयोग तरी करता येईल. कारण आजकालचे शिक्षकही खुर्ची तपासूनच बसत असतील) असो. एकूण काय तर कल्पना-दारिद्र्य !

एरवी विनोद निर्माण करण्याचे दुसरे राजरोस साधन म्हणजे – अतिशयोक्ती. प्रो. घोंड हेमाच्या सांगण्यावरून टिळक-छाप पोशाख करून कॉलेजात येतो– प्रत्यक्षात हे घडेल का ? बहुधा नाही. सरसाहेब एकदम नाच करू लागतात. एवढा बदल ? जरा अवघडच.

असे प्रसंग पाहिले की विनोदाची व्याख्या काय करायची असा प्रश्न पडतो. विनोद अतिशयोक्तीतूनच निर्माण व्हायला हवा का ? नेहमी तो तसाच होतो का ? नक्कीच नाही. चि. वि.चा विनोद तिळमात्रही अतिरंजित नाही. जुने चित्रपट 'वाट चुकलेले नवरे', 'अवघाचि संसार'-मधलाही विनोद असा नाही. आपल्यावर कोसळलेल्या प्रसंगांना हसण्याची कुवत हे चित्रपट निर्माण करायचे. त्यातले विनोद आपल्याला 'आपले' वाटायचे. 'गुपचुप'-सारखे विनोद आपल्याबाबतीत अशक्यच वाटतात. म्हणूनच आपण अशा चित्रपटांना नंतर आठवून हसूच शकत नाही. खैर . 'विनोद निर्मिती–हास्यरसाचा' विषय मीमांसक, समीक्षकांचा सध्या 'गुपचुप'.

कलाकारांचा अभिनय म्हणायचा तर रंजना ठीक. 'शरारती' हेमा आणि साधी–भोळी शामा–दोन्हीही ती करते (जुळ्या आहोत असं सांगून) तेव्हाचा तिचा अभिनय ठीक; पण खरं सांगायचं तर आता रंजनालाच पहायचा कंटाळा यायला लागलाय. कुणी तरी नवीन यायला हवे असे वाटत होते, 'गुपचुप' बघेपर्यंत; पण आता रंजनाच बरी असे वाटते.

याचे कारण नवतारका शुभांगी. या मुलीने आपल्या कामावर विशेष त्रास घेतला आहे असे वाटत नाही. (नवीन असल्याने तिने असा प्रयत्न करावा अशी अपेक्षा). हिचे बोलणे अतिशय सदोष आहे. शिवाय चेहऱ्यावरचे हावभावही तितकेसे जमलेले नाहीत. महेश कोठारे, सुरेश भागवत ('संसार हा सुखाचा' फेम). आशालता यांनी नेकीने काम केले आहे.

श्रीराम लागू आपल्या 'टोन'शी इमान राखून आहेत. 'सिंहासन' असो, 'गांधी' असो, 'गुपचुप' असो. ते आपला टोन न बदलण्याची खबरदारी घेतात. त्यांच्याबद्दल अधिक काय लिहिणार ? एक सुखद धक्का दिलाय पद्मा चव्हाणने. मध्यंतरी ('अष्टविनायक'च्या सुमारास) जाड झालेली ही अभिनेत्री आता बरीच बारीक झाली असल्याने फारच सुंदर दिसते (कधी कधी रंजनापेक्षाही). तिचे कामही चांगले आहे.

नायिकेची रवानगी गोव्याला होत असल्याने गोव्याचा फेरफटका ओघाने आलाच; पण गोव्याचे सौंदर्य छायाचित्रकाराला 'एक दुजे के लिये'सारखे पकडता आलेले नाही. तो गोवा न वाटता कुठलाही समुद्र-किनारा असेल असे वाटते. मुंबईतला सरसाहेबांचा राहता बंगला मात्र चांगला आहे.

संगीताची बाजू बरी; पण हल्ली मराठी चित्रपटात हिंदी स्टाइलची गाणी घालून त्यावर जितेंद्र–श्रीदेवीटाइप नाचण्याची फॅशन आल्यानं प्रेक्षकाला धड कुठल्याच गोष्टीची मजा घेता येत नाही.

चित्रपटाची शीर्षके 'कार्टून्स'मध्ये आहेत. कार्टून्स चांगली आहेत. एक–दोन कल्पना जमलेल्या नाहीत; पण तरीही ठीक आहे.

निष्कर्ष काय, तर मराठी चित्रपटांच्या वासरात 'गुपचुप'ची लंगडी गाय शहाणी म्हणायची वेळ येते !

—उज्ज्वला लेले

# नाट्यपंढरी



## □ हे यश माझ्या गुरूंचे !

केशवराव भोसले म्हणजे ‘स्वयमेवमृगेंद्रता !’ सारं यश संपादलं ते स्वपराक्रमाने आणि या पराक्रमाला अवधी किती ? अवघे तीस–एकतीस वर्षांचे आयुष्य. इथे आठव येतो तो राम गणेशांचा. त्यांचे एक साजरे सुभाषितही डोळ्यांसमोर दिसू लागते. ‘उमर फत्तराला असते. फुलाला नसते’ (सावाजी-राजसंन्यास) केशवरावांना ‘शारदे’ची संधी मिळाली नि त्यांच्या यशाचा मार्ग मोकळा झाला; पण तोही निष्कंटक नव्हता. कारण लवकरच पितृतुल्य जनुभाऊ निमकरांचा आसरा तोडावा लागला. वयाच्या अठराव्या वर्षी मोठ्या हिमतीने संस्था (ललितकलादर्श) स्थापन केली; पण मित्रांची हवी तशी साथ मिळाली नाही. एक एक करीत सर्वजण सोडून गेले. कंपनीची आर्थिक दुरवस्था पाहून प्रत्यक्ष वडीलबंधूंनीही संगत सोडली; पण केशवराव पहिल्यापासूनच जिद्दी! माघार हा शब्दच त्यांच्या कोशात नव्हता. त्यांची प्रत्येक गोष्ट आखीव–रेखीव असे. हाताशी होता त्या नटवर्गात ते उभे राहिले. सुरुवातीस त्यांच्या शारदेने हात दिला. मग ‘मंथरा’ गाजली. मग वीर वामनराव जोशी (वामन गोपाळ जोशी) यांचे ‘राक्षसी महत्त्वाकांक्षा’ हे नाटक त्यांच्या हाती पडले नि खरोखरच त्यांची ललाटरेषा उजळली ! त्यांच्या ‘मृणालिनी’च्या भूमिकेचे अपार कौतुक झाले. पैशाचा पाऊस पडला. लागोपाठ या नाटकाचे खेळ सुरू होते. ‘राक्षसी’चे शंभर प्रयोग करून मुंबईचा मुक्काम हलवा, असा त्यांच्या मित्रांनी नि रसिकांनी हट्ट धरला होता; पण पूर्वनियोजित दौऱ्याप्रमाणे मुक्काम हलविणं भाग होते. मुक्काम संपताना मुंबईकरांनी त्यांचा भव्य सत्कार केला. व्यासपीठावर केशवरावांबरोबर त्यांचे पहिले गानगुरु श्री. जांभेकरबुवाही होते.

केशवरावांनी अगदी थोडक्यात सत्काराला हृद्य उत्तर दिले. बोलताना ते म्हणाले, ‘रसिक–मित्रहो, माझ्या यशाचे सारे श्रेय माझे गायनगुरुजी, पूज्य जांभेकरबुवा यांनाच आहे’ असे नम्र शब्दात सांगून त्यांनी सत्कारप्रसंगी मिळालेल्या हजारो रुपयांच्या देणग्या नि अनेक भेटवस्तू आपल्या गुरुजींच्या चरणी अर्पण केल्या !

पुढे त्यांनी डॉ. गुलाब (हाच मुलाचा बाप) डेव्हिड (संन्याशाचा संसार) शिवाजी (शहा शिवाजी) धैर्यधर (मानापमान) अशा अनेक भूमिका त्यांनी अति सुरेख सजविल्या.


## □ मी उगाच भांडलो !

महाराष्ट्र नाटक मंडळीत ‘नटांचे–नाटककार’ म्हणून कारखानीस, टिपणीस, औंधकर, बोडस (ग. कृ.) अशी एक परंपराच होऊन गेली. त्यात आज विष्णुपंत औंधकर (विष्णु हरी) हे त्यांच्या ‘बेबंदशाही’, ‘आग्र्याहून सुटका’ या नाटकांमुळे रसिकांना परिचित आहेत. शिवाय त्यांचे चित्रपटसृष्टीतले कर्तृत्वही फार मोठे आहे. सावकारी पाश, रामराज्य, भरतभेट या अमर चित्रकथा औंधकरांच्या आहेत. नट म्हणून (स्त्रीपार्टी म्हणूनसुद्धा) तर ते प्रसिद्ध होतेच; पण नाटक नि चित्रपटलेखक म्हणून त्यांचा अधिक लौकिक झाला. केशवराव दाते या सगळ्यांबरोबर होतेच; पण समवयस्क म्हणून दाते–औंधकर–वैशंपायन अधिक जवळचे.

‘महाराष्ट्र’ मधून बाहेर पडल्यावर औंधकर–वैशंपायन आदींनी– ‘समर्थ नाटक मंडळी’ काढली. थोड्या दिवसांनी दातेही आले. तेव्हाच ‘आग्र्याहून सुटका’ रंगभूमीवर आले; पण काही काळानंतर नागपूर मुक्कामात कंपनी सोडून, पुण्याला येण्याचे दात्यांनी ठरविले. म्हणून एक दिवस औंधकरांकडे पैशाची मागणी केली. त्यावर औंधकर ‘नाही’ म्हणाले. पुष्कळ चर्चा झाल्यावर केशवराव म्हणाले, ‘अहो, पुण्यापर्यंतच्या तिकिटापुरते तरी पैसे द्या !’ त्यावरही औंधकरांनी चक्क नकार दिला. मग दोघांच्यात खूप हमरी–तुमरी झाली (संबंध अतिशय चांगले असूनही) दाते आपली ट्रंक–वळकटी घेऊन कंपनीच्या बिऱ्हाडातून बाहेर पडले, ते थेट आपले स्नेही शंकरराव फाटक यांच्या घरी गेले. त्यांना सर्व हकिगत सांगितली; पण केशवरावांना चैन पडत नव्हते. त्यांना सारखे वाटत होते, रात्री औंधकर आपल्याकडे येतील नि म्हणतील, ‘दाते किती रागावलात ? पैसे नाहीत हे तुम्हाला माहीत आहे ना ?’ बस, दात्यांना इतकेच हवे होते. ते सारखी आपल्या मित्राची–औंधकरांची–वाट पहात होते; पण ते घडले नाही. त्यांनी रागाच्या भरात दुसऱ्या दिवशी वकिलाकडून औंधकरांवर फिर्याद सुद्धा ठोकली ! पुढे जामीन दिला गेला. तो दाते औंधकर दोघांचाही दोस्त ! अखेर ते प्रकरण मिटले.

त्याची आठवण होऊन, दाते गहिवराने लिहितात, ‘एका नाटक कंपनीतल्या स्नेह्यावर फिर्याद केली हे अजूनही मनाला बोचते, खंत वाटते. ते हातून व्हायला नको होते. पुढे वर्षभर औंधकरांशी बोलणे नव्हते. मी पुण्यास बरेच दिवस रिकामाच राहिलो. ‘समर्थ’ पुण्यात आली. अगोदर निरोप पाठवून भेटीची परवानगी घेऊन, औंधकर आपले नवे नाटक ‘महारथी कर्ण’ वाचायला घेऊन आले. भांडणानंतर आमची ही पहिली भेट. औंधकरांचे माझ्यावरचे प्रेम, विश्वास (त्यांचा मोठेपणाच मानतो मी) यामुळे जुन्या गोष्टी दूर सारून तो जवळ आला. मने साफ आहेत ही दोघांचीही मनोमन खात्री होती. विवक्षित वेळ वाईट म्हणून गरमागरमी होऊन स्फोट झाला...

.. पुढेही औंधकरांशी माझे संबंध चांगले राहिले. मी त्यांना ‘राजकमल’मध्ये ‘सावतामाळी’साठी नेले होते; पण ‘राजकमल’बरोबर त्यांचा करार होण्यापूर्वीच ते वारले. केशवरावांबरोबरच माझ्या आयुष्यातलेही नाट्य संपले !





# सुखी कुटुंब म्हणजेच सुखी राष्ट्र

## आपणांस माहीत आहे कां?

- केवळ मुलांच्या संख्येवर नियंत्रण म्हणजे कुटुंब नियोजन नव्हे.
- सुखी आणि बिनधोक वैवाहिक जीवन हा त्याचा उद्देश आहे.
- जर आपणांस मूल नसेल तर आपण जवळच्या कुटुंब कल्याण केंद्रात विचारपूस करा.
- जेव्हा हवं तेव्हा मूल व्हावं, अशी आपली इच्छा असेल तर मुलांत अंतर ठेवण्याच्या पद्धतींचा आपण अवलंब करू शकता.
- आपणांस दोन मुलें झाल्यानंतर जेव्हा आपले कुटुंब संपूर्ण होईल त्यानंतर कायम गर्भधारणा टाळणाऱ्या पद्धती उपलब्ध आहेत.

## अंतर ठेवण्यासाठीं पद्धती

### निरोध

सर्व जोडप्यासाठीं, विशेषतः नुकतेच लग्न झालेल्या जोडप्यांना गर्भधारणा टाळण्यासाठीं आणि ज्यांना एक मूल आहे त्यांना दुसऱ्या मुलांचे लगेच आगमन टाळण्यासाठी ही सुलभ आणि आदर्श पद्धत आहे. ही पद्धत कमी खर्चाची, सहजप्राप्त शिवाय दोघांच्याहि आरोग्यावर कांही विपरित परिणाम होत नाही.

### डायफ्राम

योग्य निवड करून, योग्य जागीं बसविल्यास अतिशय परिणामकारक पद्धत. उपकरणाचा योग्य आकार डॉक्टरतर्फे ठरविण्यात येतो आणि त्यानंतर स्त्री स्वतः ते उपकरण बसवून घेऊ शकते.

### कॉपर टी

इंग्रजी 'टी' आकाराचे हे उपकरण, प्रशिक्षित डॉक्टर अथवासाहाय्यक वैद्यकीय कर्मचाऱ्यातर्फे योनीत बसविण्यात येते. हे उपकरण तीन ते चार वर्षे योग्य स्थितीत राहते. वापरणाऱ्यांना त्याचे अस्तित्व जाणवत नाही आणि ते सामान्य जीवनाप्रमाणे वागूं शकतात. याचा वापर करणाऱ्यांना आर्थिक प्रोत्साहन देण्यात येते.

### खावयाच्या गोळ्या

हे २८ गोळ्यांचे एक पाकिट असते आणि मासिक पाळीचे दिवस सोडून स्त्रीला दुसऱ्या मुलांची इच्छा होईपर्यंत रोज एक गोळी घ्यावयाची असते. या गोळीमुळे आपल्या शरीरसुखात व्यत्यय येत नाही आणि सामान्यपणे तिचे विपरित परिणाम होत नाहीत. अर्थात वेळोवेळी वैद्यकीय तपासणी अवश्य करून घेण्यात आली पाहिजे.

## कायम गर्भधारणा वंद करण्याच्या पद्धतीं

### व्हायसोक्टमी (पुरुष नसबंदी)

ही सोपी आणि हुकमी शस्त्रक्रीया पुरुषांवर अनुभवी डॉक्टराकडून करण्यात येते. ही कायम पद्धति असून त्याचा लैंगिक जीवनावर परिणाम होत नाही. नसबंदी करून घेणाऱ्या लोकांना आर्थिक प्रोत्साहन देण्यात येते.

### टयुबेक्टोमी (नसबंदी)

अनुभवी डॉक्टराकडूनस्त्रियांवर करण्यात येणारी शस्त्रक्रीया. त्यासाठी अल्पकाळ दवाखान्यात रहाव लागते. ही पण कायम पद्धति असून सामान्य जीवनावर त्याचा परिणाम होत नाही.

### लेपरोस्कोपी

स्त्री नसबंदीसाठी ही एक अद्यावत पद्धत असून त्यासाठी अनेक लहान मोठया शहरांतून सोयी उपलब्ध आहेत. त्यासाठी दवाखान्यात रहावे लागत नाही आणि त्याचे विपरित हरिणाम होत नाहीत.

**रुचेल त्या पद्धतीची निवड करण्याचे स्वातंत्र्य आपणास आहे**

दि 83/500